
सोलापूर
# तरुण भारत
SOLAPUR TARUN BHARAT
न मे कर्मफले स्पृहा
सोलापूर, धाराशिव, लातूर, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहिल्यानगर व सातारा येथून वितरित

धाराशिव | सोमवार, २९ डिसेंबर २०२५ | वर्ष ३ रे अंक २९९ | पाने १२ | किंमत रु. ६/- ■ RNI No. MAHMAR/2023/86468 ■ Postal Regd No. SLP/32/2024-2026. ▌dainiktarunbharat.com ▌epaper.dainiktarunbharat.com

## विचारपुष्प



भारतीयीकरणाचा अर्थ सर्वांना हिंदू बनवणे हा नाही. आम्ही सर्व याच भूमीचे पुत्र आहोत, हे सत्य आपण समजून घेतले पाहिजे आणि या सत्यावर अविचल निष्ठा ठेवली पाहिजे. आपण सर्व एकाच मानव समूहाचे आहोत, आपल्या सर्वांचे पूर्वज एकच होते आणि यामुळे आपल्या सर्वांची आकांक्षाही एकच आहे, हे आपण ध्यानात ठेवले पाहिजे. हाच भारतीयीकरणाचा खरा अर्थ आहे.

**- दत्तोपंत ठेंगडी**
भारतीय मजदूर संघ, भारतीय किसान संघ, स्वदेशी जागरण मंचाचे संस्थापक

# जहाल माओवाद्यांची 'हिटलिस्ट' जारी

## सुरक्षा दलांनी ११ जणांची यादी गृहमंत्रालयाला सोपवली

**यादीतील नावे** ● देवजी ऊर्फ चिप्पारी तिरुपती ● मुपल्ला ऊर्फ गणपती ● मिशिर बेसरा ऊर्फ भास्कर ● हेमला देवल ● मल्लराजजी ● सुजाता ● तलावा रवी ● नुने रेड्डी ● पापाराव ● पतिराम मांझी ● लालसिंह

### मार्चआधीच खात्मा करण्याची तयारी

◆ **नवी दिल्ली, २८ डिसेंबर**

केंद्र सरकारने देशातून मार्च २०२६ पर्यंत माओवाद्यांचे अस्तित्व संपुष्टात आणण्याचा संकल्प केला आहे आणि संकल्पपूर्तीसाठी सुरक्षा दलाने नक्षलग्रस्त भागांत मोहिमा अधिक तीव्र केल्या. आतापर्यंत अनेक जहाल माओवाद्यांचा खात्मा झाला, तर मृत्यूच्या भीतीने हजारो माओवाद्यांनी शरणागती पत्करली. पुढील व्यूहरचनेचा भाग म्हणून विविध राज्यांचे पोलिस आणि सीआरपीएफने देशातील एकूण २५० आणि ११ जहाल माओवाद्यांचा 'हिट लिस्ट' केंद्रीय गृह मंत्रालयाला सोपवली. यात एका महिला नक्षल्याचा समावेश आहे.

छत्तीसगडमध्ये प्रमुख माओवादी कमांडर बसवराज, आंध्रप्रदेशात हिडमा आणि ओडिशात गणेश उईकेचा खात्मा करण्यात यश आल्यानंतर माओवादी चळवळीला मोठा हादरा बसला. चळवळीतील प्रमुख नक्षलवाद्यांच्या खात्म्याचे वर्षभरापूर्वी सुरक्षा दलाने निश्चित केलेले लक्ष्य पूर्ण झाल्यानंतर नक्षलप्रभावित राज्यातील पोलिस आणि सीआरपीएफने देशातील उर्वरित माओवाद्यांची यादी तयार केली. यात एका महिलेसह ११ जहाल माओवादी आणि एकूण २५० सदस्यांची यादी केंद्रीय गृहमंत्रालयाकडे नुकतीच सादर केली.

११ माओवाद्यांच्या यादीत नक्षलवाद्यांच्या सर्वोच्च पदावरील पॉलिट ब्युरोच्या तीन प्रमुखांची नावे आहेत, त्यांच्याकडे एके-४७ आहेत. माओवादी संघटनेच्या खालच्या स्तरावर २५० पेक्षा जास्त माओवादी शिल्लक आहेत मात्र, देशभरातील माओवादी कारवायांचे धोरणात्मक व्यवस्थापन आणि नियंत्रण करणारे ११ जहाल माओवादी शिल्लक असल्याची माहिती नक्षलविरोधी मोहिमेचे नेतृत्व करणाऱ्या एका सीआरपीएफ अधिकाऱ्याने वृत्तसंस्थेला दिली. *(वृत्तसंस्था)*

### तलावा रवी गडचिरोलीतील

**» या यादीत समावेश असलेला तलावा रवी उर्फ भास्कर हा गडचिरोली विभागाचा प्रमुख आहे. त्याने अनेक आयईडी स्फोट घडवून आणले आहेत.**

# तृतीयपंथीय आयुबच्या खुनातील आरोपी जेरबंद

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि.२८ डिसेंबर-**

लष्कर परिसरातील मुर्गीनाला येथील एका मस्जिदजवळ राहणाऱ्या व सोलापूर महानगरपालिकेच्या प्रभाग क्रमांक १६ मधून निवडणूक लढविण्यास इच्छुक असलेले आयुब सय्यद या तृतीयपंथीयाचा नुकताच खून करण्यात आला होता. या खुनातील तीन आरोपींना अवघ्या सहा तासात जेरबंद करण्यात आले, अशी माहिती पोलिस आयुक्त एम.राजकुमार यांनी पत्रपरिषदेत दिली. **(उर्वरित पान २ वर)**






# डोनाल्ड ट्रम्प यांचा टॅरिफ डाव उलटला

## ● अमेरिकी कंपन्या दिवाळखोरीत ● १५ वर्षांचा विक्रम मोडीत

◆ **नवी दिल्ली, २८ डिसेंबर**

अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी खूप गाजावाजा करून अनेक देशांवर मोठे व्यापार शुल्क लादले. याच्या समर्थनार्थ ते अमेरिकेचा महसूल वाढेल, असा दावा करीत असले तरी खरी परिस्थिती वेगळी आहे. अहवालांनुसार, २०२५ मध्ये अमेरिकेतील कॉर्पोरेट दिवाळखोरी १५ वर्षांच्या उच्चांकावर पोहोचली आहे. यामागे ट्रम्प टॅरिफ प्राथमिक कारण असल्याचे कंपन्या सांगत आहेत. शिवाय, महागाईने परिस्थिती आणखी बिकट केली आहे.

'द वॉशिंग्टन पोस्ट'च्या अहवालानुसार, २०२५ मध्ये अमेरिकन कॉर्पोरेट दिवाळखोरीत लक्षणीय वाढ झाली, जी महामंदीनंतर लगेचच दिसलेल्या पातळीइतकीच होती. एस अॅण्ड पी ग्लोबल मार्केट इंटेलिजन्सच्या डेटाच्या आधारे, जानेवारी ते नोव्हेंबर दरम्यान ७१७ कंपन्यांनी दिवाळखोरीसाठी अर्ज केला.

अहवालानुसार, आयातीवर थेट अवलंबून असलेल्या अमेरिकन व्यवसायांना दशकांमधील सर्वाधिक शुल्काचा सामना करावा लागला. दिवाळखोरी दाखल करण्यात सर्वाधिक वाढ औद्योगिक क्षेत्रात दिसून आली, ज्यामध्ये बांधकाम, उत्पादन आणि वाहतूक कंपन्यांचा समावेश आहे. अर्थशास्त्रज्ञांना अमेरिकन अर्थव्यवस्थेत एक विरोधाभास दिसतो. *(वृत्तसंस्था)*

### ट्रम्प यांचे दावे पोकळ

» राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या सतत बदलणाऱ्या टॅरिफ धोरणांमुळे या सर्व क्षेत्रांवर गंभीर परिणाम झाला आहे. दरम्यान, ट्रम्प यांनी बराच काळ असा दावा केला आहे की यामुळे अमेरिकन उत्पादन क्षेत्राला पुनरुज्जीवित होण्यास मदत होत आहे. नोव्हेंबरमध्ये संपलेल्या एका वर्षाच्या कालावधीत उत्पादन क्षेत्रात ७०,००० पेक्षा जास्त नोकऱ्या गेल्या. या संदर्भात, ट्रम्प यांचे सर्व दावे पोकळ वाटतात, असे फेडरल डेटामध्ये म्हटले आहे.

### वन्यप्राण्यांच्या हल्ल्यात एक जखमी

◆ **आकोट, २८ डिसेंबर**

तालुक्यातील सातपुडा पर्वताच्या पायथ्याशी असलेल्या शहापूर गावातील एका इसमावर वन्य प्राण्याने हल्ला केला. यात तो जखमी झाला.

रविवारी सकाळी शेतात काम करीत असताना हुसेन सुरत्ने याच्यावर वन्य प्राण्याने हल्ला केल्याची घटना घडली. त्यांना तातडीने आकोट ग्रामीण रुग्णालयाला दाखल करण्यात आले. सातपुडा परिसरात वन्य प्राण्यांचा वावर वाढलेला असताना वन विभाग मात्र झोपेत आहे, असा आरोप गावकरी व शेतकरी करीत आहे. *(तभा वृत्तसेवा)*




10 YEAR WARRANTY | BAJAJ SECURE • AMC • ROAD SIDE ASSISTANCE | 72198 21111 | SHRIRAM Finance | IDFC FIRST Bank ALWAYS YOU FIRST | BAJAJ AUTO CREDIT | L&T Finance | TATA CAPITAL Two Wheeler Loans

*नियम आणि अटी लागू. बचत 22 डिसेंबर ते 31 डिसेंबर 2025 पर्यंत उपलब्ध. दाखवलेली एकूण बचत ही कॅशबॅकची बचत, शून्य प्रोसेसिंग फी आणि 5 मोफत सर्व्हिसेस (3 स्टँडर्ड मोफत सर्व्हिसेस आणि 2 अतिरिक्त मोफत सर्व्हिसेस) यांची बेरिज आहे. मोफत सर्व्हिसेसची बचत शेड्यूल्ड लेबर शुल्कानुसार. लागू ऑफर्स मॉडेल्स/राज्यानुसार बदलू शकतात. शून्य पीएफवरील बचत फायनान्सर आधारावर स्थानांनुसार बदलू शकते. अर्थपुरवठा पूर्णपणे फायनान्सरच्या विवेकानुसार. साहसी दृश्ये एक्सपर्ट्सकडून, प्रोफेशनल सुपरवीजन अंतर्गत, नियंत्रित आणि बंद वातावरणात, सामान्य लोक किंवा सार्वजनिक रस्त्यांपासून दूर जागेत केली आहेत. या साहसी दृश्यांचं अनुकरण करू नये आणि नेहमी वाहतूक व सुरक्षिततेचे नियम पाळावे. पल्सर 125 ऑफर ही निऑन आणि कार्बन फायबर मॉडेल्सवर.

Authorised Dealers For Bajaj Auto Ltd.: Solapur • Station Road AHERKAR BAJAJ 9689899840 • Hotgi Road AHERKAR BAJAJ 8956 069 355 • Akkalkot Road AHERKAR BAJAJ 8956 320 060 • Pandharpur PANDURANG BAJAJ 8600024805 • Jeur SHIVRATNA BAJAJ 9922044676 • Barshi AHERKAR BAJAJ 8308004007.

CMYK
सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## महत्त्वाचे

### काशी विश्वनाथ धाममध्ये भक्तीचा महासागर

**काशी** : नववर्षामुळे वाराणसीतील बाबा श्री काशी विश्वनाथ धामला येणाऱ्या भाविकांची संख्या चांगलीच वाढली आहे. यासाठी कडक सुरक्षा आणि प्रशासकीय व्यवस्था तैनात करण्यात आली आहे. मंदिर प्रशासनाच्या मते, शनिवारी सकाळपासूनच भाविकांची मोठी गर्दी होऊ लागली. शनिवारी रात्रीपर्यंत चार लाखांहून अधिक भाविकांनी बाबा श्री काशी विश्वनाथ मंदिराचे दर्शन घेतले. वाढती गर्दी लक्षात घेता मंदिरात कठडे लावण्यात आले आहेत. भाविकांना रांगेत उभे राहून दर्शन घेण्याची परवानगी देण्यात येत आहे. कडक सुरक्षा व्यवस्था तैनात करण्यात आली आहे. शनिवारपासून बाबा श्री काशी विश्वनाथ यांना भेट देणाऱ्या भाविकांची संख्या सातत्याने वाढत आहे. रविवारी सकाळी दर्शनासाठी लांब रांगा लागल्या होत्या. मंदिरात प्रवेश करणारे सर्व भाविक कठड्यांमधून बाबा विश्वनाथांचे दर्शन आणि पूजा करत आहेत. सध्या भाविकांना केवळ बाबा विश्वनाथांची झलक पाहण्याची परवानगी आहे. महाकुंभ आणि श्रावण महिन्यात राबविल्या जाणाऱ्या व्यवस्था सध्या लागू आहेत, असे उपजिल्हा दंडाधिकारी शंभू शरण यांनी सांगितले. भाविकांची संख्या वाढल्यामुळे, २४ डिसेंबरपासून प्रोटोकॉल दर्शन आणि स्पर्श दर्शनावर बंदी घालण्यात आली आहे.

(पान १ वरुन...)

### तृतीयपंथीय आयुबच्या खुनातील आरोपी जेरबंद

दि.२६ डिसेंबर रात्री १०.३० ते दि.२७ डिसेंबर २०२५ रोजी दुपारी ०१.३० वाजण्याच्या सुमारास आयुब हुसेन सय्यद या तृतीयपंथीयांचा खून करण्यात आला होता. याबाबत सदर बझार पोलिस ठाण्यात गु.र.नं. १०५४/२०२५ भारतीय न्याय संहिता कलम १०३ (१) प्रमाणे दि.२७ डिसेंबर २०२५ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला.

त्याअनुषंगाने गुन्हे शाखेकडील सपोनि शंकर धायगुडे, सपोनि विजय पाटील, सपोनि शैलेश खेडकर, सपोनि दत्तात्रय काळे, पोउनि मुकेश गायकवाड, ग्रेड पोउपनि शामकांत जाधव, सदर बझार पोलिस ठाण्याकडील सपोनि सागर काटे आदींच्या पथकाने तांत्रिक माहितीचे आधारे व सीसीटीव्ही फुटेजची तपासणी केली.

हा गुन्हा तीन इसमांनी मिळून केल्याची व सदरचे आरोपी हे लातूर जिल्ह्याचे दिशेने गेल्याचे तपासाअंती दिसून आले.दि.२७ डिसेंबर २०२५ रोजी गुन्हे शाखेचे व सदर बझार पोलिस ठाण्याकडील पथके लातूरकडे रवाना होवून नमूद आरोपींची ओळख पटविली.

यशराज उत्तम कांबळे (वय-२१, रा.बौध्दविहार जवळ, इंदिरा नगर, लातूर) आफताब इसाक शेख (वय-२४, रा. कुंभारवाडी, ता.रेणापूर, जि.लातूर), वैभव गुरूनाथ पनगुले (रा.कुंभारवाडी, ता.रेणापूर, जि.लातूर) यांना लातूर येथील विवेकानंद चौक पोलिस ठाण्याच्या पोलिसांच्या मदतीने ताब्यात घेतले.

यातील आरोपी आफताब इसाक शेख व मयत आयुब हुसेन सय्यद हे यापूर्वीपासूनच ओळखीचे असून आफताब शेख हा मयत आयुब सय्यद यास भेटण्याकरिता सोलापूरला वारंवार येत होता. आफताब शेख यास आयुब सय्यद याचेकडे भरपूर प्रमाणात सोन्याचे दागिने व रोख रक्कम असल्याची माहिती होती. तिन्ही आरोपी मयत अयुब सय्यद यास भेटण्याचा बहाणा करून मयताकडील सोन्याचे दागिने व रोख रक्कम चोरण्याचे उद्देशाने आरोपी यशराज कांबळे याचेकडील युनिकॉर्न मोटारसायकलवरुन सोलापूर येथे आले होते. आयुबचा त्याचे राहते घरी खून करुन घरातील दागिने, रोख रक्कम, मोबाईल व दुचाकी चोरुन नेल्याची कबुली दिली. आरोपींना न्यायालयात उभे केले असता ३१ डिसेंबरपर्यंत त्यांना पोलिस कोठडी सुनावण्यात आली. पोनि भालचंद्र ढवळे हे पुढील तपास करीत आहेत.

पोलिस आयुक्त एम. राजकुमार, पोलिस उपायुक्त विजय कबाडे, डॉ.अश्विनी पाटील, सहाय्यक पोलिस आयुक्त राजन माने, दिलीप पवार यांच्या मार्गदर्शनाखाली वपोनि अरविंद माने, सपोनि शंकर धायगुडे, विजय पाटील, शैलेश खेडकर, दत्तात्रय काळे, पोउपनि मुकेश गायकवाड, ग्रेड पोउपनि शामकांत जाधव, पोलिस अंमलदार नंदराम गायकवाड, बापू साठे, अंकुश भोसले, संदीप जावळे, जावेद जमादार, अनिल जाधव, विनोद रजपूत, महेश शिंदे, वाजीद पटेल, योगेश बर्डे, शैलेश बुगड, काशिनाथ वाघे, राजकुमार वाघमारे, आबाजी सावळे, संजय साळुंखे, कुमार शेळके, अभिजित धायगुडे, राजकुमार पवार, इम्रान जमादार, धिरज सातपुते, अजिंक्य माने, सैपन सय्यद, सुभाष मुंडे, वसिम शेख, राजु भुदगल, महेश पाटील, महेश रोकडे, राजेश मोरे, सिध्दाराम देशमुख, अजय गुंड, सतीश काटे, बाळासाहेब काळे, प्रकाश गायकवाड, मच्छिंद्र राठोड, नामदेव बंडगर, ढवळे, सागर काटे यांच्या पथकाने ही कामगिरी बजावली.

# भयातून विकासाकडे वाटचाल

## मुख्यमंत्री फडणवीस यांचे प्रतिपादन ● गडचिरोली येणार पहिल्या पाच जिल्ह्यांत

◆ **गडचिरोली, २८ डिसेंबर**

गडचिरोली पोलिस दलाने गेल्या काही वर्षांत दाखविलेल्या शौर्यामुळे आज गडचिरोलीत भयाचे नव्हे, तर विकासाचे, जनतेचे आणि संविधानाचे राज्य प्रस्थापित झाले आहे. या परिवर्तनाची साक्ष म्हणून गडचिरोली महोत्सव सुरू झाला असून, तो जिल्ह्यातील नागरिकांसाठी हक्काचा, अभिव्यक्तीचा आणि सहभागाचा मंच ठरत आहे. कला, क्रीडा, लोकप्रबोधन, नृत्य, गायन आणि मनोरंजन यांच्या माध्यमातून समाजजागृती व सांस्कृतिक एकात्मता साधली जात असल्याचे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले.



गडचिरोली महोत्सवात बोलताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

गडचिरोली पोलिस विभागाच्या पुढाकाराने आयोजित गडचिरोली महोत्सव या सांस्कृतिक कार्यक्रमात देवेंद्र फडणवीस बोलत होते. यावेळी गडचिरोलीचे सहपालकमंत्री ॲड. आशिष जयस्वाल, राज्यमंत्री डॉ. पंकज भोयर, अपर पोलिस महासंचालक छेरींग दोरजे, नक्षलविरोधी अभियानाचे विशेष पोलिस महानिरीक्षक संदीप पाटील, जिल्हाधिकारी अविश्यांत पंडा, जिल्हा पोलिस अधीक्षक निलोत्पल, आमदार धर्मरावबाबा आत्राम, डॉ. मिलिंद नरोटे, गोंडवाना विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. प्रशांत बोकारे, लॉयड्स मेटल्स अँण्ड एनर्जी लिमिटेडचे व्यवस्थापकीय संचालक बालसुब्रमण्यम् प्रभाकरन् यांची उपस्थिती होती. गडचिरोली पोलिस दलाने एकीकडे माओवादाविरोधात निर्णायक लढा देत जिल्ह्याला जवळपास मुक्त केले, दुसरीकडे लोकाभिमुखतेतून महसूल प्रशासनासोबत समन्वय साधत राज्य शासनाच्या विविध योजना जिल्ह्याच्या कानाकोपऱ्यापर्यंत पोहोचवल्या, असे मुख्यमंत्र्यांनी सांगितले. आज गडचिरोली जिल्ह्याने भरारी घेतली आहे. शिक्षण, आरोग्य, रोजगार, उद्योग, पर्यावरण अशा प्रत्येक क्षेत्रात जिल्ह्याची झपाट्याने प्रगती होत आहे. पुढील दहा वर्षांत गडचिरोली महाराष्ट्रातील पहिल्या पाच जिल्ह्यांत असेल, असा विश्वास व्यक्त करीत, आगामी काळात दक्षिण भारताचे प्रवेशद्वार म्हणून गडचिरोलीला विकसित करण्यासाठी शासन कटिबद्ध असल्याचे फडणवीस यांनी स्पष्ट केले.

यावेळी सांस्कृतिक कार्यक्रमात विजेत्या स्पर्धकांना फडणवीस यांच्या हस्ते गौरविण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक जिल्हा पोलिस अधीक्षक निलोत्पल यांनी केले. ◀(तभा वृत्तसेवा)


आंध्रप्रदेशचे मुख्यमंत्री चंद्राबाबू नायडू यांनी रविवारी अयोध्येतील राममंदिराला भेट दिली आणि यज्ञशाळेच्या विधीत भाग घेतला. त्यांनी श्री रामललाची प्रार्थना केली तसेच संपूर्ण बांधकामाची उत्सुकतेने पाहणी केली.

ऑनलाईन तभा वाचण्यासाठी
www.tarunbharat.net
वर भेट द्या!

# खलिस्तान्यांचा लंडनमध्ये भारतीय निदर्शकांवर हल्ला

## बांगलादेशातील हिंदू छळाविरोधात आंदोलन करण्यापासून रोखले

◆ **लंडन, २८ डिसेंबर**

बांगलादेशमध्ये हिंदू समुदायांवर होणाऱ्या हल्ल्याचा निषेध करण्यासाठी लंडनमधील बांगलादेश उच्चायुक्तालयाबाहेर भारतीय वंशाच्या नागरिकांनी निदर्शने केली. यावेळी खलिस्तानी समर्थकांनी निदर्शकांना अडवून त्यांच्यावर हल्ला केला.

लंडनमधील बांगलादेशच्या उच्चायुक्तालयासमोर भारतीय वंशाचे नागरिक बांगलादेशात हिंदूंवर होणाऱ्या अत्याचाराविरोधात निदर्शने करण्यासाठी एकत्र जमले होते. त्यावेळी खलिस्तानी समर्थक पोहोचले आणि त्यांनी काही निदर्शकांना मारहाण केली.




याविरोधात पोलिसांत गुन्हा दाखल करण्यात आला. लंडनमधील भारतीय दूतावासाने या घटनेचा निषेध करणारे निवेदन जारी केले आहे.

निवेदनात म्हटले की, बांगलादेश हिंदू असोसिएशन आणि भारतीय समुदायाने बांगलादेशातील हिंदू अल्पसंख्याकांवर होणाऱ्या हल्ल्यांविरोधात आणि दीपूचंद्र दास याच्या क्रूर हत्येचा निषेध करण्यासाठी शनिवारी शांततापूर्ण निदर्शने केली. लंडनमधील उच्चायुक्तालयाबाहेर आंदोलन सुरू असताना काही खलिस्तान समर्थक आले आणि त्यांनी भारतीय वंशाच्या नागरिकांना धमकावत मारहाण केली. पोलिसांनी हस्तक्षेप केल्यानंतर खलिस्तानी समर्थक पसार झाले. नागरिकांच्या तक्रारीवरून पोलिसांनी गुन्हा दाखल केला. भारत या घटनेचा निषेध करतो आणि ब्रिटन सरकारने या प्रकरणाची दखल घेऊन आरोपींवर कठोर कारवाई करावी. ◀(वृत्तसंस्था)

### खलिस्तानी समर्थकांचा हेतू काय?

बांगलादेशातील इस्लामी गट हिंदू अल्पसंख्याकांचा आवाज दाबत आहेत. खलिस्तानी समर्थक परदेशात हिंदूविरोधी आणि भारतविरोधी घटना घडवत आहेत. खलिस्तानी समर्थकांचे कृत्य थेट हिंदूंविरुद्ध नव्हते, तर बांगलादेशातील हिंदू अत्याचाराच्या घटनांवरून लक्ष विचलित करण्यासाठी आणि भारतविरोधी संदेश पसरवण्यासाठी होते. पाकिस्तानी गुप्तचर संस्था आयएसआय पाश्चात्त्य देशांमध्ये खलिस्तानी समर्थकांनी चिथावणी देऊन भारत आणि हिंदूंना पाठिंबा देणारे आवाज दडपण्याचा प्रयत्न करीत आहे.

# मेहनती तरुणांसाठी गौतम अदानी प्रेरणादायी

### शरद पवार यांचे गौरवोद्गार

◆ **बारामती, २८ डिसेंबर**

मेहनती आणि मोठे स्वप्न असलेल्या तरुणांसाठी उद्योजक गौतम अदानी यांचा प्रवास हा प्रेरणादायी आहे, असे गौरवोद्गार शरद पवार गटाचे प्रमुख शरद पवार यांनी काढले. ते रविवारी येथील शरदचंद्र पवार सेंटर फॉर एक्सलन्स इन आर्टिफिशियल इंटेलिजन्सच्या उद्घाटनप्रसंगी बोलत होते.

अदानी समूहाचे अध्यक्ष गौतम अदानी यांनी निधी दिलेल्या या सेंटर ऑफ एक्सलन्सची स्थापना पवार कुटुंबाद्वारे संचालित शिक्षण संस्था असलेल्या विद्या प्रतिष्ठान अंतर्गत करण्यात आली आहे. अदानी हे गुजरातच्या दुष्काळग्रस्त बनासकंठा जिल्ह्यातून आले. मुंबईत येऊन त्यांनी शून्यातून सुरुवात केली आणि आज त्यांचा व्यवसाय २३ राज्यांमध्ये पसरलेला आहे, असे शरद पवार म्हणाले.

अदानी यांचा प्रवास हा मोठी स्वप्ने पाहणाऱ्या मेहनती तरुणांसाठी एक प्रेरणा आहे, असे शरद पवार म्हणाले. शरद पवार यांनी जमिनीवरील



वास्तव आणि राष्ट्रीय अजेंडा यांचा मेळ घातला आहे, असे त्यांना आपला मार्गदर्शक संबोधताना गौतम अदानी म्हणाले.

पवार साहेबांना तीन दशकांपापेक्षा जास्त काळ ओळखण्याचे भाग्य मला लाभले आहे. त्यांच्याकडून मी जे काही शिकलो, त्याला तोड नाही. पण, ज्ञानापलीकडे त्यांची बुद्धिमत्ता आणि सखोल सहानुभूती माझ्यावर एक खोल छाप सोडते, असे अदानी म्हणाले. बारामती हे त्यांच्या दूरदर्शी नेतृत्वामुळे शक्य झालेल्या परिवर्तनाचे आणि अमर्याद क्षमतेचे प्रतीक आहे. ◀(वृत्तसंस्था)

# पेंच अभयारण्यातील गिधाड पोहोचले नाशिकला

## १७ दिवसांत केले ७५० किमी उड्डाण ● अंतिम ठिकाण ठेवले गोपनीय

◆ **मुंबई, २८ डिसेंबर**

महाराष्ट्रातील पेंच व्याघ्र प्रकल्पात या महिन्याच्या सुरुवातीला सोडलेले लांब चोचीचे गिधाड १७ दिवसांत जवळपास ७५० किलोमीटरचा प्रवास करून नाशिक जिल्ह्यातील त्र्यंबकेश्वरजवळील अंजनेरी टेकड्यांच्या जवळ पोहोचल्याची माहिती अधिकाऱ्यांनी रविवारी दिली.

राज्य वन विभाग आणि बॉम्बे नॅचरल हिस्ट्री सोसायटी यांच्या संयुक्त विद्यमाने चालवल्या जाणाऱ्या संवर्धन कार्यक्रमाचा भाग म्हणून ११ डिसेंबर रोजी या गिधाडाला सोडण्यात आले होते. २७ डिसेंबर रोजी हा पक्षी अंजनेरीपासून सुमारे ३८ किलोमीटर अंतरावर पोहोचला. नाशिक प्रदेशात प्रवेश करण्यापूर्वी या गिधाडाने नागपूर, वर्धा, यवतमाळ, हिंगोली, वाशिम, बुलढाणा, जालना आणि छ. संभाजीनगर जिल्ह्यांचा मार्ग अवलंबला. या मागोवा घेतलेल्या गिधाडाच्या सुरक्षेची खात्री करण्यासाठी त्याचे अंतिम ठिकाण गोपनीय ठेवण्यात आल्याचे संस्थेच्या संशोधकांनी सांगितले.

हा पक्षी सायंकाळी विश्रांती घेतो, सकाळी खातो आणि नंतर पुढच्या ठिकाणी उडून जातो. प्रवासादरम्यान त्याने दोन वेळा पूर्ण आहार घेतल्याचे हालचालींवरून दिसून आले, असे बीएनएचएसचे संशोधक मननसिंग यांनी सांगितले. हे गिधाड पेंचमध्ये पिंजऱ्यात वाढवलेल्या पक्ष्यांच्या दुसऱ्या तुकडीचा भाग आहे. एकूण १४ गिधाडांना एप्रिल २०२५ मध्ये हरयाणातील पिंजोर येथून पेंच व्याघ्र प्रकल्पातील विशेष तयार केलेल्या पक्षिगृहात आणले होते. त्यांना जंगलात सोडण्यापूर्वी आठ महिने प्रशिक्षण देण्यात आले. यामध्ये पांढऱ्या पाठीची आठ गिधाडे आणि लांब चोचीची पाच गिधाडांचा समावेश होता.

परिस्थितीशी जुळवून घेतल्यानंतर आणि प्रशिक्षणानंतर, ११ डिसेंबर रोजी मुख्य वन्यजीव संरक्षक श्रीनिवास रेड्डी आणि बीएनएचएसचे अध्यक्ष प्रवीण परदेशी यांनी या पक्ष्यांना सोडले. १२ ते १५ डिसेंबर दरम्यान, सोडलेली सर्व गिधाडे पेंचमधील जंगली गिधाडांसोबत आहार घेताना दिसली, असे अधिकाऱ्यांनी सांगितले. ◀(वृत्तसंस्था)

### बसवले जीपीएस ट्रान्समीटर

जंगलात सोड लेल्या गिधाडांना जीपीएस ट्रान्समीटर बसवण्यात आले आहे. यामुळे सोडलेल्या पक्ष्यांच्या हालचाली, अधिवासाचा वापर आणि जगण्याच्या दराचे दीर्घकालीन वैज्ञानिक निरीक्षण करण्यास मदत होईल. जे-१३२ च्या प्रवासाने पक्षीनिरीक्षकांमध्ये उत्सुकता निर्माण केली आहे.



# ‘ऑपरेशन सिंदूर’ देशासाठी अभिमान

◆ **नवी दिल्ली, २८ डिसेंबर**

पहलगाम हल्ल्याला प्रत्युत्तर म्हणून भारतीय सैन्यदलाने यावर्षी राबविलेले ‘ऑपरेशन सिंदूर’ प्रत्येक भारतीयासाठी अभिमानाचे प्रतीक आहे. आजचा भारत आपल्या सुरक्षेशी तडजोड करत नसल्याचे जगाने पाहिले. सुरक्षा दलाची कामगिरी देशवासीयांसाठी प्रेरणास्पद आहे. आज जग भारताकडे नवीन आशेने पाहत आहे आणि भारताच्या आशेचे कारण युवाशक्ती, विज्ञान आणि तंत्रज्ञानातील कामगिरी असल्याचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी रविवारी ‘मन की बात’मध्ये सांगितले.

वर्षाच्या शेवटच्या ‘मन की बात’च्या १२९ व्या भागात बोलताना मोदी यांनी नवीन वर्ष २०२६ मधील आव्हाने, शक्यता आणि विकासावर भाष्य केले. पंतप्रधान म्हणाले, २०२५ मध्ये राष्ट्रीय सुरक्षा, खेळ, वैज्ञानिक नवोपक्रमासह विविध क्षेत्रांत भारताचा प्रभाव दिसून आला.

पार्वती गिरी यांचे स्मरण करताना मोदी म्हणाले, अशाच एका स्वातंत्र्यसैनिक म्हणजे ओडिशाच्या पार्वती गिरी. जानेवारी २०२६ मध्ये त्यांची जन्मशताब्दी साजरी केली जाईल. वयाच्या १६ व्या वर्षी त्यांनी भारत छोडो चळवळीत भाग घेतला. त्यांनी समाजसेवा आणि आदिवासी कल्याणासाठी आपले जीवन समर्पित केले. त्यांचा जीवनप्रवास आपल्यासाठी प्रेरणास्पद आहे. ◀(वृत्तसंस्था)

### प्रतिजैविकांवर व्यक्त केली चिंता

इंडियन कौन्सिल ऑफ मेडिकल रिसर्च अर्थात् आयसीएमआर संस्थेने अलिकडेच एक अहवाल प्रसिद्ध केला आहे. त्यात न्यूमोनिया आणि यूटीआय सारख्या अनेक आजारांवर प्रतिजैविके कुचकामी ठरत असल्याचे नमूद आहे. ही आपल्या सर्वांसाठी चिंतेची मोठी बाब आहे. डॉक्टरांच्या सल्ल्याशिवाय कोणत्याही प्रकारचे औषध घेऊ नये, असे आवाहन मोदी यांनी केले.




### दिग्विजयसिंह, शशी थरूर काँग्रेसला कधी घालणार टोपी?

**नरेंद्र मोदी** यांचे एक जुने छायाचित्र ‘एक्स’वर पोस्ट करीत काँग्रेसचे ज्येष्ठ नेते आणि मध्यप्रदेशचे माजी मुख्यमंत्री दिग्विजयसिंह यांनी राजकीय वर्तुळात खळबळ उडवली. दिग्विजयसिंह एवढ्यावरच थांबले नाही तर, त्यांनी संघ आणि भाजपा यांच्या संघटनशक्तीचे कौतुकही केले. जयसीयाराम म्हणत रामाचे नावही घेतले. काँग्रेसने आपल्या कार्यपद्धतीत सुधारणा करण्याचा घरचा अहेर काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खडगे आणि लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांना केला.

गेल्या काही महिन्यांपासून हे काम काँग्रेसचे दुसरे नेते शशी थरूर करीत होते. त्यात आता दिग्विजयसिंह यांची भर पडली. दिग्विजयसिंह यांनी व्यक्त केलेल्या मतांशी मी सहमत असल्याचे, काँग्रेसने आपल्या संघटनेत सुधारणा केल्या पाहिजे, याचा आग्रह मी अनेक महिन्यांपासून धरत आहे, असे ते म्हणाले. शनिवारी झालेल्या काँग्रेस कार्यसमितीच्या बैठकीला शशी थरूर उपस्थित होते. विशेष म्हणजे, याआधी दोनदा झालेल्या कार्यसमितीच्या बैठकीला थरूर अनुपस्थित होते.

थरूर काँग्रेसपासून हळूहळू दूर होत असल्याचे जाणवत आहे, थरूर यांना कसे हाताळावे, ते काँग्रेसला समजत नाही. त्यात आता दिग्विजयसिंह यांची भर पडेल, असे दिसते. काँग्रेसच्या राष्ट्रीय अध्यक्षपदाची निवडणूक शशी थरूर यांनी मल्लिकार्जुन खडगे यांच्याविरुद्ध लढवली होती. यात त्यांचा पराभव झाला, पण आपला खडगे यांच्या अध्यक्षपदाला विरोध आहे, त्यांना आपण अविरोध निवडून येऊ देणार नाही, असे थरूर यांनी दाखवून दिले.

रविवारी झालेल्या काँग्रेसच्या स्थापना दिन कार्यक्रमाला शशी थरूर आणि दिग्विजयसिंह उपस्थित होते. या दोघांना कार्यक्रमात पाहून अनेक काँग्रेस नेत्यांच्या कपाळावर आठ्या आल्या. विशेष म्हणजे, दोघे आजुबाजूलाच बसले होते आणि दोघांच्याही डोक्यावर काँग्रेसची टोपी होती. स्वतःला टोपी घालणारे हे दोन नेते काँग्रेसला आता कधी टोपी घालतात, याकडे सगळ्यांचे लक्ष राहणार आहे.

●● ●●

### व्यंकया नायडू सदैव अटल न्यासाच्या अध्यक्षपदी

**माजी पंतप्रधान** भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी यांच्या १०१ व्या जयंतीनिमित्त सदैव अटल या त्यांच्या समाधीस्थळावर येत राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू, उपराष्ट्रपती सी. पी. राधाकृष्णन् आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यासह अनेक मान्यवरांनी त्यांना आदरांजली वाहिली. या कार्यक्रमात आणखी एक एक ज्येष्ठ नेते सहभागी झाले होते, ते होते माजी उपराष्ट्रपती व्यंकय्या नायडू. या कार्यक्रमात नायडू माजी उपराष्ट्रपती म्हणून नाही तर, अटल स्मृती न्यास सोसायटीचे नवे अध्यक्ष म्हणून या कार्यक्रमात सहभागी झाले.

राजशिष्टाचाराचे कार्यक्रम सोडले तर, नायडू यांचा सार्वजनिक कार्यक्रमात सहभाग फारसा दिसत नाही. आतापर्यंत विजयकुमार मल्होत्रा या न्यासाचे अध्यक्ष होते. पण, त्यांच्या निधनामुळे ही जागा रिक्त झाली होती. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या उपस्थितीत नायडू यांच्या त्यागराज मार्गावरील निवासस्थानी झालेल्या न्यासाच्या बैठकीत नायडू यांची अध्यक्षपदी निवड करण्यात आली. रामबहादूर राय यांनी न्यासाच्या बैठकीत अध्यक्षपदासाठी नायडू यांचे नाव सूचवले, ते एकमताने मान्य करण्यात आले. अरुणसिंह यांनी न्यासाच्या भविष्यातील योजनांचा आढावा सादर केला. २५ डिसेंबर २०१८ ला सदैव अटल स्मृतिस्थळाचे लोकार्पण करण्यात आले होते.

●● ●●

### अन् मनोहरलाल खट्टर रांगेत झाले उभे...

**हरयाणा** मैत्री दिवसानिमित्त दिल्लीतील पोलिस मेसमध्ये एका सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाचे आयोजन हरयाणा पोलिसांच्या वतीने करण्यात आले होते. कार्यक्रमाला शहरी विकास मंत्री मनोहरलाल खट्टर उपस्थित होते. खट्टर हे मूळ हरयाणाचे आहेत. हरयाणाचे मुख्यमंत्रिपद त्यांनी भूषवले आहे. या हरयाणा संबंधातून खट्टर या कार्यक्रमासाठी दिल्ली पोलिस मेस परिसरात आले. या कार्यक्रमात उपस्थितांना आधी आपल्या नावाची नोंदणी करायची होती. नोंदणी केल्यावर किमान ३५०० रुपये देणगी देणे अपेक्षित होते. देणगी दिल्यानंतरच या कार्यक्रमात भोजनाची थाळी मिळणार होती. नावाची नोंदणी करण्यासाठी अनेक मान्यवर रांगेत उभे होते. कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे असलेले मनोहरलाल खट्टर केंद्रीय मंत्री म्हणून आपला प्रोटोकॉल सोडून या रांगेत उभे झाले आणि आपला क्रमांक आल्यावर त्यांनी आपल्या नावाची नोंदणी केली तसेच अपेक्षित देणगीही दिली. या प्रकारचा झालेला हा दुसरा कार्यक्रम होता. हरयाणाशी संबंधित अनेक मान्यवरांना या कार्यक्रमासाठी आमंत्रित करण्यात आले होते, त्यात सरन्यायाधीश सूर्य कांत आणि दिल्लीच्या मुख्यमंत्री रेखा गुप्ता उपस्थित होते.

●● ●●

### पंकज चौधरी लागले कामाला

**केंद्रीय** अर्थराज्यमंत्री पंकज चौधरी यांची उत्तरप्रदेश भाजपाचे अध्यक्ष म्हणून नियुक्ती झाली आहे. त्यामुळे चौधरी यांना अर्थराज्यमंत्रिपदाचा राजीनामा द्यावा लागेल, अशी चर्चा सुरू झाली आहे. चौधरी यांनी प्रदेश भाजपाचे अध्यक्ष म्हणून सूत्रे स्वीकारली असून, कामाला सुरुवातही केली आहे. त्यामुळे आता त्यांचा जास्तीत जास्त मुक्काम राजधानी लखनौ आणि उत्तरप्रदेशमध्ये असतो. त्यामुळे त्यांचे अर्थमंत्रालयात येणेही कमी झाले आहे. मागील आठवड्यात हम्पी येथे एक चिंतनशिबिर झाले. या शिबिरात अर्थमंत्रालय तसेच कार्पोरेट मंत्रालयाचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. या शिबिरात अर्थराज्यमंत्री म्हणून पंकज चौधरी यांनी सहभागी होणे अपेक्षित होते, पण ते आले नाही. २०२७ मध्ये उत्तरप्रदेश विधानसभेची निवडणूक होऊ घातली आहे. त्यामुळे आपला पूर्ण फोकस चौधरी यांनी उत्तरप्रदेशवर केला आहे. उत्तरप्रदेशात सलग तिसऱ्यांदा भाजपाला सत्तेवर आणण्याचे आव्हान मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांच्या मदतीने चौधरी यांना पेलायचे आहे. अर्थसंकल्पीय अधिवेशनानंतर चौधरी अर्थ राज्यमंत्रिपदाचा राजीनामा देऊ शकतात. पण, खासदार म्हणून ते कायम राहतील, असे मानले जाते.

● **दिल्लीवाला**

# वाघाच्या हल्ल्यात दोन मजूर ठार

## चिचपल्ली वनपरिक्षेत्रातील घटना

◆ **मूल, २८ डिसेंबर**

बांबू कटाईचे काम करताना एकाच दिवशी दोन वेगवेगळ्या ठिकाणी अवघ्या पाऊण तासांत वाघाच्या हल्ल्यात दोन मजूर ठार झाले. ताडोबाच्या बफर क्षेत्रातील मामला व महादवाडी परिसरात शनिवारी या घटना घडल्या. प्रेमसिंग दुखी उदे, बुदसिंग श्यामलाल मडावी अशी मृतकांची नावे आहेत.



चिचपल्ली बफर क्षेत्रात बांबू कटाईचे काम सुरू आहे. वनविभागाने बालाघाट येथून कामासाठी मजूर बोलावले आहेत. काही मजूर महादवाडी बिट, तर काही मामला बिटमध्ये बांबू कटाईचे काम करीत आहेत. मामला बिटमधील कक्ष क्रमांक ३८१ मध्ये शनिवारी दुपारी बुदशिंग मडावी यांच्यावर अचानक वाघाने हल्ला चढवून जागीच ठार केले. ही घटना ताजी असताना पाऊण तासाच्या फरकाने चिचपल्ली वनपरिक्षेत्रातील महादवाडी बफर झोन कक्ष क्रमांक ३५७ मध्ये प्रेमसिंग दुखी उदे यांच्यावर वाघाने हल्ला चढवून जागीच ठार केले.

वनविभागाच्या विरोधात दिवसेंदिवस वातावरण तापत असून, वनविभाग अजून किती नागरिकांचे बळी घेणार? असा प्रश्न उपस्थित केला जात आहे. घटनेची माहिती कळताच वनाधिकाऱ्यांनी घटनास्थळी धाव घेऊन दोन्ही मृतदेहांचा पंचनामा केला व पीडिताच्या कुटुंबीयांना आर्थिक सानुग्रह मदत केली. ◀(तभा वृत्तसेवा)

### वाघाच्या सानिध्यात ३१ मजुरांचा पाच दिवस मुक्काम

**चंद्रपूर** : जूनोना मार्गावरील जंगलातही जवळपास ३१ मजूर बांबू कटाईच्या कामासाठी पाच दिवसांपासून राहत आहेत. काल रात्री वाघाची डरकाळी आमच्या तात्पुरत्या झोपड्यांपासून काहीच अंतरावर सातत्याने ऐकू येत होती. आम्ही लगेच आग पेटवली आणि झोपेतून उठून बसलो, अशी व्यथा मजुरांनी बंडू धोतरे यांच्याकडे सांगितली. ठेकेदाराने आम्हाला पाच दिवसापूर्वी जंगलात आणून सोडले आणि तेव्हापासून त्यांचे तोंडदेखील आम्ही बघितले नाही. या मजुरांना काही झाले तर, कुणाची जबाबदारी? वनविभागाची की ठेकेदाराची? असा प्रश्न उपस्थित केला जात आहे.

# ‘ऑपरेशन सिंदूर’मध्ये नूरखान वायुतळ उद्ध्वस्त

## पाकिस्तानच्या परराष्ट्र मंत्र्याची कबुली | भारताच्या हल्ल्यात सैनिक मृत्युमुखी | जखमींची संख्या शंभरपेक्षा अधिक

**◆ इस्लामाबाद, २८ डिसेंबर**

भारताने राबविलेल्या ‘ऑपरेशन सिंदूर’दरम्यान नूरखान वायुतळ उद्ध्वस्त झाला. त्याची दुरुस्ती अद्यापही झालेली नाही. भारताच्या हल्ल्यात पाकिस्तानी सैन्यातील अनेक सैनिकांचा मृत्यू झाला. शेकडो जण जखमी झाल्याची कबुली पाकिस्तानचे परराष्ट्र मंत्री इशाक दार यांनी दिली. एकीकडे देशातील नेते पहिल्या दिवशी भारताचा पराभव झाला असल्याचा दावा करीत आहेत. त्या पृष्ठभूमीवर दार यांची कबुली महत्त्वपूर्ण ठरत आहे.





एका कार्यक्रमात बोलताना दार म्हणाले, ‘ऑपरेशन सिंदूर’दरम्यान भारताच्या अचूक हल्ल्यांमुळे चकलाल येथील नूरखान वायुतळाचे मोठे नुकसान झाले. भारताने ३६ तासांत पाकिस्तानी हद्दीत ८० ड्रोन हल्ले केले आणि यातील एक ड्रोन लष्करी तळावर धडकले. यात सुरक्षा दलातील अनेक जवानांचा मृत्यू झाला, तर शेकडोंच्या संख्येत जवान जखमी झाले. हवाई संरक्षण प्रणालीने भारताचे ७९ ड्रोन हवेतच उडवले होते. भारताचे हल्ले लष्करी ठिकाणांना नुकसान पोहोचविण्यासाठी करण्यात आले.


भारताच्या हल्ल्यामुळे लष्करी आणि वायुतळाचे झालेल्या नुकसानीची झळ अजूनही पाकिस्तानला बसत आहे. नुकसान झालेल्या तळाची दुरुस्ती अद्याप पूर्ण झालेली नाही. भारताला प्रत्युत्तर देण्यासाठी आमच्या सैन्याने निकरीचा लढा दिला, मात्र सैन्य प्रतिष्ठानांचे नुकसान झाल्याने आम्ही ताकदीने लढा देऊ शकलो नाही. भविष्यातील आव्हाने लक्षात घेऊन पाकिस्तानी सैन्यदल तयारी करीत आहे. आगामी काळात भारतासोबत युद्धाची शक्यता नाकारता येत नाही असेही त्यांनी यावेळी सांगितले.

### ११ लष्करी तळांचे नुकसान

**‘ऑपरेशन सिंदूर’दरम्यान पाकिस्तानी लष्करी तळ आणि वायुतळाला लागलेल्या आगीचे व्हिडीओ पाकिस्तानी नागरिकांनी समाज माध्यमावर प्रसारित केले होते. एकूण ११ पाकिस्तानी लष्करी ठिकाणांच्या उपग्रह प्रतिमा आणि व्हिडीओंद्वारे नुकसानीचे ठोस पुरावेही जारी झाले आहेत.**

दरम्यान, १३ मे रोजी मॅक्सर टेक्नॉलॉजीजने घेतलेल्या उपग्रह प्रतिमांमध्ये पाकिस्तानच्या नूर खान हवाई तळाचे नुकसान झाल्याचे दिसून आले. तथापि, पाकिस्तान हा दावा फेटाळला होता. मात्रा, आता दार यांनी जाहीरपणे याची कबुली दिली. (वृत्तसंस्था)

### सैन्य बंकरमध्ये लपले



‘ऑपरेशन सिंदूर’वर बोलताना पाकिस्तानचे राष्ट्रपती आसिफ अली झरदारी एका कार्यक्रमात म्हणाले, भारताच्या आक्रमक हल्ल्यांमुळे सुरक्षेसाठी पाकिस्तानी सैनिकांनी बंकरमध्ये आश्रय घेतला होता. लष्करप्रमुखांनी सुरक्षा दलाला बंकरमध्ये लपण्याचा सल्ला दिला होता. भारतीय सैन्याने लष्करी तळांना लक्ष्य करीत ड्रोन हल्ले केल्याने तेथे राहणे आमच्या सुरक्षा दलासाठी धोकादायक होते. त्यामुळे बंकरमध्ये आश्रय घेण्याचा पर्याय निवडण्यात आल्याचे त्यांनी नमूद केले.

### नूरखानवर ४०० सैनिक ठार



पाकिस्तानी परराष्ट्र मंत्री दार यांच्या टिप्पणीवर वृत्तसंस्थेशी बोलताना भारतीय लष्कराचे निवृत्त अधिकारी लेफ्टनंट जनरल के. जे. एस. ढिल्लन म्हणाले, दार खोटे बोलतात. पण, अनवधानाने सत्य उघड करतात. नूरखान वायुतळावर झालेल्या हल्ल्यात पाकिस्तानचे ४०० सैनिक ठार झाले होते. १४ ऑगस्ट रोजी पाकिस्तानी सरकारने १३८ जवानांची यादी प्रकाशित केली होती. ‘ऑपरेशन सिंदूर’मध्ये ठार झालेल्यांना मरणोपरांत शौर्य पदक जाहीर झाले होते.

## बिहारमध्ये मालगाडीचे आठ डबे घसरले

**◆ कोलकाता, २८ डिसेंबर**

बिहारच्या जमुई जिल्ह्यात एका मालगाडीचे आठ डबे रुळावरून घसरले. यामुळे हावडा-पाटणा-दिल्ली मार्गावरील रेल्वे सेवा विस्कळीत झाली. या घटनेत अद्याप कोणतीही जीवितहानी झाल्याचे वृत्त नसल्याचे अधिकाऱ्यांनी सांगितले.

या अपघातामागील कारणांचा शोध घेण्यासाठी चौकशी करण्याचा आदेश देण्यात आला. हा अपघात शनिवारी रात्री ११.२५ च्या सुमारास पूर्व रेल्वेच्या आसनसोल विभागांतील लहाबोन आणि सिमुलतला रेल्वे स्थानकांदरम्यान झाला. यामुळे रात्रभर सुमारे २४ गाड्यांची वाहतूक विस्कळीत झाली. परिणामी, प्रवाशांना गैरसोयीचा सामना करावा लागला. आसनसोल, मधुपूर आणि झाझा स्थानकांतून घटनास्थळी अपघात मदत गाड्या पाठवण्यात आल्या. रुळांच्या दुरुस्तीचे काम युद्धपातळीवर सुरू होते. मार्ग बंद झाल्याने अनेक एक्सप्रेस आणि इतर प्रवासी गाड्या रद्द करण्यात आल्या किंवा त्यांचा मार्ग बदलण्यात आला, असे पूर्व रेल्वेच्या अधिकाऱ्याने सांगितले. (वृत्तसंस्था)



पश्चिम बंगालची राजधानी कोलकाता येथे रविवारी आयोजित केलेल्या ‘फिट इंडिया संडेज ऑन सायकल’मध्ये सहभागी झालेले नागरिक

# मेहबूबा मुफ्तींसह १२ नेते नजरकैदेत

## विद्यार्थी आंदोलनाच्या पृष्ठभूमीवर सावधगिरीचा उपाय

**◆ श्रीनगर, २८ डिसेंबर**

जम्मू-काश्मीरमधील आरक्षण धोरणाविरुद्ध नियोजित विद्यार्थ्यांच्या आंदोलनाच्या पृष्ठभूमीवर कायदा व सुव्यवस्थेची परिस्थिती लक्षात घेता पोलिसांनी पीपल्स डेमोक्रॅटिक पार्टी अर्थात् पीडीपीच्या अध्यक्ष मेहबूबा मुफ्ती आणि नॅशनल कॉन्फरन्सचे खासदार आगा सय्यद रुहुल्लाह मेहदी यांच्यासह १२ नेत्यांना रविवारी नजरकैद केले.

एका पोलिस अधिकाऱ्याने सांगितले की, विद्यार्थ्यांच्या आंदोलनाला पीडीपी पक्ष आणि खासदार मेहदी यांनी पाठिंबा दर्शवला होता. या आंदोलनात सहभागी होणार असल्याचे त्यांनी जाहीर केल्यानंतर राज्यातील शांततेसाठी मेहबुबा मुफ्ती त्यांची मुलगी इल्तिजा मुफ्ती, श्रीनगर लोकसभा सदस्य रुहुल्लाह मेहदी, पीडीपी नेते वाहीद पर्रा आणि श्रीनगरचे माजी महापौर जुनैद मट्टू यांच्यासह १२ नेत्यांना नजरकैदेत ठेवण्यात आले.

मुख्यमंत्री ओमर अब्दुल्ला यांनी आरक्षणाच्या प्रश्नावर समिती स्थापन केली. मात्र, समितीने अद्याप अहवाल दिलेला नाही. यामुळे संतप्त झालेल्या विद्यार्थी संघटनेने मोर्चा काढण्याचा निर्णय घेतला. मेहदी यांनी ‘एक्स’वरील पोस्टमध्ये म्हटले की, जम्मू-काश्मीरमधील सरकारचा आरक्षणाचा प्रश्न सोडवण्याचा कोणताही हेतू नाही. त्यामुळे आमचा विद्यार्थ्यांच्या मोर्चाला पाठिंबा आहे. (वृत्तसंस्था)

# हादीचे दोन मारेकरी भारतात पळाले

### बांगलादेश पोलिसांचा दावा

### मेघालयमार्गे सीमा ओलांडली

**◆ ढाका, २८ डिसेंबर**

कट्टरपंथी बांगलादेशी संघटना इन्किलाब मंचचा प्रवक्ता आणि विद्यार्थी नेता शरीफ उस्मान हादीची हत्या करणारे दोन संशयित आंतरराष्ट्रीय सीमा ओलांडून भारतात पळून गेल्याचा दावा ढाका महानगर पोलिसांनी केला. मारेकरी बांगलादेशातून मेघालय राज्यात गेल्याचे त्यांनी म्हटले आहे.

ढाका पोलिसांचे अतिरिक्त आयुक्त एस. एन. नजमुल इस्लाम यांनी पत्रकार परिषदेत सांगितले की, हल्लेखोरांनी मैमनसिंग शहरातील हलुआघाट सीमेवरून बेकायदेशीरपणे भारतात प्रवेश केला आणि आता ते मेघालयातील तुरा येथे लपून बसल्याची गोपनीय माहिती आमच्याकडे आहे. हादीची हत्या करणाऱ्या आरोपींची नावे फैसल करीम मसूद आणि आलमगीर शेख अशी आहेत.



दोघांनी स्थानिक साथीदारांच्या मदतीने सीमा ओलांडली. सीमा ओलांडल्यानंतर पूर्ती नावाच्या त्यांची मदत केली. सामी नावाच्या टॅक्सी चालकाने त्यांना मेघालयातील तुरा येथे नेले. भारतीय अधिकाऱ्यांनी संशयितांना मदत करणाऱ्या दोन व्यक्तींना ताब्यात घेतले. सध्या, बांगलादेश सरकार संशयितांना अटक आणि प्रत्यार्पण सुनिश्चित करण्यासाठी भारताच्या संपर्कात आहे. (वृत्तसंस्था)

### आरोपींच्या प्रत्यार्पणासाठी प्रयत्न सुरू

इस्लाम यांनी पुढे सांगितले की, बांगलादेश सरकार आरोपींना परत आणण्यासाठी भारतीय अधिकाऱ्यांच्या संपर्कात आहे. आरोपींना अटक आणि प्रत्यार्पण सुनिश्चित करण्यासाठी परराष्ट्र मंत्रालयाचे अधिकारी प्रक्रिया करीत आहे. दरम्यान, १२ डिसेंबर रोजी हादीवर गोळीबार करण्यात आला होता. त्यानंतर १८ डिसेंबर रोजी सिंगापूरमध्ये उपचारादरम्यान त्याचे निधन झाले. तेव्हापासून बांगलादेशात हिसांचार सुरू आहे. कट्टरवाद्यांनी चितगावमध्ये एका हिंदू तरुणाची जाळून हत्या केली होती.

# दोन सेकंदात ताशी ७०० किमीचा वेग

### चिनी ट्रेनने घडवला इतिहास

**◆ बीजिंग, २८ डिसेंबर**

चीनने हाय-स्पीड वाहतुकीत आणखी एक मोठी झेप घेतली आहे. एका सुपरफास्ट मॅनेटिक लेव्हिटेशन (मॅग्लेव्ह) ट्रेनने केवळ दोन सेकंदात ताशी ७०० किलोमीटरचा वेग गाठून नवा जागतिक विक्रम प्रस्थापित केला आहे. ही आतापर्यंतची सर्वांत वेगवान सुपरकंडक्टिंग इलेक्ट्रिक मॅग्लेव्ह ट्रेन असल्याचे मानले जाते.

ही चाचणी चीनच्या नॅशनल युनिव्हर्सिटी ऑफ डिफेन्स टेक्नॉलॉजीच्या शास्त्रज्ञांनी केली. चाचणी दरम्यान सुमारे एक हजार किलो (एक टन) वजनाची ट्रेन ४०० मीटर लांबीच्या ट्रॅकवर धावली. विशेष म्हणजे, इतक्या वेगाने पोहोचल्यानंतरही, ट्रेन सुरक्षितपणे थांब्यावर आली. ही मॅग्लेव्ह ट्रेन रुळांना स्पर्श करीत नाही. सुपरकन्डक्टिंग मॅग्नेट ट्रेनला उचलते, हवेत तरंगवत ठेवते आणि नंतर पुढे ढकलते. चाके आणि रुळांमध्ये घर्षण नसल्यामुळे, ट्रेन अत्यंत वेगाने धावू शकते. चाचणीचा एक व्हिडीओ समोर आला आहे. यामध्ये ट्रेन क्षणार्धात विजेप्रमाणे लकाकून गायब होते. मागे केवळ एक मंद अस्पष्ट रेषा उरते, जणू काही ती एखाद्या विज्ञानकथेतील चित्रपटातील दृश्य आहे.

**क्यूआर कोड स्कॅन करा आणि बघा विशेष व्हिडीओ**

शास्त्रज्ञांच्या मते, या तंत्रज्ञानाद्वारे निर्माण होणारा वेग आणि शक्ती इतकी उत्तम आहे की, ती अग्निबाण प्रक्षेपणासाठीही वापरली जाऊ शकते.

भविष्यात, या तंत्रज्ञानामुळे शहरांमध्ये काही मिनिटांत प्रवास करणे शक्य होऊ शकते. हे तंत्रज्ञान हायपरलूपसारख्या भविष्यातील प्रवास प्रणालींसाठी वापरणे शक्य आहे. तिथे गाड्या व्हॅक्यूम ट्यूबमध्ये अत्यंत उच्च वेगाने प्रवास करतील. (वृत्तसंस्था)

### अंतराळ, विमानचालनात वापर शक्य

साऊथ चायना मॉर्निंग पोस्टनुसार, या प्रणालीने अल्ट्रा-हाय-स्पीड इलेक्ट्रोमॅग्नेटिक प्रोपल्शन, इलेक्ट्रिक सस्पेंशन मार्गदर्शन आणि सुपरकन्डक्टिंग मॅग्नेटसह अनेक किचकट तांत्रिक आव्हाने सोडवली आहेत. हे तंत्रज्ञान भविष्यातील अंतराळ, अग्निबाण आणि विमानचालन क्षेत्रातही वापरणे शक्य आहे. यामुळे विमान आणि अग्निबाण सहज उड्डाण करू शकतात, इंधनाचा वापर कमी करू शकतात आणि पर्यायाने खर्च कमी होऊ शकतो.

## काश्मीरचे तापमान शून्याच्या खाली

**गुलमर्ग :** काश्मीर खोऱ्यात किमान तापमानात मोठी घट नोंदवली गेली आहे. अनेक ठिकाणी पारा शून्याखाली नोंदवला गेला. हवामान विभागाच्या माहितीनुसार, श्रीनगरमध्ये किमान तापमान उणे २.६ होते. जम्मू-काश्मीरमध्ये सर्वांत कमी तापमान सोनमर्गचे होते. तिथे तापमान उणे ५.८ नोंदवले गेले. हिमाचल प्रदेशातील कुकुमसेरी येथेही तापमान शून्याच्या खाली होते.

## चित्रपट वार्ता

### ‘बॅटल ऑफ गलवान’चा टीझर प्रदर्शित

**मुंबई :** बॉलिवूडचा भाईजान सलमान खानने ६० व्या वाढदिवसानिमित्त चाहत्यांना सरप्राईज दिले. त्याच्या बहुप्रतीक्षित ‘बॅटल ऑफ गलवान’ या चित्रपटाचा टीझर प्रदर्शित झाला. यात सलमान एका सैनिकाच्या म्हणजेच कर्नल बी. संतोष बाबू यांच्या भूमिकेत दिसणार आहे. हा चित्रपट गलवान खोऱ्यातील भारत-चीन संघर्षावर आधारित आहे, जो आपल्या सैन्याच्या शौर्याची गाथा दाखवेल. सलमान यात ॲक्शन, भावना आणि देशभक्ती दाखवण्यात आली आहे. टीझर पाहूनच चाहत्यांची चित्रपट पाहण्याची उत्सुकता वाढली आहे. अपूर्व लाखिया दिग्दर्शित हा चित्रपट भारत-चीनच्या गलवान खोऱ्यातील संघर्षावर आधारित आहे. हा आपल्या सैन्याच्या धैर्याची, शौर्याची आणि त्यागाची कथा सांगेल. हा चित्रपट मार्चमध्ये येणार होता. याच दिवशी धुरंधर-२ देखील प्रदर्शित होणार होता. आता हा चित्रपट १७ एप्रिलला प्रदर्शित होणार आहे.



# दिल्लीत ४० हजार बोगस डॉक्टर

**◆ नवी दिल्ली, २८ डिसेंबर**

दिल्लीतील बोगस डॉक्टरांचा मुद्दा पुन्हा चर्चेत आला आहे. दिल्ली मेडिकल कौन्सिलच्या उदासीनतेमुळे हजारो लोकांचे जीवन संकटात आहेत. येथे ४० हजार बोगस डॉक्टर्स सक्रिय आहेत. एक आरटीआयअंतर्गत प्राप्त माहितीने याचा थोडक्यात छडा लावला आहे.



दिल्लीमध्ये दोन वर्षांपासून केवळ एका बोगस डॉक्टरविरुद्ध एफआयआर नोंदविण्यात आला आहे. या प्रकरणात दिल्लीतील अनेक लोकांनी आपला जीव गमवलेला. दिल्लीतील हजारो बोगस डॉक्टर त्यांच्या उपचारांद्वारे लोकांची फसवणूक करीत आहेत. यात अनेक गरीब आणि अशिक्षित रुग्णांचा समावेश आहे. यातील अनेकांना या फसवणुकीची कल्पना देखील नाही. २०२४ मध्ये एकूण नऊ प्रकरणांची तपासणी केली गेली. मात्र, यात एकही प्रकरण एफआयआरमध्ये रुपांतरित झाले नाही. २०१५ मध्ये दिल्ली उच्च न्यायालयाने एका समितीची स्थापना केली होती. ती प्रत्येक महिन्यात दिल्लीमध्ये छापेमारी करण्याची जबाबदारी घेणार होती. यातील कार्यवाहीने त्याच्या मूळ उद्दिष्टांनुसार योग्यरीत्या काम केलेले नाही. असे चित्र दर्शविते की, उच्च न्यायालयाच्या आदेशांची आणि नियमांची अंमलबजावणी योग्य पद्धतीने केली जात नाही, असे दिल्ली मेडिकल कौन्सिलच्या एंटी क्वॅकरी सेलचे माजी अध्यक्ष आणि आरोग्य तज्ज्ञ डॉ. अनिल बंसल यांनी सांगितले. (वृत्तसंस्था)

## मणिपुरात शस्त्रास्त्रे जप्त; दोघांना अटक

**◆ इम्फाळ, २८ डिसेंबर**


मणिपूरच्या इम्फाळ पूर्व जिल्ह्यातून दोघांना अटक करून त्यांच्याकडून शस्त्रे आणि दारुगोळा जप्त करण्यात आल्याची माहिती पोलिसांनी रविवारी दिली. ही कारवाई शनिवारी करण्यात आली. रेबंता क्षत्रिमयुमला त्याच्या घरातून अटक करण्यात आली. त्याच्या ताब्यातून एक ९ मिमी पिस्तूल आणि १८ काडतुसे जप्त करण्यात आली. सुरक्षा दलांनी हाओतान थांगजाम खुनौ भागातील रहिवासी अरिबाम गुनिंद्रो शर्मा यालाही अटक केली. (वृत्तसंस्था)













### २०२६ मध्ये प्रदर्शित होणार अनेक मोठे चित्रपट

**मुंबई :** २०२६ हे वर्ष चित्रपटप्रेमींसाठी खास असणार आहे. २०२६ मध्ये अनेक मोठे चित्रपट प्रदर्शित होणार आहेत. मोठ्या सुपरस्टारचे बहुप्रतिक्षित चित्रपटही यावर्षी प्रदर्शित होतील. शाहरुख खानचा बहुप्रतीक्षित चित्रपट ‘किंग’ प्रदर्शित होणार आहे. नितेश तिवारी यांच्या ड्रीम प्रोजेक्ट रामायणचा पहिला भाग या वर्षी प्रदर्शित होणार आहे. आदित्य धर दिग्दर्शित धुरंधरच्या पहिल्या भागाने यावर्षी खळबळ उडवून दिली. पुढच्या वर्षी, भाग-२ प्रदर्शित होणार आहे. १९९७ मध्ये प्रदर्शित झालेला चित्रपट ‘बॉर्डर’चा सिक्वेल ‘बॉर्डर-२’ २३ जानेवारी रोजी प्रदर्शित होणार आहे. अजय देवगण, तब्बू यांचा ‘दृश्यम-३’ हा चित्रपट ऑक्टोबरमध्ये प्रदर्शित होणार आहे. यंदाचे हे वर्ष प्रेक्षकांसाठी मनोरंजनाने परिपूर्ण असणारे आहे.

### ‘संदेसे आते है’ नव्या स्वरूपात

**मुंबई :** ‘बॉर्डर’ चित्रपटातील गाणे ‘संदेसे आते है’ आजही लोकप्रिय आहे. आता ‘बॉर्डर-२’ प्रदर्शित होत आहे. यासोबतच हे लोकप्रिय गाणे देखील नव्याने प्रदर्शित होणार आहे. या गाण्याचे पुनर्निर्मित आवृत्ती २ जानेवारी रोजी लोंगेवाला येथे अधिकृतपणे प्रदर्शित केली जाईल. ‘बॉर्डर-२’मध्ये, गाण्याचे शीर्षक ‘घर कब आओगे’ असेल. सेन्सॉर बोर्डाने गाण्याचे शीर्षक बदलण्यास सांगितले. परिणामी, सेन्सॉर प्रमाणपत्रातून मिळालेल्या माहितीनुसार, ‘बॉर्डर-२’मधील ‘संदेसे आते हैं’ च्या पुनर्निर्मित आवृत्तीचे नाव ‘घर कब आओगे’ असे ठेवण्यात आले आहे. हा ट्रॅक कोणत्याही कटशिवाय पास झाला आहे आणि त्याचा रनटाइम तीन मिनिटे आणि २३ सेकंद आहे.










# डोनाल्ड ट्रम्प यांच्या निर्णयांनी हादरले जग

**डोनाल्ड ट्रम्प यांचा अमेरिकी राष्ट्राध्यक्षपदाचा दुसरा कार्यकाळ सुरू झाला. दुसऱ्या कार्यकाळातील त्यांचे पहिले वर्ष जगाला हादरवणारे ठरले. जागतिक राजकारण आणि आंतरराष्ट्रीय संतुलनासाठी २०२५ अशांत वर्ष ठरले. जानेवारी २०२५ पासून डोनाल्ड ट्रम्प यांनी अनेक मोठे आणि वादग्रस्त निर्णय घेतले. याचा परिणाम अमेरिकेसह संपूर्ण जगावर झाला. ट्रम्प यांनी २०२५ मध्ये घेतलेले पाच सर्वांत मोठे निर्णय हे आंतरराष्ट्रीय समुदायासाठी धक्कादायक ठरले.**



### पॅरिस हवामान करारातून माघार



ट्रम्प प्रशासनाने जानेवारी २०२५ मध्ये पहिला मोठा धक्का दिला. त्यांनी अमेरिकेला पॅरिस हवामान करारासह अनेक आंतरराष्ट्रीय पर्यावरण करारांमधून माघार घेण्याचा आदेश दिला. हे पाऊल अत्यंत वादग्रस्त होते. कारण, अमेरिकेसारख्या विकसित देशांवर हवामान बदलावरील जागतिक सहकार्याची सर्वांत मोठी जबाबदारी आहे. ट्रम्प यांनी हा निर्णय अनावश्यक भार म्हणून फेटाळून लावला. परंतु, वैज्ञानिक समुदाय आणि पर्यावरण संघटनांनी जागतिक हवामान कृती अनेक वर्षे मागे पडू शकते, असा इशारा दिला.

### शुल्काचा वापर शस्त्राप्रमाणे

फेब्रुवारी २०२५ मध्ये ट्रम्प यांनी आंतरराष्ट्रीय व्यापारावर मोठ्या प्रमाणात शुल्क आकारले. डोनाल्ड ट्रम्प यांनी शुल्काचा वापर शस्त्राप्रमाणे केला. त्यांनी कॅनडा आणि मेक्सिकोमधून आयात केलेल्या वस्तूंवर २५ टक्क्यांपर्यंत नवीन टॅरिफ लादले. चीनसह अनेक आशियाई देशांसाठी १० टक्के बेसलाईन कर जाहीर करण्यात आला. भारतावरही अतिरिक्त २५ टक्के टॅरिफ जाहीर करण्यात आला. यामुळे जागतिक बाजारपेठेत अस्थिरता वाढली. या निर्णयानंतर, अनेक देशांनी सूडाची कारवाई करण्याची धमकी दिली आणि आंतरराष्ट्रीय व्यापारात असुरक्षितता वाढली.

### गाझा पट्टीबाबत वादग्रस्त प्रस्ताव

गाझाला अमेरिकन प्रशासनाअंतर्गत आणण्याचा ट्रम्पचा प्रस्ताव होता. वृत्तांनुसार, त्यात मोठ्या प्रमाणात पुनर्रचना आणि लाखो पॅलेस्टिनी रहिवाशांच्या विस्थापनाचा समावेश होता. या प्रस्तावावर जगभरात तीव्र टीका झाली. मध्य पूर्वेकडील देशांनी याला आंतरराष्ट्रीय कायद्याचे उल्लंघन म्हटले, तर काही पाश्चात्य देशांनीही ते अव्यवहार्य आणि अस्थिर करणारे म्हटले.

### जागतिक आरोग्य संघटना, मानवाधिकार परिषदेचा निधी थांबला

ट्रम्प प्रशासनाने आरोग्य आणि मानवी हक्कांशी संबंधित अनेक आंतरराष्ट्रीय संस्थांसाठी अमेरिकेचा निधी जवळजवळ पूर्णपणे थांबवला. यामध्ये पॅलेस्टिनी नागरिकांना मदत करण्यासाठी काम करणाऱ्या जागतिक आरोग्य संघटना, संयुक्त राष्ट्र मानवाधिकार परिषद आणि ‘युनायटेड नेशन्स रिलीफ ॲण्ड वर्क्स एजन्सी फॉर पॅलेस्टाईन रिफ्यूज इन द निअर इस्ट’ सारख्या संघटनांचा समावेश होता. या निर्णयाचा परिणाम अमेरिकेच्या निधीवर अवलंबून असलेल्या देशांवर झाला.

कठोर एच-१बी व्हिसा नियम लागू

ट्रम्प प्रशासनाने एच-१बी व्हिसा कार्यक्रमात अनेक कठोर बदल केले, ज्यात व्हिसाची संख्या कमी करणे, अर्ज प्रक्रिया गुंतागुंतीची करणे आणि अमेरिकन कामगारांना प्राधान्य देण्यासाठी अमेरिकन खरेदी करा, अमेरिकन भाड्याने घ्या, धोरण लागू करणे समाविष्ट आहे. शिवाय, एच-४ व्हिसा धारकांना काम करण्यापासून रोखण्याचे प्रयत्न केले गेले. या बदलांमुळे भारतीय व्यावसायिकांवर आणि विदेशी कंपन्यांवर नकारात्मक परिणाम झाला. यामुळे व्हिसा मिळवणे कठीण झाले. दरम्यान, २०२५ हे वर्ष जागतिक स्तरावर केवळ एकाच व्यक्तीने गाजवले असे म्हणायला काही हरकत नाही. अध्यक्षपदी विराजमान झाल्यापासून ते आजपर्यंत ट्रम्पच्या छोट्यातल्या छोट्या निर्णयाचा जगावर प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षरीत्या परिणाम झाल्याचे पाहायला मिळत आहे.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## अग्रलेख...

# माओवाद्यांना पळता भुई थोडी...

ओडिशाच्या कंधमाल जिल्ह्यात गुरुवारी झालेल्या भीषण चकमकीत ओडिशा राज्य समितीचा प्रभारी केंद्रीय समितीचा सदस्य आणि कोट्यवधी रुपयांचे बक्षीस असलेला क्रूरकर्मा- माओवादी नेता गणेश उईकेचा खात्मा करण्यात आला. मागील काही महिन्यांपासून माओवादाच्या विरोधात राबवल्या जाणाऱ्या कठोर कारवाईमुळे छत्तीसगड, महाराष्ट्र आणि मध्यप्रदेशातून माओवादी चळवळीचे पाय उखडले आहेत. त्यांना लपण्यासाठी कोणतीही जागा आता शिल्लक राहिलेली नसल्याचे सुरक्षा दलांच्या कारवाईवरून स्पष्ट झाले आहे. पूर्वी सुरक्षा दलांचा दबाव वाढल्यावर माओवादी 'रेस्ट झोन'मध्ये जायचे. मात्र, अलिकडच्या काळात केंद्र आणि राज्यांनी राबवलेल्या ठोस आणि समन्वयित धोरणांमुळे माओवादी देशाच्या कोणत्याही भागात सुरक्षित राहिलेले नाहीत, हे स्पष्टपणे दिसून येते. सुरक्षा दलांची वाढलेली कार्यक्षमता, तंत्रज्ञानाचा वापर आणि त्यांची गुप्तचर यंत्रणा अत्यंत निर्णायक ठरली आहे. केंद्रीय राखीव पोलिस दल, त्यांचे कोब्रा हे कमांडो युनिट, राज्य पोलिस दल आणि विशेष पथकांमध्ये समन्वय वाढवण्यात आला आहे. ड्रोन, उपग्रह छायाचित्रे, इलेक्ट्रॉनिक सर्व्हिलन्स आणि अचूक गुप्तचर माहितीच्या आधारे माओवादी तळांवर सातत्याने कारवाया केल्या जात आहेत. त्यामुळे पूर्वी सुरक्षित मानल्या जाणाऱ्या जंगलांमध्येही आता माओवादी टिकू शकत नाहीत.

माओवाद प्रभावित भागांमध्ये विकासाला गती देण्यात आली आहे. रस्ते, मोबाईल नेटवर्क, वीज, आरोग्यसेवा, शिक्षण आणि रोजगाराच्या संधी उपलब्ध करून दिल्यामुळे स्थानिक आदिवासी व ग्रामीण जनता माओवादी विचारसरणीपासून दूर जात आहे. लोकांचा पाठिंबा कमी होत असल्याने माओवादी संघटनांची मुळेच कमजोर झाली आहेत. लोकशाही मार्गाने आपले प्रश्न सुटू शकतात, यावर जनतेचा विश्वास वाढत आहे. तिसरा महत्त्वाचा मुद्दा म्हणजे शरणागती आणि पुनर्वसन धोरणही अतिशय महत्त्वाचे ठरत आहे. सरकारने माओवाद्यांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी आकर्षक आत्मसमर्पण योजना राबवल्या आहेत. अनेक कडव्या माओवाद्यांनी हिंसेचा मार्ग सोडून समाजात परतण्याचा निर्णय घेतला आहे. त्यामुळे संघटनांतील मनोबल खचले असून, नेतृत्वावरही ताण वाढला आहे. या वाढलेल्या ताणामुळे नेतृत्व बरेचदा चुकीचे निर्णय घेतले जातात. याशिवाय माओवाद्यांच्या शहरी नेटवर्कवरही मोठा आघात करण्यात आला आहे. 'अर्बन नक्षल' जाळे, आर्थिक स्रोत, बौद्धिक पाठबळ आणि दळणवळण यंत्रणा उघडकीस आणून त्यावर कायदेशीर कारवाई केली जात आहे. त्यामुळे माओवादी चळवळीला मिळणारा अप्रत्यक्ष आधारही मोठ्या प्रमाणावर कमी झाला आहे. आजची परिस्थिती पाहता माओवादी संघटना केवळ काही भागांपुरत्या आणि बचावात्मक भूमिकेत अडकल्या आहेत. सततच्या कारवायांमुळे नक्षलवादी स्थलांतरित होत आहेत, विखुरले जात आहेत आणि त्यांच्या हालचालींवर कडक नजर ठेवली जात आहे. एकंदरीत मजबूत राजकीय इच्छाशक्ती, प्रभावी सुरक्षा धोरण, विकासाभिमुख दृष्टिकोन आणि जनतेचा वाढता सहभाग यामुळे माओवादाची पकड सैल झाली आहे. केंद्र आणि राज्यांच्या कठोर धोरणामुळे माओवाद्यांची हालचाल अतिशय मर्यादित झाली आहे. परिणामी, त्यांच्या तथाकथित 'क्रांती'च्या दाव्यांवर त्यांच्याच कॅडरचा विश्वास उरलेला नाही. पूर्वी जंगल, दुर्गम भाग आणि आदिवासी वस्त्यांमध्ये माओवाद्यांचा प्रभाव होता. मात्र, सातत्याने होणाऱ्या चकमकी, अटक सत्रे, शरणागती योजना आणि वरिष्ठ नेत्यांचा खात्मा यामुळे संघटनेची नेतृत्वरचना कमकुवत झाली आहे. अनेक कॅडर सदस्य स्वतःच्या सुरक्षिततेबाबत साशंक झाले असून, नेतृत्व त्यांना योग्य संरक्षण देऊ शकत नाही, ही भावना बळावली आहे. सुरक्षा दलांच्या वाढत्या कारवायांमुळे आर्थिक स्रोतांवरही मोठा आघात झाला आहे. विकासकामे, रस्ते, दळणवळण आणि कल्याणकारी योजनांमुळे स्थानिक जनतेचा सरकारवरील विश्वास वाढत असून, माओवाद्यांना मिळणारा पाठिंबा घटत आहे. प्रभावी सुरक्षा कारवाया आणि समांतर विकास धोरणांमुळे माओवादी चळवळीचा पाया हादरला आहे. नेतृत्वावरचा विश्वास खचल्याने आणि भविष्याबाबत अनिश्चितता वाढल्याने या चळवळीचे अस्तित्व संपुष्टात येण्याच्या मार्गावर आहे.

कधीकाळी माओवादी हे आदिवासींचे आदर्श आणि आधार समजले जात होते. त्यांनी आदिवासी समाजातील काही वाईट रूढी-परंपरा बंद केल्या होत्या. मात्र, साधारण २००० पासून माओवादी चळवळ अतिशय हिंसक होत गेली. केवळ संशयावरून आदिवासी आणि दलितांचे माओवाद्यांनी गळे चिरले. शिक्षण घेणाऱ्या तरुणांची नृशंस हत्या केली. त्यामुळे त्यांनी आदिवासी समाजाचा विश्वास गमावला. आदिवासी बांधव केवळ जीव वाचवण्यासाठी त्यांना मदत करायचे हे आता सिद्ध होत आहे. माओवादी नेत्यांनी केलेली दुसरी मोठी चूक म्हणजे, माओवादी चळवळ ही कॅडर-केंद्रित रचनेवर उभी होती. मागील काही काळात कॅडरवर लादण्यात आलेली अतिशय कठोर लष्करी सक्ती, वाढता दबाव, अंतर्गत दहशत आणि मानवी मूल्यांचा ऱ्हास यामुळे ही चळवळ हळूहळू विखुरली जात असल्याचे वास्तव समोर येत आहे. माओवादी संघटनेत कॅडरला केवळ कार्यकर्ता न मानता 'क्रांतीचा सैनिक' म्हणून घडवले जाते. आदिवासी आणि दुर्गम भागांतील तरुणांना भरती करून त्यांना विचारधारेचे शिक्षण, लष्करी प्रशिक्षण आणि कठोर शिस्त लावली जाते. सुरुवातीला शोषणाविरुद्ध लढा, जल-जंगल-जमीन यांचे रक्षण अशी खोटी उद्दिष्टे सांगितली जातात. मात्र, संघटनेत खोलवर गेल्यावर कॅडरला वैचारिक प्रेरणेपेक्षा लष्करी आज्ञापालनालाच अधिक महत्त्व दिले जाते. माओवादी चळवळीत कॅडरवरील लष्करी सक्ती ही बहुआयामी आहे. वरिष्ठ नेतृत्वाचा आदेश न पाळल्यास शिक्षा, विचाराविना फाशी, मारहाण किंवा बहिष्कार यासारखी अमानवी दंडप्रणाली वापरली जाते. अनुभव नसलेल्या कॅडरला थेट सुरक्षादलांविरोधात घातपाती कारवायांमध्ये ढकलले जाते. संघटना सोडण्याचा विचार करणेही गद्दारी मानली जाते. परिणामी कॅडर मानसिक गुलामगिरीत अडकतो. माओवादी चळवळ आदिवासींच्या हक्कांची भाषा करते; परंतु प्रत्यक्षात सर्वाधिक शोषण आदिवासी कॅडरचेच होते. जंगलात सतत होणारे स्थलांतर, अपुरा आहार, औषधोपचारांचा अभाव, जखमी अवस्थेतही लढाईस भाग पाडणे, हे सर्व कॅडरच्या दैनंदिन जीवनाचा भाग बनते. वरच्या फळीतील नेते तुलनेने सुरक्षित ठिकाणी राहत असताना, कनिष्ठ कॅडर मात्र थेट सतत मृत्यूच्या दारात उभे राहतात. या दुटप्पी धोरणामुळे संघटनेवरील विश्वास ढासळला आहे. सुरक्षा दलांनी माओवादी प्रभावक्षेत्रात सातत्यपूर्ण आणि अचूक कारवाया केल्यामुळे संघटनेवर मोठा दबाव निर्माण झाला आहे. या दबावातून बाहेर पडण्यासाठी नेतृत्व कॅडरवर अधिकाधिक लष्करी सक्ती लादत आहे. दीर्घ पल्ल्यांचे मार्च, वारंवार घातपात, मोठ्या प्रमाणावर आयईडी वापरणे यामुळे कॅडरचा थकवा वाढतो. परिणामी संघटनेतील शिस्त भीतीकडे वळते आणि भीती दीर्घकाळ टिकू शकत नाही. 'जनतेसाठी लढा' या घोषणेऐवजी 'जिवंत राहण्यासाठी लढा' ही भावना कॅडरमध्ये रुजत आहे. आपण खरोखरच जनतेसाठी लढतो आहोत का, हिंसेचा मार्ग आदिवासी विकासाला मदत करतो का, नेतृत्व स्वतः सुरक्षित राहून आम्हाला बळी देत आहे का, या उद्‌भवणाऱ्या प्रश्नांमुळे संघटनेत फूट पडू लागली आहे. महिला कॅडर माओवादी चळवळीचा महत्त्वाचा घटक मानल्या जातात. त्यांच्यावर दुहेरी अन्याय होतो. एकीकडे लष्करी सक्ती, तर दुसरीकडे भावनिक, सामाजिक आणि कधी कधी लैंगिक शोषण होते. यामुळे अनेक महिला कॅडर भावनिकदृष्ट्या कोलमडतात आणि संघटनेपासून दुरावतात. कॅडरवरील अमानवी लष्करी सक्तीचा थेट परिणाम म्हणजे आत्मसमर्पणाकडे कल वाढला आहे. कॅडरवरील वाढती लष्करी सक्ती ही माओवादी चळवळीच्या विघटनाचे प्रमुख कारण ठरली आहे. विचारधारेऐवजी हिंसा, लोकसमर्थनाऐवजी भीती आणि संघर्षाऐवजी अंतर्गत दडपशाही यामुळे चळवळीचा फोलपणा समोर आला. आता त्यांचा एकेक मोहरा टिपला जात असल्याने त्यांना पळता भुई थोडी झाली आहे.

## दिल्ली दिनांक

**रवींद्र दाणी**

# ऑपरेशन सिंदूरचे वर्ष!

२०२५! आणखी एका भारत-पाकिस्तान संघर्षाचे वर्ष. तीन दिवसांनी सरणाऱ्या या वर्षाचा उल्लेख ऑपरेशन सिंदूरचे वर्ष असा केला जाईल. तब्बल २५ वर्षांनंतर दोन्ही देशांत झडलेला हा संघर्ष केवळ ९६ तास चालला, तरी त्याची नोंद साऱ्या जगाला घ्यावी लागली.

ऑपरेशन सिंदूरचे सर्वांत प्रमुख वैशिष्ट्य म्हणजे हे युद्ध परंपरागत शस्त्रांऐवजी प्रक्षेपणास्त्रांनी लढले गेले. भारताने 'ब्रह्मोस' प्रक्षेपणास्त्रांचा मुक्तपणे वापर केला तर पाकिस्तानने अन्य प्रक्षेपणास्त्रांसोबत 'फतेह-२' या लांब पल्ल्याच्या प्रक्षेपणास्त्रांचा वापर केला. पाकिस्तानने नवी दिल्लीच्या दिशेने सोडलेले हे प्रक्षेपणास्त्र हरयाणातील सिरसा येथे पाडण्यात आले. या संघर्षात सैनिक, रणगाडे यांनी परस्पर देशांच्या सीमा ओलांडल्या नाहीत. किंबहुना या संघर्षात याचा फारसा वापरच झाला नाही. वापर झाला तो लढाऊ विमानांचा व भूतलावरून डागल्या गेलेल्या प्रक्षेपणास्त्रांचा.

**११४ विमानांचा वापर :** चार दिवसांच्या या युद्धात ११४ लढाऊ विमानांचा वापर करण्यात आला. यात भारताची ७२ तर पाकिस्तानची ४२ विमाने होती. दुसऱ्या महायुद्धानंतरचा हा सर्वांत मोठा हवाई संघर्ष असल्याचे म्हटले जाते.

**शरीफ पराभूत :** १०० तासांच्या या संघर्षात पाकिस्तान सरकार पराभूत झाले. कारण त्यानंतर पाकिस्तानच्या क्षितिजावर असीम मुनीर या लष्करी अधिकाऱ्याचा 'पंचतारांकित' उदय झाला. मुनीर यांना पंचतारांकित फिल्ड मार्शल करण्यात आले तर लोकनिर्वाचित सरकारचे पतन झाले नसले तरी या सरकारची पत मात्र गेली. हा परिणाम होता ऑपरेशन सिंदूरचा. अर्थात भारतासाठी ही बाब चांगली मानली जात नाही. पाकिस्तानात मुलकी सरकार असताना दोन्ही देशांच्या संबंधात कमी तणाव राहात गेला हा इतिहास आहे आणि जेव्हा जेव्हा देशात लष्करी शासक आले त्यांनी भारताच्या विरोधात आघाडी उघडली.

**जगात दखल :** साऱ्या जगातील सरंक्षण तज्ज्ञांनी दखल घ्यावी असे हे युद्ध होते. जगातील अनेक संरक्षण विषयक अध्ययन करणाऱ्या संस्थांमध्ये या युद्धाचे धडे शिकविले जातील. या संघर्षाबाबत अनेक जागतिक संस्थांनी- देशांनी अहवाल तयार केले असून, त्यात या चार दिवसांत झडलेल्या घटना तासागणिक मांडण्यात आल्या आहेत. चीन, रशिया, अमेरिका, फ्रान्स, नाटो व ब्रिटन यांनी याबाबत आपापले अहवाल तयार केले आहेत. त्यावरून त्या देशांना जो निष्कर्ष काढावयाचा आहे, तो त्यांनी काढला आहे. अमेरिकेचे राष्ट्रपती ट्रम्प हे वारंवार आपण हा संघर्ष संपविल्याचा दावा करीत असले तरी त्यांनी अद्याप याबाबत पुरावा सादर केलेला नाही. भारताने मात्र याचा अगोदरच इन्कार केला आहे.



भारत-पाकिस्तान संघर्षाकडे मुस्लिम देशांचे विशेष लक्ष लागले होते. बहुतेक देशांनी पाकिस्तानला गुप्त मदत केली. फक्त तुर्कीने उघडपणे पाकिस्तानला पाठिंबा दिला होता.

**ट्रम्प-ग्रहण :** २०२५ च्या प्रारंभी २० जानेवारी रोजी शपथ घेतलेल्या राष्ट्रपती ट्रम्प यांची दुसरी कारकीर्द भारतासाठी त्रासदायक ठरली. त्यांनी भारताला अडचणीत आणणारे अनेक निर्णय घेतले. भारतावर ५० टक्के आयात शुल्क लावीत असताना पाकिस्तानवर फक्त १९ टक्के शुल्क लावण्याचा निर्णय त्यांनी घेतला. त्यांनी भारतावर लावलेल्या वाढीव आयात शुल्काचा फायदा झाला तो मात्र भारताचा कट्टर शत्रू असलेल्या चीनचा. भारतीय वस्तूंची अमेरिकेत होणारी निर्यात एकीकडे मंदावली असताना, भारतातून चीनमध्ये होणारी निर्यात जवळपास ३३ टक्क्यांनी वाढली. यात भारताचा फायदा झाला, पण चीनचाही मोठा फायदा झाला. भारत व पंतप्रधान मोदी आपले मित्र आहेत असे म्हणत म्हणत ट्रम्प यांनी भारताच्या विरोधात निर्णय घेण्याचा जणू सपाटा लावला. भारतीयांना अमेरिकेत व्हिसा मिळणे त्यांनी अवघड करून टाकले. राष्ट्रपती ट्रम्प यांनी गोल्डन व्हिसा नावाचे प्रकरण सुरू केले. १० लाख डॉलर म्हणजे ९ कोटी रुपये एवढी रकम भरून हा व्हिसा मिळणार आहे, जो मिळविणे सामान्य भारतीयांसाठी अशक्य ठरणार आहे. ट्रम्प एवढ्यावरच थांबले नाहीत तर भारताचा आणखी एक कट्टर शत्रू पाकिस्तानला अत्याधुनिक लष्करी तंत्रज्ञान देण्याचा निर्णय त्यांनी घेतला. ट्रम्प यांच्या या धोरणांमुळे जागतिक समीकरणे पार बदलून गेली.

**डॉलर मजबूत :** राष्ट्रपती ट्रम्प यांच्या धोरणांमुळे अमेरिकन चलन डॉलर काही प्रमाणात मजबूत झाले. वर्षाच्या प्रारंभी ८५ रुपयांत एक डॉलर मिळत होता तर वर्ष संपता संपता एका डॉलरसाठी ९० रुपये मोजावे जाऊ लागले. नव्या वर्षात राष्ट्रपती ट्रम्प आणखी कोणते नवे निर्णय घेतात हे दिसणार आहे.

**१४०४ वा दिवस! :** केवळ चार दिवसांत युक्रेन गिळंकृत करण्याच्या योजनेने राष्ट्रपती पुतिन यांनी सुरू केलेले युक्रेन युद्ध आता पाचव्या वर्षात पदार्पण करणार आहे. आज या युद्धाचा १४०४ वा दिवस आहे. या काळात रशियाने युक्रेनचा काही भाग ताब्यात घेतला असला तरी याची फार मोठी किंमत रशियाला मोजावी लागत आहे. किमान १० लाख सैनिक, ३०० विमाने, १००० रणगाडे, काही युद्धनौका यासह आणखी लष्करी साहित्य रशियाने गमावले असल्याचे मानले जाते. विशेष म्हणजे युक्रेनने रशियाच्या काही बड्या लष्करी अधिकाऱ्यांना ठार करण्यात यश मिळविले. लेफ्टनंट जनरल सर्वारोव्ह यांची मास्कोत करण्यात आलेली हत्या त्या मालिकेतील ताजी घटना मानली जाते.

**युक्रेनलाही तडाखा :** युक्रेनलाही अर्थातच जबर किंमत मोजावी लागत आहे. या काळात युक्रेनने ड्रोन नावाचा नवा पैलू जोडला. विशेष म्हणजे यांचे उत्पादन युक्रेनमध्ये केले जात आहे. युक्रेनने रशियावर अतिशय घातक असे ड्रोन हल्ले चढविण्यात यश मिळविले. याचीच पावती म्हणजे वर्ष संपत आले असताना युरोपियन युनियनने युक्रेनला बिनव्याजी कर्ज देण्याचा निर्णय घेतला. ही रकम काही हजार कोटींच्या घरात असल्याचे सांगितले जाते. रशियाने युक्रेनवर मोठे हल्ले चढविले असले तरी त्याला युक्रेनचा पाडाव मात्र करता आलेला नाही. युक्रेन लढत आहे. अर्थात युरोपातील देशांच्या पाठिंब्यामुळे. आता अमेरिकाही युक्रेनला लांब पल्ला असलेली प्रक्षेपणास्त्रे देण्याचा विचार करीत असल्याचे कळते.

**एक युद्ध थांबले :** २०२५ मध्ये एक युद्ध मात्र थांबले. इस्रायल व हमास यांच्यात दोन वर्षांहून अधिक काळ चाललेल्या युद्धाची समाप्ती झाली असली तरी गाझा पट्टीत असलेला तणाव कायम आहे आणि हमासही कायम आहे. कारण युद्ध थांबल्यावरच हमासने आपल्या ताब्यातील इस्रायली नागरिकांची सुटका केली. याचीही फार मोठी किंमत हमासने वसूल केली. इस्रायलच्या ताब्यातील हजारो पॅलेस्टिनींना त्याला सोडावे लागले. राष्ट्रपती ट्रम्प हे आपण ६ की ७ युद्धे संपविल्याचा दावा करीत आहेत. त्यात काही प्रमाणात तथ्य मानले जाते. कारण इस्रायल-हमास संघर्ष संपविण्यात त्यांची मध्यस्थी कामी आली. मात्र रशिया-युक्रेन संघर्ष संपविण्यासाठी अलास्कात झालेली शिखर परिषद अपयशी ठरली. हे युद्ध संपविण्यासाठी ट्रम्प यांनी अद्याप आपले प्रयत्न सुरू ठेवले असल्याचे मानले जाते. रशिया-युक्रेन युद्ध संपविण्यात ट्रम्प यशस्वी झाले तर ते मात्र ट्रम्प यांचे एक मोठे यश मानले जाईल.

२०२६ मध्येही रशिया-युक्रेन युद्ध सुरू राहील असे दिसते. या नव्या वर्षात भारत-पाकिस्तान यांच्यात पुन्हा एक संघर्ष झडेल काय? कारण, भारताने ऑपरेशन सिंदूर संपविलेले नाही तर ते फक्त स्थगित केलेले आहे.

## वेध

**अनिल उमाकांत फेकरीकर**

# कानात गाणे अन् रस्त्यावर मरणे!

संगीत हे औषध आहे. जे संबंधित व्यक्तीच्या मनातील जखमा भरून काढते. पण हे औषध केव्हा उपयोगी पडते त्याचे ठोकताळे ठरलेले आहेत. तुम्ही एकांतात बसून कानात हेडफोन लावून गाणे ऐकले तरच ते लाभदायक ठरते. रस्त्यावर वाहन चालवीत असताना तुम्ही हेडफोनद्वारे कानात गाणे ऐकत असाल तर ते यमाकडे जाण्याचे आमंत्रण ठरते. म्हणूनच कानात गाणे असले तर रस्त्यावर मरणे हमखास पक्के असते. मग अशावेळी ते संगीत औषधाचे नव्हे तर यमाला खुश करणारे ठरते. हा भयावह प्रकार आपल्या देशात मोठ्या प्रमाणात वाढला आहे. शंभरपैकी ८० वाहनचालक ब्ल्यूट्यूथ हेडफोनचा वापर करून गाणे ऐकत असतात. परिणामी त्यांचे रस्त्यावरील वाहनांकडे लक्ष नसते. ते आपल्याच धुंदीत जातात आणि समोरच्याला धडक मारतात. अनेकदा त्यांच्यावर वाईट प्रसंग ओढवतो अन् मागून एखादे मोठे वाहन येऊन त्यांना चिरडून जाते. यावर लोक संताप व्यक्त करतात. मात्र मूळ समस्या काय यावर कुणाचेही लक्ष नसते. या जीवघेण्या प्रकारावर आजच नियंत्रण न आणल्यास उद्या लोक रस्त्यावर मरतील. ते मरणे आपल्या देशाला परवडणारे नाही. आपला देश युवकांचा असल्याचा आपण अभिमान बाळगतो. पण आपले युवक तर हेडफोन लावत गाणे ऐकण्यातच मशगूल झाले आहेत. त्यांच्याकडून तुम्ही चांगल्या गोष्टींची अपेक्षा नेमकी करणार कशी? कारण त्यांना गाणे ऐकल्याशिवाय चैन पडत नाही. ते मोबाईलच्या चक्रव्यूहात पूर्णतः अडकले आहेत.

महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाच्या चालकाने वाहन चालवीत असताना मोबाईल पाहिला तर बातमी बनते. मग जे हजारो दुचाकीचालक, कारचालक, ऑटोचालक, ई-रिक्षाचालक कानात गाणे ऐकतच वेगाने जातात, त्यांचे काय? त्यांनी खुशाल गाणे ऐकावे, पण ते घरी बसूनच. रस्त्यावर जेव्हा ते वाहन चालवितात तेव्हा त्यांनी वाहतूक नियम पाळायलाच हवे. कारण त्यांच्या चुकीची शिक्षा एखाद्या निष्पाप व्यक्तीला भोगावी लागते. त्यांची तर मजा होते पण ती समोरची व्यक्ती चूक नसतानाही यमाघरी जाते किंवा जायबंदी होत दवाखान्याचे बिल भरत असते. परिणामी त्याचे कुटुंबीय देशोधडीला लागते. त्याला अपघातानंतर लाखो रुपये स्वतःच्या उपचारांवर खर्च करावे लागतात. पोलिस यंत्रणा आरोपीच्या विरोधात गुन्हा दाखल करून काही वेळाने त्याला सूचनापत्र देऊन सोडून देते. पोलिसांना वाटते आम्ही कारवाई केली, पण जो रुग्णालयात उपचार घेत असतो, त्याचे काय? त्याचा विचारच करायला कुणालाही वेळ नाही. जायबंदी झालेला मीच पापी असे समजून स्वतःलाच कोसत बसतो. या सर्व समस्यांतून अनेक जण गेले आणि जात आहेत. यावर आता उपाय करायचा झाल्यास ज्याच्या हातून अपघात झाला त्याच्याकडूनच जखमींचा संपूर्ण खर्च कठोरतेने वसूल करावा. नव्हे तशाच नियमांची तरतूद कायद्यात करायला हवी. जोपर्यंत जायबंदी झालेली व्यक्ती पूर्णपणे बरी होत नाही तोवर आरोपीकडून खर्च घ्यावा. तो देत नसल्यास त्याची संपत्ती विकावी. चूक झाल्यावर सॉरी म्हणायचे आणि जखमींना रस्त्यावर तडफडत सोडून द्यायचे हा प्रकार त्वरित संपुष्टात यावा. जेव्हा चूक केल्यावर उपचारांचा खर्च करण्याची शिक्षा होईल, त्यानंतर कुठलाही चालक कानात गाणे वाजवीत वाहन चालविण्याचे धाडस करणार नाही. पण अशी व्यवस्था खरोखरच भारतात अंमलात येऊ शकते का, तर याचे उत्तर होय असेच द्यावे लागेल. याअनुषंगाने सरकारने कायदे तयार करावेत किंवा सर्वोच्च न्यायालयाने तसे निर्देश द्यावेत. वस्तुतः रस्त्यावर हेडफोनचा वापर टाळा, जीवघेणा अपघात टाळा हा मंत्र प्रत्येकाने कृतीत आणावा. शेवटी, सुरक्षित राहायचे झाल्यास कानात हेडफोन, डोक्यात मज्जा। अपघाताची मिळेल मोठी सजा ! ही वास्तविकता समजूनच वाहन चालवावे.

९८८१७१७८५९

## कानोसा

**अमोल पुसदकर**

# निवडणूक निकालांचा संदेश

नुकत्याच स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका झाल्या. यामध्ये भाजपला भरघोस यश मिळाले. विरोधकांचे मनसुबे हाणून पाडत भाजप क्रमांक एकचा पक्ष बनला आहे. हे यश निर्विवादपणे देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वात मिळालेले आहे. यशासारखे दुसरे काहीच नाही, असे म्हटले जाते. परंतु ज्यांना दीर्घ काळाचे राजकारण करायचे आहे, त्यांनी सत्ता, निवडणूक, पक्ष कार्यकर्ता आणि जनता या सर्वच बाबींचा विचार करण्याची आवश्यकता असते.

खेड्यापाड्यातील गटातटाचे राजकारण हे बरेचदा जातिपातीचे असते. वर्षांपासून एकमेकांच्या सोबत राहणारा समाज हा अशा निवडणुकांच्या माध्यमातून जातिपातींमध्ये विभागला जातो. समाजाला एक करण्याचे प्रयत्न समाजामध्ये काही संघटना करताना दिसतात. परंतु सध्याचे राजकारण मात्र हे समाजाला विभाजित करतानाच दिसते. अनेकानेक वर्षे जे कार्यकर्ते सोबत काम करतात, बरेचदा त्यांना एकमेकांची जात माहीत नसते. परंतु निवडणुकीच्या निमित्ताने ती माहिती होते. राजकीय पक्ष हे तर केवळ जातीच्याच आधारावर कार्यकर्त्यांचा विचार करताना दिसतात. कार्यकर्ता किती चांगला आहे, तो जनतेसाठी किती वेळ देणार आहे, तो पक्षाचे काम किती वाढवू शकतो यापेक्षाही त्याचा समाज, त्याच्या मतदारसंघात किती राहतो, तो निवडून येऊ शकतो की नाही, पैसे पाण्याने तो बरोबर आहे की नाही याचा विचार साधारणतः राजकीय पक्ष करताना दिसतात. जातिगत राजकारणाच्या पलीकडे राजकारण कधी जाणार आहे? चांगल्या लोकांना राजकारणामध्ये आणून जनतेसमोर चांगले आदर्श कधी निर्माण करणार आहोत? याचा विचार राजकीय पक्षांनी व त्याच्या नेतृत्वाने करण्याची आवश्यकता आहे.

सध्या भाजपमध्ये मोठ्या प्रमाणावर इतर पक्षांतील लोकांचा प्रवेश सुरू आहे. ठिकठिकाणी काँग्रेस कशी नामोहराम होईल, त्याला कसे खिंडार पडेल याचा प्रयत्न स्वाभाविकपणे भाजपद्वारे सुरू आहे. याच पृष्ठभूमीवर ज्या पक्षांना फारसे राजकीय भविष्य नाही असे ज्यांच्या कार्यकर्त्यांना वाटते, त्या पक्षामधून सुद्धा भाजपमध्ये येणाऱ्यांची संख्या मोठी आहे. स्वाभाविकपणे येणारा मोठा नेता आपल्या सोबत त्याचे वलय, त्याचे कार्यकर्ते, पैसा, प्रसिद्धी, सर्वदूर असलेला संपर्क इत्यादी गोष्टी घेऊन येत असतो. त्यामुळे निवडणुकीच्या काळामध्ये तिकीट वाटप करीत असताना पक्षनेतृत्वाला स्वाभाविकपणे जिंकणारा कार्यकर्ता पाहिजे असतो. कार्यकर्ता जुना असेल, निष्ठावान असेल, परंतु जर तो जिंकू शकत नसेल असे नेतृत्वाला वाटत असेल तर नेतृत्व त्याला बाजूला करून पक्षातील असो की बाहेरून आलेला असो अशांवर आपला डाव खेळत असते. आणि येथूनच पक्षांमध्ये मोठ्या प्रमाणावर नाराजीची सुरुवात होते. अनेक वर्षे पक्षामध्ये घालवणारे कार्यकर्ते शेवटची संधी म्हणून एकदा अपक्ष म्हणून उभे राहण्याचा प्रयत्न करतात किंवा इतर कुठल्या पक्षाकडून उभे राहण्याचा प्रयत्न करतात. बंडखोरी रोखण्यासाठी अगदी शेवटपर्यंत नाव निश्चित न करणे अशा पद्धतीचा प्रयत्न सुद्धा किंवा खेळी सुद्धा पक्षाकडून खेळली जात असते.

सध्याच्या राजकारणामध्ये नामशेष होत चाललेली गोष्ट म्हणजे कार्यकर्ता होय. एकेकाळी काँग्रेसचा खूपच बोलबाला होता. काँग्रेसच्या तिकिटावर एखाद्या दगडाला सुद्धा उभे केले तरीसुद्धा लोक त्याला निवडून देत होते. याला कारण म्हणजे देशाच्या स्वातंत्र्याच्या आधीपासून काँग्रेस पक्ष कामात होता. त्यामुळे देशाला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर स्वाभाविकपणे लोकांना परिचयाचे नाव काँग्रेसचे होते. काँग्रेसमध्ये मोठमोठे नेते होते. त्यामुळे निवडणुका सहजपणे जिंकल्या जात होत्या. परंतु पुढे मात्र जनतेने त्यांना नाकारले आणि मोदी सरकार सत्तेत आले.

परंतु काँग्रेसची फाईव्ह स्टार संस्कृती, हाय कमांड संस्कृती हळूहळू सर्वच राजकीय पक्षांना चांगली वाटू लागली. त्यामुळे सर्वच राजकीय पक्षांसमोरची सगळ्यात मोठी समस्या म्हणजे कार्यकर्ता आहे. आज सर्वच पक्ष हे नेत्यांच्या भोवती फिरणारे पक्ष आहेत. जनता सुद्धा एखाद्या नेत्याला पाहून त्याच्या पक्षाला विजयी करते आहे. त्यामुळे इतर पक्षांतून कार्यकर्ते आपल्या पक्षाशी जोडले पाहिजे असे न वाटता इतर पक्षातील नेते आपल्या पक्षाला जोडले पाहिजे अशी मानसिकता राजकीय पक्षांची झालेली आहे.

काँग्रेसचे विकासविरोधी राजकारण, हिंदुत्वविरोधी राजकारण जनतेने नाकारले आणि पर्याय म्हणून भारतीय जनता पक्षाकडे त्यांनी बघितलेले आहे. सध्या तरी भारतीय जनता पक्ष सर्वत्र विजयी घोडदौड करीत आहे. परंतु एकेकाळी काँग्रेसची मुळे खोलवर गेलेली होती त्यामुळे त्यांना उखडून फेकण्याकरिता भाजपला जवळपास ६५ वर्षे मेहनत करावी लागली. मोदी लाट, मोदींचा करिष्मा हा भाजपाला सत्तेमध्ये बसविणारा सगळ्यात मोठा घटक आहे, ही गोष्ट नाकारता येणार नाही. नेता कोणीही असो आम्ही गावागावात जाऊ, लोकांना संघटित करू आणि पक्षाला पुन्हा एकदा विजयी करू या गोष्टी भाषणातून नेते करू शकतात. परंतु त्यांना ही वस्तुस्थिती माहिती आहे की ते सर्व करण्यासाठी लागणारा कार्यकर्ता आपल्याकडे उरलेला नाही. कार्यकर्ता बनविण्यासाठी लागणारी कुठलीही कार्यपद्धती राजकीय पक्षांजवळ नसल्यामुळे व विचारधारेला तिलांजली दिलेली असल्यामुळे जोपर्यंत उतार आहे तोपर्यंत गाडी धावेल. परंतु चढाव आल्यानंतर खरोखरच ती चालू आहे की उतारावर धावत होती हे समजेल. काँग्रेसने पैशांच्या भरवशावर निवडणुका जिंकता येतात हे इतके वर्षे सर्वच राजकीय पक्षांना शिकविलेले आहे. परंतु काँग्रेसला सुद्धा भुईसपाट व्हावे लागले. त्यामुळे पक्षाला जर दीर्घकाळ सत्तेत ठेवायचे असेल तर जनमानस हे आपल्या विचारधारेच्या बाजूने वळविणे आवश्यक आहे. त्यासाठी कार्यक्रम, उपक्रम व प्रयासांची आवश्यकता असते. कार्यकर्त्यांना सुद्धा विचारधारा समजावून सांगण्यासाठी प्रशिक्षणाची आवश्यकता असते. एकेकाळी काँग्रेसला नेहरूनंतर कोण हा प्रश्न भेडसावत होता.

निवडणुका आल्या की उमेदवाराचा शोध सुरू होतो. असे करण्यापेक्षा पाच वर्षांनी येणाऱ्या निवडणुकीसाठी आमच्या पक्षाचे संभाव्य उमेदवार सर्व जातिपातीमधील कोण राहणार आहेत त्यांना निवडणे, पक्षाच्या सर्वच कार्यक्रमात त्यांना क्रियाशील ठेवणे, नेतृत्व कसे केले पाहिजे, लोकाभिमुख कसे राहिले पाहिजे, जनतेचे प्रश्न कसे शोधले पाहिजे व सोडवले पाहिजे या सर्वच गोष्टींचे प्रशिक्षण व यावर कार्य होत राहिले पाहिजे. सध्या पक्षाच्या चिन्हावर उमेदवार विजयी होत आहेत. पक्ष किंवा विचारधारेवर नाही हे लक्षात घेतले पाहिजे. ज्याला आपण वाढ समजतो कदाचित ती सूज असू शकते. महापूर ओसरल्यानंतर खरे पाणी किती आहे हे कळून येत असते. हे सत्य लक्षात घेऊन प्रत्येक निवडणुकीच्या निमित्ताने पक्षाचा विस्तार किती झाला, किती नवीन कार्यकर्ते मिळाले याचा विचार केला गेल्यास प्रत्येक निवडणूक ही विस्ताराची संधी ठरेल आणि सत्ता मिळाल्यास ती सुशासनाचे प्रदर्शन करण्याचे निमित्त ठरू शकते.

९५५२५३५८१३

(लेखक प्रसिद्ध वक्ते, सामाजिक व राजकीय विचारक आहेत.)

## आजचे संघगीत-८७

सोमवार, २९ डिसेंबर २०२५

### गीत व्हावे जीवनाचे ते तुझे मृदु हासणे

गीत व्हावे जीवनाचे ते तुझे मृदु हासणे
तूच माते तीर्थ आम्हा तूच आशा बंधने ॥धृ॥

तप्त ठिणग्या नाचती या खड्गसंघर्षातुनी
आग त्याची दिव्य दाहक उतरु दे अमुच्या मनी
तापलेल्या हिमगिरीची आच लागुनि अंतरी
वितळुनी जाऊच दे अन् शीत बर्फाची दरी
पेटु दे यांतून आई नासले कुजले जिणे ॥१॥

फुलविले होतेस तेव्हा स्फूर्तिचे स्फुल्लिंग तू
शकहुणांचा पाशवी उन्माद जेव्हा ये उतू
दाहिराच्या कन्यकांचे मृत्युला आव्हान ते
नाचुदे अमुच्या उरी क्षण चार केवळ जागते
विस्मृतीचे पटल विरुनी उसळु दे सारी मने ॥२॥

गाळुनी निज तेज जेव्हा पार्थ सरला मागुती
मंत्र गीतेच्या स्वरांनी चेतली त्याची मती
तीच वाणी केशवाची ऐकवावी एकदा
झिंगलेल्या भावनांना ठेवण्या जागे सदा
शक्ति दे घेण्या भरारी भासु दे जग ठेंगणे ॥३॥

पौरुषाचा मंत्रजागर आज घुमतो आगळा
आत्मघाती शांततेचा ध्यास लोपो पांगळा
रंगवी आम्हास देवी उसळत्या श्रद्धेतुनी
प्रिय ध्वजाच्या लहरीमधुनी ऐकू दे विजयध्वनी
शांत व्हाया वर हिमालय सागरा खेचून ने ॥४॥

### महाकाय पक्षी आणि 'देवदूत'चे स्मरण

तरुण भारतात नुकतीच ''७० लाख वर्षांपूर्वी होता ७० किलोंचा महाकाय पक्षी'' ही बातमी वाचली. यावरून आपल्या नागपूरचेच महाकवी सुधाकर गायधनी यांच्या 'देवदूत' या महाकाव्याची आठवण झाली. प्रकाशित देवदूतमध्ये गायधनींनी अशाच एका महाकाय पक्ष्याची कल्पना १९८१ साली केलेली आहे. आपल्याकडे म्हण आहे की ''जे न देखे रवी, ते देखे कवी.'' त्याचाच प्रत्यय पुन्हा एकदा या बातमीच्या निमित्ताने आलेला दिसतो. पुन्हा एकदा म्हणायचे कारण म्हणजे अमेरिकेतील स्मिथसोनियन इन्स्टिट्यूशनच्या शास्त्रज्ञांना १९८७ मध्ये अमेरिकेच्या साऊथ करोलीना भागातील उत्खननात अशाच प्रकारच्या महाकाय समुद्र पक्ष्याचा सांगाडा सापडला होता. ही बातमी नागपूरच्या एका दैनिकात नोव्हेंबर १९८७ मध्ये प्रकाशित झाली. त्याही वेळेस त्या दैनिकात प्रकाशित झालेल्या माझ्या पत्रात त्या प्राचीन महाकाय पक्ष्याचे सतत सागरावरील हवेत तरंगत राहणे वगैरे साधर्म्य गायधनींच्या देवदूतमधे यापूर्वीच कसे कल्पिले आहे ते दाखवून दिले होते. गायधनींनी ते पत्र आणि इंग्रजीत प्रकाशित देवदूतचे काही संबंधित अंश स्मिथसोनियनला पाठवून दिले होते. ते सर्व तपासून या संस्थेने गायधनींना दोन पत्रे पाठवून आणि ते साधर्म्य मान्य करून गायधनींचे अभिनंदन केले होते. त्यात गायधनी यांची कवी कल्पना आणि विज्ञानाचा असा अभूतपूर्व संयोग जुळून आल्याचे म्हटले होते. आपणा समस्त नागपूरवासीयांसाठी अभिमानाची गोष्ट आहे की सुधाकर गायधनी यांचे देवदूत या महाकाव्यासह त्यांच्या अनेक कविता जगातील पस्तीस भाषांमध्ये अनुवादित होऊन प्रकाशित झालेल्या आहेत. जगातील विविध भाषांच्या अनेक मातब्बर समीक्षक, जाणकार साहित्यिक व वाचकांनी देवदूतचे प्रचंड स्वागत केले असून अमेरिकन समीक्षक व्लादिमिर डोलगाव्ह यांनी तर देवदूत हे होमर आणि मिल्टनच्या पुढे निघून गेल्याचे एका प्रकाशित लेखातून विशद केले आहे.

**प्रा. सुरेश खेडकर**/नागपूर

## वाचक पत्रे

### ज्येष्ठ नागरिकांनो, हे करून पाहा

ज्येष्ठ नागरिकांसाठी एक खास गोष्ट आहे. हे करून पाहा. घरात खूप माणसे असूनही ज्येष्ठांना वेळ कसा घालवावा, हा प्रश्न असतो. बुद्धीचा वापर होईल. काय करायचे की एक शब्द घ्यायचा जसे शेवट टे. येणारी आडनावे. घटाटे, रघटाटे, भाटे, माटे, थोटे, घाटे, सोटे अशी पटापट आठवायची. तर आपल्याशीच शब्दांच्या भेंड्या खेळायच्या. काम नंतर माठ, ठुसी, सरबत, तलवार, रथ. असे शेवटच्या शब्दानंतरचा शब्द असे करायचे. तुम्ही कट्ट्यावर जात असाल तर तिथे करता येईल. पण एकटं असताना वेळ जाण्यासाठी खूप छान आहे. झोपल्या झोपल्या मन रमवता येते. लिहायला जमत असेल तर एक वही करा. त्यात लिहू शकता. सगळ्यात महत्त्वाचे की खूप ताण न देता स्मृती चांगली राहते. हा एक व्यायामच समजा. कंटाळा आला की बंद करायचे.



आपल्याला काही आठवणी नको असतात. पण काही आठवावे अशी इच्छा असते ते आठवत नसेल तर हे केल्याने नक्की आठवेल. करून पाहा. याशिवाय आणखी काही नवीन करू शकाल. विशिष्ट वयानंतर सारखे तुम्हाला कोणी वेळ देत नाही. ते आपापल्या कामात असतात. तक्रार न करता असा वेळ घालवा.

**अंजली पळणीटकर**/८७८०४९२११०

वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल अ‍ॅड्रेस
tbedit2016@gmail.com
तसेच **कुठलाही लेख** पाठवायचा असल्यास ९८५०७५३२८१ या व्हॉट्स अ‍ॅप क्रमांकावर पाठवावा.

CMYK
सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



# शरद पवारांचा पक्ष फोडण्यात अदानींच्या भावाचा सहभाग

## संजय राऊत यांचा दावा



**तभा वृत्तसेवा । जमीर काझी**
**मुंबई, दि. २८ डिसेंबर -**

देशातील शक्तीशाली उद्योगपती गौतम अदानींच्या बारामती दौऱ्यावरून राजकीय वर्तुळात उलट सुलट चर्चा सुरू असतानाच शरद पवारांची नेहमी बाजू मांडणाऱ्या उद्धव ठाकरे गटाचे खा. संजय राऊत यांनी त्याबाबत रविवारी खळबळजनक दावा केला. शरद पवारांचा पक्ष फोडण्यात गौतम अदाणींच्या भावाचा सहभाग होता, अशी माझी ऐकीव माहिती आहे, असे त्यांनी सांगितले.

बारामतीतील शरद पवार सेंटर ऑफ एक्सलन्स इन आर्टिफिशियल इंटेलिजेंसचे (एआय) रविवारी अदानी समूहाचे अध्यक्ष गौतम अदानी हस्ते उद्घाटन करण्यात आले. त्यानिमित्ताने शरद पवार आणि गौतम अदाणी,उपमुख्यमंत्री अजित पवार, खा. सुप्रिया सुळे हे एकाच व्यासपीठावर आले होते. त्यानिमित्ताने राजकीय चर्चांना उधाण आले आहे. त्याबाबत पत्रकारांशी बोलताना राऊत म्हणाले, शरद पवार आणि गौतम अदानी यांचे संबंध राजकीय नाहीत. कौटुंबिक आणि व्यक्तिगत आहेत. आपल्या कार्यक्रमाला कोणाला बोलवायचे हा ज्याचा त्याचा प्रश्न असतो. त्यांनी अदानींना बोलवले असेल. यासाठी पवारांचे संपूर्ण कुटुंब ज्यांनी पक्ष फोडला ते अजित पवारही उपस्थित असतील तर तो त्यांचा व्यक्तिगत प्रश्न आहे. पवारांचा पक्ष फोडण्यामागे गौतम अदानींच्या भावाचा सहभाग होता, अशी माहिती होती. अजित पवारांना पक्षातून फोडण्यास अदानी होते, अशी माहिती मी वाचली आणि ऐकली आहे. आता खरे खोटे तेच सांगतील,'' असेही त्यांनी सांगितले.

मनसे आणि शिवसेना उद्धव ठाकरे यांच्या युतीतील जागावाटप अंतिम टप्प्यात असून त्याबाबत कोणताही तिढा नाही.,असे सांगून राऊत म्हणाले, दोन्ही पक्षात जागा किंवा अन्य गोष्टींवरून कोणताही तिढा नाही. सर्व काही सुरळीत असून येत्या काही दिवसांत सर्व स्पष्ट दिसेल,कोणत्याही कार्यकर्त्यांमध्ये संभ्रम नाही. प्रत्येकाला कोणी निवडणुका लढायच्या आहेत. कोणी अर्ज भरायचे आहेत. त्यासंदर्भात सूचना गेल्या आहेत. त्यांना एबी फॉर्म आज मिळणार आहेत,'' असे सांगून त्यांनी प्रत्येकाची इच्छा निवडणूक लढण्याची असते. ही मराठी माणसाच्या अस्तित्वाची, अस्मितेची लढाई आहे आणि हे कार्यकर्ते समजून घेत आहेत. ज्यादिवशी अर्ज भरण्याची शेवटी तारीख असेल. तेव्हा सर्व स्पष्टपणे कळेल. दरम्यान, मुंबई महानगरपालिकेच्या निवडणुकीत काँग्रेस आणि प्रकाश आंबेडकर यांच्या वंचित बहुजन पक्षाची आघाडी नक्कीच आम्ही स्वागत करत असल्याचे त्यांनी सांगितले.

# शिवसेनेचा प्रस्ताव वास्तववादी नव्हता

## ताकदीपेक्षा जास्त मागितल्या जागा म्हणून युतीचा डाव फिस्कटला : पालकमंत्री

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर दि.२८ डिसेंबर-**

महापालिका निवडणुकीसाठी शिवसेना आणि राष्ट्रवादी यांची युती झाली. मात्र, झालेली युती पालकमंत्र्यांना सलत असल्याचे दिसत आहे. पालकमंत्री जया भाऊंच्या बोलण्यातून तसे दिसून येत असल्याने सर्वत्र पालकमंत्र्यांच्या ''त्या वास्तववादी'' बोलण्यावरून चर्चा रंगू लागली आहे.

शिवसेना राष्ट्रवादी यांच्या युतीनंतर प्रसारमाध्यमांनी पालकमंत्री जयकुमार गोरे यांच्यासोबत वार्तालाप केला असता, पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी शिंदेसेनेवरच शब्दगोळे फेकले आहेत. ''वास्तववादी प्रस्ताव देण्यासंबंधी मी वारंवार सांगत होतो.'' परंतु तसा प्रस्ताव त्यांच्याकडून आला नाही. ताकदी पेक्षा जास्त अवस्था जागा मागितल्यामुळे युतीची चर्चा फिसकटली. तरीदेखील शहराध्यक्ष रोहिणी तडवळकर यांना चर्चा करण्याची सांगितले असता, शिंदेसेनेचे प्रमुख नेते आपल्या मागणीवर ठाम होते. ''लेट नाईट'' फोन कॉल्स आला. मात्र त्यावर निर्णय घेता आला नाही. शेवटी शिंदेसेनेच्या नेत्यांनी जो निर्णय घेतला आहे. त्यामुळे आमच्यात मैत्रीपूर्ण लढत होईल. असे पालकमंत्र्यांनी सांगितले.



दरम्यान, पालकमंत्र्यांच्या बोलण्यातून शिंदेसेनेच्या प्रस्तावावर प्रश्नचिन्ह निर्माण होत आहे? जया भाऊंच्या म्हणण्यानुसार शिंदेसेनेने वास्तवादी प्रस्ताव दिला नव्हता. अवास्तव जागा मागितल्यामुळे त्यावर अंतिम निर्णय घेता आला नाही. युती तुटण्याचे खापर त्यांनी शिंदे सेनेवरच फोडले तसा रोख त्यांच्या बोलण्यातून दिसून आला. वास्तविक पाहता शिवसेनेने पहिल्या दिवसापासून युती संदर्भात ग्रीन सिग्नल दाखवले होते. परंतु भाजप मोठ्या भावाच्या आविर्भावात वावरत असल्याने त्यावर साधक-बाधक चर्चा झाली नसल्याचे सांगण्यात येत आहे. मात्र, नगरपरिषद नगरपालिका निवडणुका झाल्या आणि निकाल लागल्यानंतर मात्र भाजपने शिंदेसेने सोबत युती करण्यासंबंधी तयारी दर्शवली. परंतु सत्ताधारी भाजप पक्ष दोन पावले मागे जाण्यास तयार नसल्याचे लक्षात आल्यानंतर शिंदेसेनेचे प्रमुख नेत्यांनी देखील युतीच्या वाटाघाटी बंद केल्या.

मात्र राष्ट्रवादीचे संपर्क मंत्री तथा राज्याचे कृषिमंत्री दत्तात्रय भरणे सोलापूर दौऱ्यावर आल्यानंतर राष्ट्रवादी आणि शिवसेनेच्या युतीसंबंधी प्राथमिक चर्चा झाली परंतु ती चर्चा अंतिम निर्णय घेणारी ठरली. भरणे मामांनी रातोरात मोबाईल फिरवला आणि दादांचे आणि एकनाथ भाईंची बोलणी घडवून आणली. त्याच ठिकाणी युतीचा कांडका पाडला. परंतु एका रात्रीत एवढे सगळे काही घडेल हे भाजपला कळलेच नाही. आपल्या हातातून वाळू सरकली. त्याप्रमाणे शिंदेसेना निसटल्याचे त्यांच्या लक्षात आल्यानंतर भाजपने मंत्री पूर्ण लढतीचा बाण तयार केलेला दिसत आहे.

# घाऊक इनकमिंग भाजपाच्या पथ्थावर पडणार?

## एका निष्ठावंत कार्यकर्त्यांच्या आत्महत्याच्या धमकीनंतर दुसऱ्या कार्यकर्त्याने दिला आत्मदहनाचा इशारा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर दि.२८ डिसेंबर-**

सोलापूर महानगरपालिका भाजप पक्षासाठी डोकेदुखीचा विषय ठरताना दिसत आहे. सत्तेच्या लालसेपोटी भाजपाने आयात उमेदवारांची घाऊक इनकमिंग सुरू केल्याने, पक्षात कार्यरत असलेल्या निष्ठावंत एकनिष्ठ कार्यकर्त्यांवर सतरंजी उचलण्याची वेळ आली आहे. अशा परिस्थितीत कार्यकर्ते आपल्याच पक्षाला घरचा आहेर देत आहेत. यापूर्वी धुम्मा यांनी आपल्याच पक्षाला धारेवर धरत आत्म हत्येचा ईशारा दिला होता त्यानंतर आता बापू गटाचे शितल गायकवाड यांनी आत्मदहनाचा इशारा दिल्याने भाजपची डोकेदुखी वाढत चाललेली आहे.

महापालिका निवडणूक ही भाजप पक्षातील कार्यकर्त्यांसाठी महत्त्वाची असते. नेत्याच्या विजयासाठी धडपडलेले कार्यकर्ते महापालिकेच्या



निवडणुकीसाठी वाट पाहत असतात. पक्ष सर्वोपरीमानून पाय झीजवलेले असतात. मात्र त्या कार्यकर्त्यांच्या वाट्याला वनवास येत असल्याचे लक्षात आल्यानंतर दोन्ही देशमुख यांनी बंड पुकारले. पालकमंत्र्यांनी दोन आमदारांचे बंड शमावले. परंतु कार्यकर्त्यांच्या इशारावजा धमक्या थांबवण्याच्या नाव घेत नसल्याचे दिसून येत आहे.

### आम्ही काय सतरंज्या उचलायचे का

पक्षांमध्ये गेल्या अनेक वर्षांपासून आम्ही एकनिष्ठने काम करत आहे. अचानक बाहेरून आलेले उमेदवार उमेदवारी घेत आहेत. आम्ही केवळ सतरंज्या उचलायचे का ? एकनिष्ठ आणि निष्ठावंत कार्यकर्त्यांना हेच फळ देणार आहेत का असा प्रश्न स्थानिक कार्यकर्ते आणि नागरिकांमधून उपस्थित होत आहे.

प्रसार माध्यमांच्या प्रतिनिधी समोर येत कार्यकर्त्यांनी आपली खदखद व्यक्त करताना खुद्द आमदार बापूंनी आम्हाला चार चौघात उमेदवारी देण्याचा शब्द दिला होता. आता आयात उमेदवार प्रभागात दाखल होत असल्याने आम्ही पक्षात निष्ठावांत राहून काय करायचे असा प्रश्न उपस्थित करत आहेत. आम्हाला उमेदवारी न मिळाल्यास भाजप पक्ष कार्यालयासमोर आत्मदहन करू असा सज्जड इशारा शितल गायकवाड यांनी दिला आहे. त्यामुळे पक्षश्रेष्ठी, पालकत्व स्वीकारलेले आमदार तसेच पदाधिकारी मंडळी यांची डोकेदुखी वाढलेली आहे.

### संपूर्ण प्रभाग पिंजून काढला; घराघरात भाजप पोचवला

प्रभाग क्रमांक २२ मध्ये लोकसंख्या सुमारे ४२ हजार इतकी आहे. गेल्या अनेक वर्षांपासून प्रभागात लोकहिताचे कामे करत आहेत. संपूर्ण प्रभाग पिंजून काढला आहे. उमेदवार आयात केल्याने सर्वत्र संभ्रमावस्था आहे. पक्षाने उमेदवारी बाबत लवकर भूमिका जाहीर करावी असेही ते म्हणाले.

# वेळापुरात कारच्या धडकेत दुचाकीवरील महिलेचा मृत्यू

## पंढरपुर-पुणे रोडवरील घटना; एक जण जखमी

**तभा वृत्तसेवा,**
**वेळापूर, दि.२८ डिसेंबर-**

येथील पंढरपूर-पुणे रोडवर हॉटेल गरुडजवळ सकाळी साडेदहाच्या सुमारास दुचाकीला पाठीमागून कारने धडक दिल्याने एका महिलेचा जागीच मृत्यू तर एक जण जखमी झाला.



वेळापूर पोलीस स्टेशनला अंबादास तायाप्पा पवार यांनी फिर्याद दिली आहे. विझोरी निमगाव पाटी येथील राणूबाई तायप्पा पवार (वय ५५) असे तिचे नाव आहे. त्या २८ डिसेंबर रोजी रविवारी सकाळी शेजारचे अंकुश काळे यांच्याबरोबर जाताना सकाळी १०वा.३०मि.च्या सुमारास हॉटेल गरुड जवळ त्यांच्या दुचाकीला (एमएच ४५ एडब्ल्यू ३४५७) स्कोडा कंपनीची कार (एमएच ०२ डीझेड ४३६५) ने धडक दिली. या अपघाताबाबत विलास पवार यांनी अंबादास पवार यांना भ्रमणध्वनीवरून माहिती दिली. त्यानुसार पाहणी केली असता राणी तायप्पा पवार रोडच्या कडेला जखमी अवस्थेत पडलेल्या होत्या. तर तिच्यासमवेत असलेले अंकुश रामदास काळेही जखमी झाले होते. त्यांना ॲम्बुलन्स मध्ये ठेवून सरकारी दवाखान्यात नेण्यात आले.

तेथे तपासणी केली असता तिचा उपचारापूर्वीच मृत्यू झाल्याचे डॉक्टरांनी सांगितले. याबाबत प्रत्यक्षदर्शी रामचंद्र भगवान बोडरे यांनी माहिती सांगितिली. चालकाचे नाव तेजस दत्तात्रय हुजरे (रा. आळी ता. माणगाव गोरेगाव जि.रायगड) असे आहे तो तेथून पळून गेला आहे. वेळापूर पोलीस स्टेशनला या चालका विरोधात गुन्हा दाखल झाला असून तपास विजय देशपांडे हे करीत आहेत.

## संक्षिप्त...

### दिग्पाल लांजेकर यांच्या श्री शिवराज अष्टकातील सहावे पुष्प भेटीला


**सोलापूर, दि. २८ डिसेंबर-**

शिवचरित्रातील हा थरारक अध्याय 'रणपति शिवराय स्वारी आग्रा' भव्य चित्रपटातून शिवजयंतीदिनी १९ फेब्रुवारीला आपल्यासमोर येणार आहे.महाराजांचा देदिप्यमान इतिहास आणि त्यातील ज्वलंत अध्याय लेखक-दिग्दर्शक दिग्पाल लांजेकर यांच्या श्री शिवराज अष्टक संकल्पनेअंतर्गत रुपेरी पडद्यावर सादर झाले. या संकल्पनेतील सहावे चित्रपटरुपी पुष्प 'रणपति शिवराय स्वारी आग्रा' या चित्रपटाचा टिझर नुकताच प्रदर्शित झाला आहे.औरंगजेबाच्या बलाढ्य मुघलसत्तेचा पोलादी पहारा भेदून महाराजांनी घेतलेली मोठी जोखीम, औरंगजेबाच्या दरबारातील बाणेदार प्रसंग याची रोमांचकारी झलक या टिझर मधून दिसून येत आहे.पॅनोरमा स्टुडिओज आणि मुगाफी निर्मित 'रणपति शिवराय स्वारी आग्रा' या भव्य चित्रपटाचे लेखन-दिग्दर्शन दिग्पाल लांजेकर यांचे आहे. कुमार मंगत पाठक,अभिषेक पाठक,विपुल अग्रवाल, जेनील परमार, मुरलीधर छतवानी,चित्रपटाचे निर्माते आहेत. सहनिर्माते रवींद्र औटी,तान्शा बत्रा,आलोक शर्मा आहेत.

### आहेरवाडीची प्राची घोडकुंबेला विद्यापीठ व्हॉलिबॉल स्पर्धेत रौप्य

**सोलापूर, दि. २८ डिसेंबर-**

पाटण येथील उत्तर गुजरात विद्यापीठात झालेल्या पश्चिम विभागीय व्हॉलिबॉल स्पर्धेत पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाने रौप्य पदक प्राप्त केले. त्यात आहेरवाडीच्या व संगमेश्वर महाविद्यालयात शिकत असलेल्या प्राची अरुण घोडकुंबेचा समावेश होता. प्राचीने नांदेड येथे झालेल्या राज्यस्तरीय आंतरविद्यापीठ क्रीडा महोत्सवातही भाग घेतला होता. तिला प्रशिक्षक मलिक नदाफ व महाविद्यालयाचे शारीरिक शिक्षण संचालक आनंद चव्हाण यांचे मार्गदर्शन लाभले. तिचे प्राचार्य डॉ. ऋतुराज बुवा यांनी अभिनंदन केले.





# भारताच्या वैदेही चौधरीला विजेतेपद

**सोलापूर, दि. २८ डिसेंबर -**

महाराष्ट्र राज्य लॉन टेनिस संघटना व सोलापूर जिल्हा लॉन टेनिस असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित केलेल्या ओऑसिस, प्रिसीजन, इलिझियम-जामश्री व बालाजी अमाईन्स पुरस्कृत जामश्री - इलिझियम सोलापूर ओपन २०२५ महिलांच्या ३० हजार डॉलरच्या आयटीएफ टेनिस स्पर्धेत एकेरीत भारताच्या वैदेही चौधरी हिने विजेतेपद संपादन केले.

कुमठा नाका येथील जिल्हा क्रीडा संकुलातील एमएसएलटीए टेनिस सेंटरवर झालेल्या या स्पर्धेत अंतिम फेरीत सहाव्या मानांकित भारताच्या वैदेही चौधरी हिने जपानच्या मिचिका ओझेकीचा ३-६, ६-३, ६-४असा संघर्षपूर्ण पराभव केला. या स्पर्धेचे प्रायोजक जामश्रीचे बर्जीन मास्टर इलिजियम क्लबचे शर्लि डिसूझा व सौरभ गुप्ता यांचा पोलीस आयुक्त एम राज कुमार यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. उपविजेती जपानची मिचीका ओझेकीला राम रेड्डी यांच्या हस्ते तसेच विजेत्या भारताची वैदेही चौधरीला शर्लि डिसूझा यांच्या हस्ते बक्षीस देऊन गौरविण्यात आले .

### बंडगर व गांधी यांच्यासह बॉल बॉय व गर्ल यांचा सन्मान

सदर स्पर्धेदरम्यान खेळाडूंना दळणवळनाचे उत्तम सुविधा उपलब्ध करून दिल्या गांधी हुंडाईचे ब्रिजेश गांधी यांचा सन्मान करण्यात आला. सन २०२५ मध्ये लॉन टेनिस क्रीडा स्पर्धेत उत्तम कामगिरी करून सोलापूरचा नाव लौकिक केल्याबद्दल संध्याराणी बंडगर यांचा वैदेही चौधरी यांच्या हस्ते स्मृती चिन्ह देवून सत्कार करण्यात आला. स्पर्धेदरम्यान सर्वोत्कृष्ट बॉल बॉय म्हणून पार्थ वल्लोजी याला तर सर्वोत्कृष्ट बॉल गर्ल म्हणून अंजली गायकवाड तसेच स्पर्धेदरम्यान मोलाची कामगिरी बजावणाऱ्या श्रीकांत कामरेड्डी, अथर्व भोसले , पर्यवेक्षक नितीन कन्नमवार, फिझिओ थेरोपिस्ट निकिता पाटील यांनाही भेट वस्तू देऊन गौरविण्यात आले.

# वालचंद शिक्षकेतर संघ उपांत्य फेरीत



## श्रीमान भाऊसाहेब गांधी स्मृती चषक क्रिकेट स्पर्धा

### वालचंद पीजी-युजी संघाचीही घोडदौड

**सोलापूर, दि. २८ डिसेंबर-**

श्रीमान भाऊसाहेब गांधी स्मृती चषक क्रिकेट स्पर्धेत वालचंद शिक्षकेतर संघाने उपांत्य फेरीत प्रवेश केला. दुसऱ्या सामन्यात वालचंद पीजी-युजी संघानेही शानदार विजय मिळविला.

वालचंद इन्स्टिटयूट ऑफ टेक्नॉलॉजी क्रीडांगणावर सुरू असलेल्या या स्पर्धेत वालचंद शिक्षकेतर संघाने हिराचंद नेमचंद संघावर ३५ धावांनी मात केली. पहिल्या सामन्याचे उद्घाटन वालचंद कॉलेजचे अधिक्षक संतोष सरसमकर व कस्तुरबाई कॉलेजचे अधिक्षक जितेंद्र कंबोज यांच्या हस्ते झाले. दुसऱ्या सामन्यात वालचंद पदवी व पदव्युत्तर संघाने वालचंद अभियांत्रिकी शिक्षकेतर संघाचा ५ धावांनी पराभव केला. या सामन्याचे उद्घाटन वालचंद कॉलेजच्या रसायनशास्त्र विभागाचे डॉ. एम. आर. आसबे यांनी केले.

**संक्षिप्त धावफलक :** वालचंद शिक्षकेतर संघ : ८ षटकांत १ बाद १२२ (समाधान कासार ७८, हरी काळे ४०) वि. वि. एच. एन. सी. सी. : ८ षटकांत १ बाद ८७ (सतीश बागल ४०). वालचंद पदवी व पदव्युत्तर : ८ षटकांत ४ बाद ७४(श्री. लिगाडे ३७) वि. वि. वालचंद अभियांत्रिकी शिक्षकेतर संघ : ८ षटकांत २ बाद ६९.

# किशोरींमध्ये धाराशिव-सोलापूर आमने सामने

## ३९ वी किशोर किशोरी राज्य अजिंक्यपद खो-खो स्पर्धा

### किशोर गटात पुणे, सातारा अंतिम फेरीत

**मुंबई दि.२८ डिसेंबर-**

वडाळा येथे शारीरिक शिक्षण क्रीडा मंडळाच्या मैदानावरती सुरू असलेल्या ३९ व्या किशोर किशोरी राज्यस्तरीय खो खो स्पर्धेच्या अंतिम फेरीचे चित्र स्पष्ट झाले असून किशोर गटात पुणे विरुद्ध सातारा तर किशोरी गटामध्ये धाराशिव विरुद्ध सोलापूर यांच्यात जेतेपदासाठी लढत होणार आहे. किशोरी गटामध्ये गतवर्षीच्या विजेते उपविजेते संघामध्येच लढत पाहायला मिळणार असून मागील वर्षीच्या पराभवाचा वचपा धाराशिव काढणार का हे पाहणं उत्सुकतेच ठरणार आहे.

**सोलापूरकडून ठाण्याचा पराभव**

किशोरी गटामध्ये पहिल्या उपांत्य सामन्यात सोलापूरने ठाण्याचा (२७-२३) अवघ्या चार गुणांनी पराभव करत अंतिम फेरी गाठली. मध्यंतराला (१४-०८) मिळालेली सहा गुणांची आघाडी सोलापूरच्या विजयासाठी निर्णायक ठरली. सोलापूर कडून कार्तिकी यलमार (२ मि.नाबाद २.३० मि. संरक्षण, ४ गुण) ऋतुजा सुरवसे



(२.४० मि. नाबाद .२० मि. संरक्षण, २ गुण) यांचा खेळ सोलापूरच्या विजयाचा शिल्पकार ठरला. ठाण्याकडून निधी जाधव (२.४० मि.१.४०मि. संरक्षण) मानसी कांबळे (२.१० मि. संरक्षण, २ गुण) यांनी झुंजार खेळी करून देखील अपयशाला सामोरे जावे लागले. सोलापूर कडून ठाण्याला चार गुणांनी पराभव पत्करावा लागला.

**पुण्याची ठाण्यावर डावाने मात**

किशोर गटाच्या सामन्यामध्ये पुण्याने ठाण्याचा (२४-१४) असा एकदा दहा गुणांनी दणदणीत विजय मिळवला. मध्यंतरापर्यंत धारदार आक्रमण आणि ड्रीम रनच्या जोरावरती (२१-०६) पुण्याकडे पंधरा गुणाची भक्कम आघाडी घेतली.पुण्याकडून सोहम देखमुखे (नाबाद २.५० मि, १.२० मि. संरक्षण) उमेश डोंगरे (३ मि. संरक्षण, ४ गुण) वेदांत गायकवाड (१.०८ मि. संरक्षण, ८ गुण) यांनी दमदार खेळ केला. ठाणे कडून तन्मय हुले (१.३० मि. संरक्षण, ४ गुण) अरुण गरेल (१.४० मि. संरक्षण) संघाचा पराभवापासून बचावू शकले नाही. पुणे (२४-१४) संघाने १ डाव १० विजय संपादन केला.

### धाराशिवकडून सांगली पराभूत

किशोरी गटात झालेल्या दुसऱ्या उपांत्य चुरशीच्या सामन्यामध्ये सांगलीला पराभवाची चव चाखायला लावली. धाराशिवकडे मध्यंतराला (०९-११) अशी अवघ्या दोन गुणांची आघाडी होती. मध्यंतरानंतर दोन्ही बलाढ्य संघांकडून पूर्ण ताकतीचा खेळ करत विजयासाठी प्रयत्न करण्यात आले परंतु (२६-२३) असा तीन गुणांनी धाराशिव कडून सांगलीला पराभव स्वीकारावा लागला. धाराशिव कडून मुग्धा सातपुते (१.२७ मि. नाबाद १ मि. संरक्षण,६ गुण) स्वरांजली थोरात (नाबाद१.५५ मि. १.३८ मि. संरक्षण, ४ गुण) राही पाटील (२.२० मिनिट संरक्षण,४ गुण) यांच्या खेळाच्या जोरावर धाराशिव अंतिम फेरी धडक मारली. तर सांगलीकडून पायल तामखाडे (१.०५ मि. २.४० मि. संरक्षण, ६ गुण) अनुष्का तामखाडे (२.३० मि.नाबाद १.३० मि. संरक्षण, ४ गुण)वेदिका तामखाडे (२.२० मि, ०.४० मि.संरक्षण,४ गुण) यांनी केलेलं शर्तीचे प्रयत्न संघाला विजय मिळवून देऊ शकले नाहीत.

### धाराशिवने सातारास नमविले

उत्कृष्ट संरक्षणाच्या जोरावर सातारा संघाकडून धाराशिव संघाचा ८ गुण व ५ मिनिट राखून पराभव केला. मध्यंतरापर्यंतच सातारकडून (१०-२२) १२ गुणांनी आघाडी घेत पहिल्याच डावात सामन्यावर आपली पकड मजबूत केली. सातारा कडून खेळताना वरद पोळ ( २.३० मि. नाबाद ०.३० मि. संरक्षण,८ गुण) स्वराज उत्तेकर (१.४०मि.,नाबाद १.१० मिनिट संरक्षण, ४गुण) आयुष पांगरे (१.५०मि. .४०मि. संरक्षण, २ गुण) यांचा खेळ विजय मिळवला. धाराशिव कडून प्रफुल वसावे (१.२० ०.४० मि. संरक्षण) नरेंद्र केंद्रे (१.१०मि. संरक्षण) शंभुराजे इंगळे (नाबाद १मि., ०.५० मि.संरक्षण,४ गुण) केलेला खेळ पराभव टाळू शकला नाही.

CMYK

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## महत्त्वाचे

### वर्षाची सांगता केली फिटनेस महोत्सवाने



**कोलकाता** : दीपिका कुमारी आणि अतानू दास, तसेच बंगालमधील इतर ऑलिम्पियन व अर्जुन पुरस्कार विजेते २०२५ च्या फिट इंडिया संडेज ऑन सायकल या कार्यक्रमाच्या अंतिम सत्रासाठी रविवारी भारतीय क्रीडा प्राधिकरणाच्या कोलकाता प्रादेशिक केंद्रात उपस्थित होते. फिट इंडिया संडेज ऑन सायकलच्या ५४ व्या व वर्षाच्या शेवटच्या विशेष आवृत्तीमध्ये, कोलकाता येथील भारतीय क्रीडा प्राधिकरणाच्या केंद्रात सुमारे १,५०० सहभागींसह एका उत्साही, कार्निव्हल-शैलीतील उत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमात खेळाडू, कॉर्पोरेट व्यावसायिक, विद्यार्थी, सीआयएसएफ जवान, विमा कंपनीचे कर्मचारी (या आवृत्तीचे विशेष भागीदार) आणि सर्व वयोगटातील लोकांसह मोठ्या संख्येने उत्साही सायकलस्वार सहभागी झाले होते, ज्यामुळे हे ठिकाण हालचाल, संगीत आणि सामुदायिक भावनेचा एक चैतन्यमय उत्सव बनले होते.

### बोटीच्या अपघातात फुटबॉल प्रशिक्षक मार्टिन यांचा मृत्यू

**व्हॅलेन्सिया** : व्हॅलेन्सिया फुटबॉल संघाचे प्रशिक्षक फर्नांडो मार्टिन व त्यांच्या कुटुंबातील तीन सदस्यांचा इंडोनेशियामध्ये त्यांची बोट उलटल्याने मृत्यू झाला आहे, अशी माहिती स्पॅनिश फुटबॉल क्लबने दिली. स्थानिक अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार, इंडोनेशियातील दुःखद बोटीच्या अपघातात व्हॅलेन्सिया सीएफ फेमेनिनो बी चे प्रशिक्षक फर्नांडो मार्टिन आणि त्यांच्या तीन मुलांच्या निधनाने आम्हाला खूप दुःख झाले आहे, असे व्हॅलेन्सिया क्लबने म्हटले आहे. लाबुआन बाजो बेट या लोकप्रिय पर्यटन स्थळावर पादर बेटाच्या सामुद्रधुनीमध्ये खराब हवामानामुळे ११ लोकांना घेऊन जाणारी बोट बुडाल्यानंतर मार्टिन व त्यांची तीन मुले बेपत्ता होती, असे इंडोनेशियन आणि स्पॅनिश अधिकाऱ्यांनी सांगितले . रविवारी सकाळीही शोधकार्य सुरू होते.असे या भागातील इंडोनेशियाच्या शोध आणि बचाव संस्थेचे मोहीम समन्वयक फथुर रहमान यांनी सांगितले.

### ब्रेट लीला ऑस्ट्रेलियन क्रिकेट हॉल ऑफ फेम

**सिडनी** : माजी वेगवान गोलंदाज ब्रेट ली याचा ऑस्ट्रेलियन क्रिकेट हॉल ऑफ फेममध्ये समावेश करण्यात आला आहे. रविवारी ही घोषणा करण्यात आली. बेट ली यांच्या अपवादात्मक वेग, सातत्य आणि उल्लेखनीय खिलाडूवृत्तीने वैशिष्ट्यपूर्ण असलेल्या प्रभावी आंतरराष्ट्रीय कारकिर्दीचा गौरव करण्यात आला. ४९ वर्षीय ब्रेट लीला शोएब अख्तर याच्यासोबत इतिहासातील सर्वात वेगवान गोलंदाजांपैकी एक मानले जाते. त्याने १९९९ ते २०१२ या काळात ऑस्ट्रेलियाचे प्रतिनिधित्व केले, यात त्याने ७६ कसोटी, २२१ एकदिवसीय आणि २५ टी-२० आंतरराष्ट्रीय सामने खेळले. आपल्या संपूर्ण कारकिर्दीत, सर्व फॉरमॅटमध्ये मिळून त्याने एकूण ७१८ बळी घेतले. कसोटीत त्याने ३१० बळी, तर एकदिवसीय आणि टी-२० आंतरराष्ट्रीय सामन्यांमध्ये अनुक्रमे २२१ आणि ३८ बळी घेतले. हा माजी वेगवान गोलंदाज टी-२० फॉरमॅटच्या सुरुवातीच्या वर्षांमधील एक महत्त्वाचा अग्रणी होता, त्याने बिग बॅश लीगमध्ये सिडनी सिक्सर्ससह जगभरातील अनेक संघांसाठी खेळले. बिग बॅश लीगचे पहिले विजेतेपद पटकावणाऱ्या सिक्सर्स संघाचा तो एक भाग होता.

### जेमिमाह रॉड्रिग्जला हलकासा ताप

**तिरुवनंतपुरम्** : भारतीय फलंदाज जेमिमा रॉड्रिग्जला हलकासा ताप आल्यामुळे तिला अशक्तपणा आला आहे. त्यामुळे ग्रीनफिल्ड आंतरराष्ट्रीय स्टेडियमवर श्रीलंकेविरुद्धच्या चौथ्या महिला टी-२० सामन्यासाठी निवडण्यात आले नाही, अशी माहिती भारतीय क्रिकेट नियामक मंडळाने (बीसीसीआय) रविवारी दिली. बीसीसीआयची वैद्यकीय टीम तिच्या प्रकृतीवर आणि पुनर्प्राप्तीवर बारकाईने लक्ष ठेवून आहे, असे बीसीसीआयने म्हटले आहे. जेमिमाच्या जागी अष्टपैलू हरलीन देओलला सामन्यासाठी अंतिम एकादशमध्ये स्थान मिळाले आहे. या मालिकेत यजमान भारतीय संघाने ३-० अशी अभेद्य आघाडी घेतली आहे. जेमिमाहने ६९ नाबाद, २६ आणि नऊ धावा केल्या आहेत आणि ती सलामीवीर शेफाली वर्मानंतर या मालिकेत दुसरी सर्वाधिक धावा करणारी खेळाडू आहे. नाबाद ६९ धावांच्या खेळीमुळे जेमिमाहने महिला टी-२० फलंदाजी क्रमवारीत पाच स्थानांची झेप घेत नवव्या स्थानावर पोहोचली आहे.

# सूर्या करिश्मा, ऋत्विक संजीवी विजेते

## वरिष्ठ राष्ट्रीय बॅडमिंटन स्पर्धा



सूर्या करिश्मा



सात्त्विक-राधिका



ऋत्विक संजीवी

◆ **विजयवाडा, २८ डिसेंबर**

सूर्या करिश्मा तामिरीने स्थानिक प्रेक्षकांच्या जोरदार पाठिंब्याच्या जोरावर तन्वी पात्रीवर पिछाडीवरून मात करत विजय मिळवला, तर ऋत्विक संजीवी एस.ने भरत राघवला पराभूत करून येथे रविवारी झालेल्या राष्ट्रीय वरिष्ठ गट बॅडमिंटन स्पर्धेत अनुक्रमे महिला आणि पुरुष एकेरीचे विजेतेपद पटकावले.

विजयवाडा येथे जन्मलेल्या १९ वर्षीय सूर्या करिश्माने महिला एकेरीच्या अंतिम फेरीत तन्वीवर १७-२१, २१-१२, २१-१४ असा विजय मिळवला, तर ऋत्विकने पुरुष एकेरीच्या अंतिम सामन्यात भरतला २१-१६, २२-२० असे हरवले.

स्थानिक लाडकी खेळाडू व सर्वात तरुण वरिष्ठ राष्ट्रीय विजेती होण्याचा प्रयत्न करणाऱ्या खेळाडू यांच्यातील बहुप्रतिक्षित महिला एकेरीचा अंतिम सामना अपेक्षेप्रमाणेच रोमांचक ठरला, कारण ५८ मिनिटांच्या या सामन्यात दोन्ही खेळाडूंना संधी मिळाल्या.

पहिल्या गेमच्या मध्यावर तन्वीने सामन्यावर नियंत्रण मिळवले आणि असे वाटत होते की तिने आपल्या प्रतिस्पर्धीला इतके निराश केले आहे की ती चुका करण्यास भाग पडेल.

दुसऱ्या गेममध्ये ६-५ अशा स्थितीत अशीच एक चूक झाली, जेव्हा सूर्या करिश्माने सर्व्हिस रिटर्न नेटमध्ये मारला, परंतु सर्व्हिस पंचांनी उंचीमुळे तो फॉल्ट ठरवला आणि त्यामुळे संभाव्य विजेतीला दिलासा मिळाला. त्यानंतर तिने सलग सात गुण मिळवून दुसऱ्या गेमवर नियंत्रण मिळवले.

निर्णायक गेममध्ये, सूर्या करिश्माने सुरुवातीला तन्वीला लांब रॅलीमध्ये गुंतवून ठेवले आणि त्यामुळे त्या तरुण खेळाडूवर थकवा दिसू लागला.

जरी तन्वीने आपल्या प्रतिस्पर्धीसोबत बरोबरी साधण्याचा प्रयत्न केला, तरी तिचा दम स्पष्टपणे संपला होता, कारण सूर्या करिश्माने १५-१४ पासून सलग सहा गुण मिळवून सामना जिंकला.

पुरुष एकेरीच्या अंतिम फेरीत, ऋत्विकने आपल्या उत्कृष्ट बचाव व संयमाच्या जोरावर भरत राघवच्या आव्हानावर मात केली.

पहिला गेम कोणत्याही अडचणीशिवाय जिंकल्यानंतर, दुसऱ्या गेममध्ये ऋत्विकवर दबाव आला, कारण त्याच्या प्रतिस्पर्धीने ९-५ अशी आघाडी घेतली होती.

२०२४ ओडिशा मास्टर्सच्या विजेत्याने सलग सहा गुण मिळवून पुन्हा आघाडी घेतली आणि असे वाटत होते की तो सहज विजय मिळवेल, परंतु दोन चुकीच्या निर्णयामुळे भरतला पुनरागमन करण्याची संधी मिळाली आणि त्याने गेम पॉइंटही मिळवला. पण रित्विकने संयम राखत आपल्या गेम प्लॅनवर ठाम राहिला आणि ३९ मिनिटांत सामना जिंकला, हे त्याचे कौतुक करायलाच हवे.

शिखा गौतम व अश्विनी भट के. यांच्या अनुभवी जोडीने दुसऱ्या मानांकित प्रिया देवी कोनजेंगबाम आणि श्रुती मिश्रा यांचा २१-१४, २१-१८ असा पराभव करून महिला दुहेरीचे विजेतेपद पटकावले, तर अव्वल मानांकित हरिहरन आमसकरुणन आणि आर रुबन कुमार यांनी मिथिलिश पी. कृष्णन आणि प्रेजन यांचा २१-१७, २१-१२ असा पराभव करून पुरुष दुहेरीचा अंतिम सामना जिंकला. (वृत्तसंस्था)

### सात्त्विक-राधिका मिश्र दुहेरीचे विजेते

दुसऱ्या मानांकित सात्त्विक रेड्डी के. आणि राधिका शर्मा या जोडीने अव्वल मानांकित आशिथ सूर्या आणि अमृता पी. या जोडीचा २१-९, २१-१५ असा पराभव करून मिश्र दुहेरीचे विजेतेपद पटकावले.

# हम्पी संयुक्त आघाडीवर; गुकेश, एरिगसी शर्यतीत कायम

### जागतिक जलद बुद्धिबळ



◆ **दोहा, २८ डिसेंबर**

विद्यमान विजेती कोनेरू हम्पीने आपला वैशिष्ट्यपूर्ण संयम व चिकाटी दाखवत महिलांच्या गटात संयुक्त आघाडी कायम राखली, तर भारताचे स्टार खेळाडू डी. गुकेश व अर्जुन एरिगसी हे देखील दोहा येथे सुरू असलेल्या फिडे जागतिक जलद बुद्धिबळ अजिंक्यपद स्पर्धेच्या दुसऱ्या दिवशी ओपन गटात शर्यतीत कायम राहिले.

महिलांच्या गटात आणखी तीन फेऱ्या शिल्लक असताना, हम्पीने जास्तीत जास्त आठ गुणांपैकी ६.५ गुणांसह चीनच्या झू जिनरसोबत संयुक्त आघाडी घेतली आहे. या दोघींच्या मागे भारताच्या द्रोणावल्ली हरिकासह १० खेळाडू प्रत्येकी सहा गुणांसह होते.

तथापि, क्लासिकल विश्वविजेता गुकेशचा लढवय्या बाणा लक्षवेधी ठरला, जरी या भारतीय खेळाडूने स्पर्धेच्या सुरुवातीलाच या हंगामातील शेवटच्या स्पर्धेकडून फारशा अपेक्षा नसल्याचे म्हटले होते.

नऊ फेऱ्यांनंतर गुकेश व एरिगसी ६.५ गुणांसह १३ खेळाडूंच्या गटात चांगल्या स्थितीत होते व संयुक्त आघाडीवर असलेल्या व्लादिस्लाव्ह आर्तेमिएव्ह आणि हॅन्स नीमन (प्रत्येकी ७.५ गुण) यांच्यापेक्षा हे भारतीय खेळाडू केवळ एका गुणाने मागे होते.

नेदरलॅण्डचा ग्रॅण्डमास्टर अनिश गिरी व अलेक्सी साराना यांच्याविरुद्धच्या दोन लढती बरोबरीत सुटल्यानंतर गुकेशने आठव्या फेरीत एका रोमांचक सामन्यात स्पेनच्या डेव्हिड अँटोनवर विजय मिळवला.

पुढील फेरीत त्याला नोदिरबेक अब्दुसत्तोरोव्हने किंग्ज इंडियन अटॅकमध्ये पराभूत केले, जो या स्पर्धेत भारतीयाचा आतापर्यंतचा एकमेव पराभव आहे.

तथापि, २७ वर्षीय रशियन ग्रॅण्डमास्टर आर्तेमिएव्हनेच सर्वांचे लक्ष वेधून घेतले, कारण त्याने प्रथम विश्वमानांकित व पाच वेळा विश्व रॅपिड विजेता असलेल्या कार्लसन व एरिगसी यांना पराभवाची धूळ चारली. संयुक्त आघाडीवर असलेले आर्तेमिएव्ह व निमन यांच्यामागे अर्ध्या गुणाच्या फरकाने चार खेळाडू आहेत- कार्लसन, अलेक्सी साराना, यागिज एर्दोगमुस आणि नोदिरबेक अब्दुसत्तोरोव्ह.

दिग्गजांना पराभूत करणारा आर्तेमिएव्हने एरिगसीविरुद्ध विजयाने सुरुवात केली. सातव्या फेरीत, आर्तेमिएव्हने कार्लसनला पराभूत केले. या विजयामुळे आर्तेमिएव्हचे ६.५ गुण झाले व तो इतर खेळाडूंपेक्षा पूर्ण एक गुणाने पुढे आहे. (वृत्तसंस्था)

# शादाब खान पाकिस्तान टी-२० संघात परतला

◆ **लाहोर, २८ डिसेंबर**

पाकिस्तानने पुढील महिन्यात श्रीलंकेत होणाऱ्या टी-२० आंतरराष्ट्रीय मालिकेसाठी अष्टपैलू शादाब खानला संघात परत बोलावले आहे, परंतु या मालिकेसाठी अव्वल फलंदाज बाबर आझम किंवा वेगवान गोलंदाज शाहीन आफ्रिदीला ऑस्ट्रेलियातील बिग बॅश लीगधून परत बोलावलेले नाही. या वर्षी जूनपासून खांद्याच्या शस्त्रक्रियेमुळे संघाबाहेर असलेल्या शादाबने ७ जानेवारीपासून सुरू होणाऱ्या तीन सामन्यांच्या मालिकेसाठी पुनरागमन केले आहे. त्याने या महिन्यात बिग बॅश लीगमध्ये सहभाग घेऊन स्पर्धात्मक क्रिकेटमध्ये पुनरागमन केले. त्याने त्याच्या इतर देशबांधवांपेक्षा चांगली कामगिरी केली आहे. बीबीएलमधील इतर पाकिस्तानी खेळाडू बाबर, शाहीन, हॅरिस रौफ, हसन अली आणि मोहम्मद रिझवान यांना संघात बोलावण्यात आले नाही आणि ते ऑस्ट्रेलियन लीगमध्ये खेळणे सुरू ठेवतील. या सर्व खेळाडूंनी निवडकर्त्यांना गरज भासल्यास ऑस्ट्रेलियातून परत येण्यास पाकिस्तान क्रिकेट बोर्डाला संमती दिली होती. (वृत्तसंस्था)

# कसोटी प्रशिक्षकपदी गंभीरच्या जागी लक्ष्मण नाही

### बीसीसीआयचे स्पष्टीकरण

◆ **नवी दिल्ली, २८ डिसेंबर**

गौतम गंभीरच्या जागी भारतीय कसोटी क्रिकेट संघाचे प्रशिक्षकपद स्वीकारण्यासाठी महान फलंदाज व्ही. व्ही. एस. लक्ष्मणशी संपर्क साधलाले नाही, असे म्हणत भारतीय क्रिकेट नियामक मंडळाचे (बीसीसीआय) सचिव देवजित सैकिया यांनी या अटकळांचे खंडन केले आहे.

बीसीसीआयच्या वर्तुळात, २०२५-२७ च्या जागतिक कसोटी अजिंक्यपद स्पर्धेच्या उर्वरित नऊ कसोटी सामन्यांसाठी गंभीर कसोटी संघाचे नेतृत्व करण्यासाठी योग्य व्यक्ती आहे की नाही, यावर अद्याप अंतिम निर्णय झालेला नाही, असे समजते.

इंग्लंडमध्ये पाच कसोटी





सामन्यांची मालिका २-२ अशी बरोबरीत सोडवल्यानंतर, भारताला ऑगस्ट २०२६ मध्ये श्रीलंकेविरुद्ध प्रत्येकी दोन कसोटी सामन्यांच्या दोन परदेश दौऱ्यांमध्ये खेळायचे आहे, त्यानंतर ऑक्टोबरमध्ये न्यूझीलंडचा दौरा आहे, आणि त्यानंतर जानेवारी-फेब्रुवारी २०२७ मध्ये ऑस्ट्रेलियाविरुद्ध पाच कसोटी सामन्यांची मालिका खेळायची आहे.

गत महिन्यात मायदेशात दक्षिण आफ्रिकेविरुद्धच्या दोन कसोटी सामन्यांच्या मालिकेत भारताच्या मानहानिकारक पराभवानंतर, बीसीसीआयने लक्ष्मण यांच्याशी संपर्क साधून त्याला कसोटी संघाचे प्रशिक्षण देण्यास रस आहे की नाही, हे विचारले होते, अशा काही अनिश्चित बातम्या होत्या.

तथापि, सैकिया यांनी या अफवांना अटकळ म्हणून फेटाळून लावले. 'ही पूर्णपणे चुकीची बातमी पसरवली जात आहे. हे वृत्त पूर्णतः निराधार आहे, यात काहीही तथ्य नाही', असे ते म्हणाले. (वृत्तसंस्था)

# यशस्वी जयस्वाल मुंबई संघात सहभागी होणार

◆ **नवी दिल्ली, २८ डिसेंबर**

भारताचा डावखुरा सलामीवीर यशस्वी जयस्वाल ३१ डिसेंबर रोजी गोव्याविरुद्धच्या विजय हजारे चषक सामन्यापूर्वी मुंबई संघात सहभागी होणार आहे, अशी पुष्टी मुंबई क्रिकेट संघटनेचे (एमसीए) सचिव उन्मेश खानविलकर यांनी केली आहे.

रविवारी २४ वर्षांचा होणाऱ्या यशस्वी जयस्वालला तीव्र गॅस्ट्रोएन्टेरायटिसमधून बरे होत असल्यामुळे जयपूरमधील मुंबईचे पहिले दोन सामने खेळता आले नाहीत. यशस्वी गोवा विरुद्धच्या सामन्यात खेळेल. हा सामना ३१ डिसेंबर रोजी होणार आहे. तो २९ तारखेच्या सायंकाळी किंवा ३० तारखेच्या सकाळी संघात सहभागी होणार आहे, असे खानविलकर यांनी रविवारी सांगितले.

या महिन्याच्या सुरुवातीला, राजस्थानविरुद्धच्या मुंबईच्या सय्यद मुश्ताक अली चषक सुपर लीगच्या अंतिम



सामन्यानंतर पोटदुखीमुळे जयस्वालला रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. चाचण्यांमध्ये त्याला तीव्र गॅस्ट्रोएन्टेरायटिस झाल्याचे निष्पन्न झाले व डॉक्टरांनी त्याला आठवडाभर विश्रांतीचा सल्ला दिला होता.या स्पर्धेच्या पहिल्या दोन सामन्यांमध्ये भारताचा अनुभवी सलामीवीर रोहित शर्माने मुंबईसाठी डावाची सुरुवात केली होती, आता जयस्वाल त्याच्या जागी संघात येणार आहे. गोवा विरुद्धचा हा सामना नवीन वर्षाच्या पूर्वसंध्येला अनंतम् मैदानावर खेळला जाणार आहे.

जयस्वाल विजय हजारे चषकांत मुंबईसाठी आणखी सामने खेळेल अशी अपेक्षा आहे, तथापि, त्याची उपलब्धता न्यूझीलंडविरुद्धच्या तीन सामन्यांच्या एकदिवसीय मालिकेसाठी भारताच्या संघ निवडीवर अवलंबून असेल. ही मालिका ११ जानेवारी रोजी वडोदरा येथे सुरू होत आहे.

विजय हजारे चषकांत मुंबईने एलिट गट क मधील पहिल्या सामन्यात सिक्कीमला ८ गड्यांनी पराभूत केले, त्यानंतर उत्तराखंडवर ५१ धावांनी विजय मिळवला. मुंबईचा पुढील सामना सोमवारी जयपूरिया विद्यालयाच्या मैदानावर स्पर्धेच्या तिसऱ्या फेरीत छत्तीसगडशी होणार आहे. (वृत्तसंस्था)

### दोन दिवसांत कसोटी संपल्याने एमसीजीचा क्युरेटरला धक्का

◆ **मेलबर्न, २८ डिसेंबर**

बॉक्सिंग डे कसोटीच्या पहिल्याच दिवशी २० बळी पडल्यानंतर मेलबर्न क्रिकेट मैदानाची निगा राखणारे मुख्य क्युरेटर मॅथ्यू पेज यांनी आपल्याला 'धक्का' बसल्याचे मान्य केले व खेळपट्टी गोलंदाजांसाठी खूपच अनुकूल होती हे कबुल केले.

पेज यांनी खेळपट्टीवर १० मिमी गवत ठेवण्याचा निर्णय घेतला होता. गत वर्षी हे प्रमाण ७ मिमी होते, तेव्हा ऑस्ट्रेलियाने पाचव्या दिवशी भारताचा पराभव केला होता. पण हा निर्णय उलटला, कारण सहा सत्रांमध्ये केवळ १४२ षटकांत ३६ बळी पडले आणि शनिवारी दुसऱ्या दिवशी उशिरा इंग्लंडने ऑस्ट्रेलियाचा चार गडी राखून पराभव केला.

पहिल्या दिवसानंतर मी धक्क्यात होतो, असे पेज यांनी सांगितले. कसोटी दोन दिवसांत संपल्याने आम्ही अर्थातच निराश आहोत. आम्ही एक रोमांचक कसोटी तयार केली होती, पण ती पुरेशी लांब चालली नाही. आम्ही यातून शिकू व पुढच्या वर्षी सर्व काही व्यवस्थित होईल याची खात्री करू, असे ते म्हणाले. आम्ही खेळपट्टीवर जास्त गवत ठेवले, कारण आम्हाला माहित होते की नंतरच्या काळात हवामान उष्ण होणार आहे आणि त्या वेळी आम्हाला आमच्या गवताची गरज भासणार आहे. तुम्ही मागे वळून पाहता आणि म्हणता, पहिल्या आणि दुसऱ्या दिवशी खेळपट्टीने गोलंदाजांना खूप जास्त मदत केली. जर तसे झाले नसते, तर आम्ही तिसऱ्या आणि चौथ्या दिवसासाठी स्वतःला खूप चांगल्या स्थितीत ठेवले असते, असे पेजने सांगितले. (वृत्तसंस्था)

### भारतीय संघाचे प्रतिनिधित्व केल्याबद्दल

# पाकिस्तानी कबड्डीपटूवर अनिश्चित काळासाठी बंदी

◆ **कराची, २८ डिसेंबर**

पाकिस्तानचा एक आंतरराष्ट्रीय कबड्डीपटू उबैदुल्ला राजपूत याच्यावर राष्ट्रीय महासंघाने अनिश्चित काळासाठी बंदी घातली आहे. उबहैदुल्ला या महिन्याच्या सुरुवातीला बहरीनमध्ये एका खाजगी स्पर्धेत भारतीय संघाकडून खेळला होता.



पाकिस्तान कबड्डी महासंघाने (पीकेएफ) आपत्कालीन बैठकीनंतर ही बंदी घातली. राजपूतने महासंघ किंवा इतर संबंधित अधिकाऱ्यांकडून अनिवार्य ना-हरकत प्रमाणपत्र (एनओसी) न घेता स्पर्धेत खेळण्यासाठी परदेशात प्रवास केल्याबद्दल त्याला दोषी ठरवण्यात आले.

राजपूतला शिस्तपालन समितीसमोर अपील करण्याचा अधिकार आहे, असे पीकेएफचे सचिव राणा सरवर म्हणाले.

राजपूतने एनओसीशिवाय परदेशात प्रवास केला इतकेच नाही, तर त्याने भारताच्या संघाचे प्रतिनिधित्व केले, त्यांची जर्सी घातली आणि एका सामन्यात विजय मिळवल्यानंतर भारतीय ध्वज आपल्या खांद्यावर गुंडाळला, या गोष्टींची महासंघाने गंभीर दखल घेतली आहे, असे त्यांनी सांगितले.

हा पूर्णपणे गैरसमज होता व खाजगी स्पर्धेत तो ज्या संघाकडून खेळणार होता तो भारतीय संघ असेल असे त्याला कधीही सांगण्यात आले नव्हते, असा दावा राजपूतने केला आहे, परंतु तो तरीही एनओसीच्या नियमांचे उल्लंघन केल्याबद्दल दोषी आहे, असे सरवर म्हणाले.

जीसीसी चषक स्पर्धेदरम्यान भारतीय जर्सी घालून व भारतीय ध्वज फडकवतानाचे त्याचे व्हिडीओ व फोटो समाज माध्यमावर व्हायरल झाल्यानंतर राजपूत अडचणीत सापडला.

एनओसी न घेता या स्पर्धेत सहभागी झाल्याबद्दल इतर खेळाडूंवरही बंदी घालण्यात आली आहे आणि दंड ठोठावण्यात आला आहे, असे सरवर यांनी सांगितले.

मला बहरीनमधील स्पर्धेत खेळण्यासाठी आमंत्रित करण्यात आले होते आणि त्याला एका खाजगी संघात सहभागी करण्यात आले होते, त्याबद्दल राजपूतने यापूर्वी माफी मागितली होती. 'पण नंतरपर्यंत मला माहित नव्हते की त्यांनी त्या संघाला इंडियन टीम असे नाव दिले आहे आणि मी आयोजकांना भारत आणि पाकिस्तानची नावे वापरू नका असे सांगितले होते. पूर्वीच्या खाजगी स्पर्धांमध्ये, भारतीय आणि पाकिस्तानी खेळाडू एका खाजगी संघासाठी एकत्र खेळले आहेत, परंतु कधीही भारत किंवा पाकिस्तानच्या नावाखाली नाही, असे तो म्हणाला होता. (वृत्तसंस्था)

# नवीन वर्ष महिला हॉकीसाठी आशादायी : दीपिका

◆ **नवी दिल्ली, २८ डिसेंबर**

नवीन हंगाम भारतीय महिला हॉकी संघासाठी नवी आशा आणि गती घेऊन येईल, असा विश्वास ड्रॅग-फ्लिकर दीपिका सेहरावतने व्यक्त केला.

महिला हॉकी संघाचे हे दुखापती, सातत्यपूर्ण कामगिरीचा अभाव व गमावलेल्या संधींनी भरलेल्या आव्हानात्मक राहिले. पाच महिन्यांच्या दुखापतीनंतर २२ वर्षीय आक्रमक खेळाडू दीपिका सेहरावत दिल्ली एसजी पायपर्स संघाकडून महिला हॉकी इंडिया लीगमध्ये पुनरागमन करण्यास सज्ज झाली आहे. नवीन वर्षात अनेक गोष्टी बदलतील. विश्वचषक पात्रता फेरी हे आमचे पहिले आव्हान असेल आणि त्यानंतर आशियाई क्रीडा स्पर्धा आहेत, असे दीपिकाने सांगितले.



संघाच्या प्रस्थानापूर्वी सराव सत्रादरम्यान घसरल्यामुळे तिला ऑगस्टमध्ये आशिया चषकातून बाहेर पडावे लागले होते. हा तिच्या कारकिर्दीतील सर्वात कठीण टप्प्यांपैकी एक होता, असे तिने सांगितले.हॉकीपासून दूर असलेले पाच महिने खूप कठीण होते. मी रागावत असे आणि रडत असे, की मी संघाबाहेर का आहे याचा विचार करत असे. माझी तयारी खूप चांगली होती. आता मी तंदुरुस्त आहे, त्यामुळे मला कोणतीही कसर सोडू इच्छित नाही, असे २०२५ च्या हॉकी इंडियाच्या सर्वोत्कृष्ट उदयोन्मुख खेळाडूचा पुरस्कार विजेत्या दीपिकाने सांगितले.

राष्ट्रीय संघासाठी हा हंगाम निराशाजनक ठरला, त्यांनी एफआयएच प्रो-लीगमध्ये शेवटचे स्थान पटकावले आणि दुसऱ्या-स्तरीय नेशन्स चषकामध्ये त्यांची घसरण झाली. आशिया चषकाच्या अंतिम फेरीत चीनकडून पराभव पत्करल्यामुळे त्यांना विश्वचषकासाठी थेट पात्रतेची संधीही गमवावी लागली. आता भारताला मार्चमध्ये हैदराबाद येथे होणाऱ्या विश्वचषक पात्रता फेरीत आपले स्थान निश्चित करावे लागेल, जिथे इंग्लंड, स्कॉटलंड, कोरिया, इटली, उरुग्वे, वेल्स आणि ऑस्ट्रिया हे संघही स्पर्धा करतील. (वृत्तसंस्था)





# सेन, सात्त्विक-चिरागने यश मिळविले

## २०२५ मधील भारतीय बॅडमिंटन ● युवा खेळाडूंनी आशेचा किरण दाखवला

◆ **नवी दिल्ली, २८ डिसेंबर**

दुखापती व अव्वल स्तरावरील असमान कामगिरीमुळे भारतीय बॅडमिंटनने एक कठीण २०२५ वर्ष पार केले, परंतु लक्ष्य सेनचे विजेतेपद, सात्त्विकसाईराज रन्कीरेड्डी व चिराग शेट्टी यांचे जागतिक अजिंक्यपद स्पर्धेतील पदक व पुढील पिढीच्या खेळाडूंनी केलेली उत्साहवर्धक प्रगती यामुळे या संक्रमणाच्या हंगामात माफक आशावाद निर्माण झाला.

हे वर्ष अनेकदा स्थिरीकरणापेक्षा पुनर्मूल्यांकनाचे अधिक वाटले, कारण प्रस्थापित खेळाडू सातत्य राखण्यासाठी संघर्ष करत होते आणि तंदुरुस्तीच्या समस्यांमुळे वर्षभर तयारी व लय विस्कळीत झाली होती.

या पृष्ठभूमीवर ऑस्ट्रेलियन ओपन सुपर ५०० मधील सेनचा विजय हा या हंगामातील सर्वात महत्त्वपूर्ण वैयक्तिक यश ठरला. पॅरिस ऑलिम्पिकमध्ये चौथ्या स्थानावर राहिल्यानंतरच्या कठीण काळानंतर या





विजेतेपदाने त्याला पुन्हा फॉर्ममध्ये आणले.

२०२३ मधील कॅनडा ओपननंतर सेनचे हे पहिले सुपर ५०० विजेतेपद होते आणि गेल्या वर्षी डिसेंबरमध्ये सय्यद मोदी आंतरराष्ट्रीय सुपर ३०० जिंकल्यानंतरचे हे त्याचे एकूण पहिले विजेतेपद होते. त्याने आणखी एक ट्रॉफी जिंकण्याच्या जवळ पोहोचला होता, परंतु अंतिम अडथळा पार करू शकला नाही आणि हाँगकाँग ओपनमध्ये उपविजेता ठरला.

एकूणच चढ-उताराच्या वर्षात, सात्त्विक व चिरागने हंगामाच्या सुरुवातीला दुखापत व आजाराशी झुंज देऊनही भारताची प्रमुख दुहेरी जोडी म्हणून आपला दर्जा पुन्हा एकदा सिद्ध केला.

या जोडीने पॅरिसमधील जागतिक अजिंक्यपद स्पर्धेत कांस्यपदक पटकावले, हाँगकाँग ओपन आणि चायना मास्टर्सच्या अंतिम फेरीत प्रवेश केला आणि बीडब्ल्यूएफ वर्ल्ड टूर फायनल्सच्या बाद फेरीत पोहोचणारी पहिली भारतीय पुरुष दुहेरी जोडी बनून वर्षाचा सकारात्मक शेवट केला.

माजी जागतिक क्रमवारीत पहिल्या क्रमांकावर असलेल्या किदाम्बी श्रीकांतसाठी, या हंगामात पुनरागमनाची झलक दिसली, परंतु त्याला कोणतेही विजेतेपद मिळाले नाही. त्याने मलेशिया मास्टर्स आणि सय्यद मोदी आंतरराष्ट्रीय स्पर्धेत उपविजेतेपद मिळवून जुन्या दिवसांची आठवण करून दिली, परंतु विजेतेपदाचा प्रदीर्घ दुष्काळ संपवण्याच्या प्रयत्नात तो थोडक्यात चुकला. सय्यद मोदी आंतरराष्ट्रीय स्पर्धेत, गायत्री गोपीचंद आणि ट्रीसा जॉली यांनी महिला दुहेरीचे विजेतेपद यशस्वीरित्या राखले.

**युवा खेळाडूंची आगेकूच**

सर्वात उत्साहवर्धक संकेत पुढील पिढीकडून आले. २० वर्षीय आयुष शेट्टीने आशादायक कामगिरी करत यूएस ओपन सुपर ३०० स्पर्धा जिंकली आणि बीडब्ल्यूएफ वर्ल्ड टूरवर सातत्याने स्पर्धा करण्यासाठी आवश्यक असलेले कौशल्य दाखवले.

त्याने जपानच्या कोडाई नाराओका, माजी विश्वविजेता लोह कीन यू, चीन तैपेईच्या चाऊ टिएन चेन आणि कॅनडाच्या ब्रायन यांग यांच्यावरही उल्लेखनीय विजय मिळवले. याहूनही अधिक लक्षवेधी ठरली १६ वर्षीय तन्वी शर्माची प्रगती अभिमानास्पद आहे. तिने जागतिक कनिष्ठ अजिंक्यपद स्पर्धेत मुलींच्या एकेरीत रौप्यपदक जिंकले. अमेरिकन ओपनच्या अंतिम फेरीत पोहोचल्यानंतर तिचे पहिले सुपर ३०० विजेतेपद थोडक्यात हुकले आणि सय्यद मोदी आंतरराष्ट्रीय स्पर्धेत नोझोमी ओकुहाराला पराभूत करून तिने या हंगामातील एक उत्कृष्ट विजय नोंदवला. गुवाहाटी मास्टर्समध्ये उपविजेतेपद मिळवून तन्वीने आपल्या वर्षाची सांगता केली.

उन्नती हुडानेही सातत्यपूर्ण प्रगती केली. जागतिक कनिष्ठ सांघिक अजिंक्यपद स्पर्धेत भारताला कांस्यपदक मिळवून देण्यात तिने महत्त्वाची भूमिका बजावली, त्यानंतर ओडिशा मास्टर्स विजेतेपद पटकावून ती जागतिक क्रमवारीत २३ व्या क्रमांकावर पोहोचली. (वृत्तसंस्था)

## महत्वाचे...



### प्रभाग चारमध्ये नगराध्यक्ष कल्याणशेट्टी यांचा मॉर्निंग दौरा

**अडचणींचा तात्काळ निपटारा करण्याचे आदेश**

**अक्कलकोट, दि.२८ डिसेंबर-**

अक्कलकोट नगरपरिषदेचे नवनिर्वाचित नगराध्यक्ष मिलन कल्याणशेट्टी यांनी प्रभाग चार मध्ये अचानक मॉर्निंग दौरा करुन प्रत्यक्ष पाहणी केले. यावेळी तात्काळ अडचणी व समस्या सोडविण्यासाठी संबंधित अधिकारी यांना आदेश दिल्याने जनतेतून समाधान व्यक्त होत आहे. प्रभाग क्रमांक चार मध्ये नगरसेवक अविनाश मडीखांबे निवडून आल्यानंतर त्यांनी या प्रभागातील विविध समस्या व अडचणी सोडवण्यासाठी सपाटा लावल्याने नगराध्यक्ष कल्याणशेट्टी यांनी प्रभाग चार मध्ये अचानक मार्निंग दौरा करून प्रत्यक्ष पाहणी केली. या पाहणी नंतर अडचणी व समस्या सोडविण्यासाठी संबंधित अधिकारी यांना आदेश दिले. यावेळी नगरसेवक अविनाश मडीखांबे, ऋतुराज राठोड, बबलू कामनुरकर, नन्नू कोरबू ,नावेद डांगे,आरोग्य अधिकारी नितीन शेंडगे आदी नगरसेवक उपस्थित होते.



### ताल साधनाच्या तबलावादन स्पर्धेत दिपराज हामणे द्वितीय

**बार्शी दि.२८ डिसेंबर -**

ताल साधना, सोलापूर या संस्थेतर्फे स्व. दत्तात्रय कुलकर्णी यांच्या स्मृतीप्रित्यर्थ दि. २५ डिसेंबर रोजी स्वतंत्र तबलावादन स्पर्धा आयोजित केल्या होत्या. या स्पर्धेत लहान गटातून चि.दिपराज रतिकांत हामणे याने द्वितीय क्रमांक मिळवला. तीन हजार रुपये रोख, स्मृतीचिन्ह व प्रमाणपत्र असे बक्षीसाचे सुरु होते. त्याने पंचम सवरी हा ताल घेऊन तबलावादन केले. या स्पर्धेमध्ये छत्रपती संभाजीनगर, अहिल्यानगर, जळगाव, लातूर, पुणे, मुंबई, सोलापूर अशा विविध ठिकाणाहून स्पर्धक सहभागी झाले होते. या तबलावादनासाठी अभिजीत कदम यांनी हार्मोनियमची साथ संगत केली. या स्पर्धे चे परीक्षण ज्येष्ठ तबलावादक पांडुरंग मुखडे व डॉ. सचिन कचोटे यांनी केले. या स्पर्धेसाठी दिपराजला संगीत शिक्षक प्रदीप सुतार यांचे मार्गदर्शन लाभले. या स्पर्धेत मिळालेल्या यशाबद्दल संगीत विशारद शंकर वाघमारे, संगीत संयोजक भालचंद्र राजगुरु व नागराज वाघमारे यांनी दिपराजचे अभिनंदन केले.


### साळमुखवाडीजवळ अपघाताची मालिका सुरुच

**पिलीव, दि. २८ डिसेंबर-**

सातारा-पंढरपूर महामार्गावरील अपुर्ण कामामुळे प्रवाशांना आपला जिव मुठीत धरून प्रवास करावा लागत आहे. साळमुखवाडी जवळील पुलाच्या अपुर्ण कामामुळे याठिकाणी वारंवार अपघाताची मालिका सुरूच आहे. दोन्ही बाजूला मोठे खड्डे खणले आहेत. थोडेफार काम करुन नंतर ते तसेच सोडून देण्यात आले आहे. पिलीवहून पंढरपूरकडे जाणारी स्कॉर्पिओ गाडी (एमएच ४५एक्यू३८००) अपुर्ण पुलाच्या कामाचा अंदाज न आल्यामुळे सरळ पुलावरून पलीकडे जाऊन उलटी झाली. सुदैवाने कोणतीही जिवितहानी झाली नाही. या महामार्गावर अनेक ठिकाणी रस्त्याची तसेच पुलाची कामे अपूर्ण आहेत. हा पंढरपूर, तुळजापूर, अक्कलकोट, गोंदवले यासह इतर अनेक तीर्थ क्षेत्राकडे जाण्यासाठी सोयीस्कर महामार्ग आहे. पण अपुर्ण कामामुळे प्रचंड त्रास सहन करावा लागत आहे. गेली पाच सहा वर्षांपासून काम काही केल्या पुर्ण होत नाही. याबाबत केंद्रीय मंत्री नितीन गडकरी, पालकमंत्री जयकुमार गोरे यांच्याकडे तक्रारी केल्या आहेत. अपुर्ण कामे ताबडतोब पुर्ण करावीत अशी मागणी प्रवाशातून होत आहे.

## निधन वृत्त...

### उमाकांत जोशी



**सोलापूर, दि. २८ डिसेंबर-**

उमाकांत दामोदर जोशी (वय ७८) रा. जुळे सोलापूर यांचे रविवारी अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात दोन मुले, सुना व नातवंडे असा परिवार आहे. त्यांच्यावर मोदी स्मशानभूमी येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.


### भौरम्मा शाबादी



**सोलापूर, दि. २८ डिसेंबर-**

गुरुवार पेठ येथील भौरम्मा श्रीशैल शाबादी (वय ७५, गुलबर्गा) यांचे रविवारी वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्या पश्चात तीन मुली, जावई, मुलगा, सूना, नातवंडे असा परिवार आहे. त्या संजीवकुमार बागलकोटी यांच्या सासू होत्या. रूपाभवानी रुद्रभूमीत त्यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार करण्यात आले.

### रुपचंदजी करवा



**बार्शी, दि. २८ डिसेंबर-**

रुपचंदजी रामपाल करवा (वय ९८ वर्ष) रा. रोडगा रस्ता यांचे शनिवारी वृद्धापकाळाने निधन झाले. बार्शीतील जुन्या पिढीतील आडत व्यपारी होते. समृद्धी लॉन्सचे मालक रवी करवा यांचे चुलते होत. त्यांच्या पश्चात एक मुलगा, पुतणे, सुना, नातवंडे असा परिवार आहे. रविवार दि. २८ रोजी सकाळी साडेअकरा वाजता अंत्यसंस्कार करण्यात आले.

### धोंडाबाई नेटके



**बार्शी, दि. २८ डिसेंबर-**

बार्शी तालुक्यातील घाणेगाव येथील धोंडाबाई नरसिंह नेटके (वय ८१) यांचे शनिवार दि. २७ रोजी रात्री ११ वाजता अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्यावर रविवारी घाणेगांव येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात एक मुलगा, सून, दोन मुली, जावई, नातवंडे, परतवंडे असा परिवार आहे.

# नाताळच्या सुट्ट्यांमुळे पंढरपूरात भाविकांची तोबा गर्दी

## चौफाळ्यासह महत्वाच्या चौकात वाहतूक कोंडी; बेशिस्त वाहतुकीमुळे अपघाताला निमंत्रण

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.२८ डिसेंबर -**

सध्या नाताळच्या सुट्यांमुळे धार्मिक पर्यटनासाठी येथे तोबा गर्दी आहे. पोलिसांकडून भाविकांच्या वाहनांना कोणतीही शिस्त लावली जात नसल्यामुळे शहरातील चौफाळ्यांसह महत्त्वाच्या प्रत्येक चौकामध्ये वारंवार वाहतूकीची कोंडी होत आहे. त्यामुळे सर्वसामान्य पंढरपूरकर नागरिक वैतागून गेला आहे. सर्रास भाविकांची चारचाकी वाहने मंदिर परिसरात येत असल्यामुळे वाहतूक पोलिस कुठे आहेत? पोलिसांची वाहतूक शाखा करते काय? असे एक ना अनेक संतप्त सवाल सर्वसामान्य पंढरपूरकरांमधून उपस्थित केले जात आहे.



सध्या नाताळाच्या सुट्टींचे दिवस आहेत. त्यामुळे धार्मिक पर्यटना बरोबरच विठुरायाच्या दर्शनासाठी परगावांहून येणाऱ्या भाविकांची संख्या जास्त आहे. भाविकांच्या गर्दीमुळे शहरातील सर्व मठ,धर्मशाळा, भक्तनिवास, भाविकांच्या गर्दीने फुल्ल झालेली दिसत आहेत. त्यामुळे भाविकांनी आणलेली चारचाकी वाहने चक्क बिनदिक्कपणे पार्किंग ऐवजी रस्त्यांवरच दिसत आहे. त्यामध्येच काही वाहनधारकांकडून वाहतुकीचे नियम पाळले जात नसल्यामुळे शहरात वारंवार वाहतूकीची कोंडी निर्माण होत आहे. या मध्ये भरीसभर म्हणून बेदरकारपणे वाहने चालविणाऱ्या वाहनचालकांमुळे रोजच छोट्या, मोठ्या अपघाताला देखील निमंत्रण दिले जात असल्याचे गेल्या काही दिवसां पासून दिसून येत आहे. मात्र वाहतूक पोलिस हे सर्व उघड्या डोळ्यांनी पाहून देखील बेजबाबदार वाहनचालकांवर कोणतीच कारवाई करताना दिसत नाहीत ही मात्र आश्चर्याची गोष्ट आहे.

शहरातील विठ्ठल मंदिराच्या पश्चिम व्दारा समोरच चौफाळा चौक आहे. त्यापुढे छत्रपती शिवाजी महाराज चौक या बरोबरच कर्मवीर भाऊराव पाटील महाविद्यालय चौक, प्रबोधनकार ठाकरे चौक, अर्बन बँक, संतपेठ, सांगोला रस्ता चौक, भादुले चौक, नाथचौक आदी महत्वाच्या परिसरात मोठमोठी दुकाने, रुग्णालये, हॉटेल, महाविद्यालय, मैदान आहेत. या परिसरात भाविकांच्या वाहनांची देखील नेहमीच वर्दळ असते. त्यामुळे या परिसरात दिवसरात्र रहदारी असते. त्यामानाने शहरात पार्किंगच्या व्यवस्था अपुऱ्या आणि तोकड्या आहेत. त्यामुळे भाविकांकडून सर्रासपणे शहरातील प्रमुख रस्त्यांवरच गाड्या पार्किंग केल्या जातात. अगदी नगरप्रदक्षिणा रस्त्यावर देखील वेगळी परिस्थिती दिसत नाही.

दरम्यान तुळजापूर, अक्कलकोट येथे परगावाहून येणाऱ्या भाविकांच्या गाड्या सर्रास शहराबाहेर पार्किंगच्या ठिकाणी थांबवाव्या लागतात. त्यानंतरच चालत भाविकांना त्या त्या ठिकाणच्या देवतांचे दर्शन करता येते. मात्र पंढरपूरात परिस्थिती अगदी उलटी दिसत आहे.

भाविकांची मोठी वाहने देखील अगदी चौफाळा, छत्रपती शिवाजी महाराज चौक येथून गावभागात सोडली जातात. त्यामुळे गर्दीच्या वेळी म्हणा किंवा ऐरव्ही देखील शहराच्या प्रत्येक चौकाचौकांमधून वाहतूकीची कोंडी होताना दिसते. त्यामुळे सर्वसामान्य पंढरपूरकर वारंवार होणाऱ्या या वाहतूकीच्या कोंडीला जाम वैतागून गेल्याचे दिसत आहे.

ऐरव्ही रस्त्यांच्या कडेला शहरातील नागरिकांचे नजरचुकीने वाहन आढळल्यास बेमालुमपणे चालन फाडणारे वाहतूक पोलिस ऐन गर्दीच्या वेळी कुठे असतात असा संतप्त सवाल शहरवासियांकडून आता विचारला जात आहे.

**स्वयंचलित सिंग्नल यंत्रणा बंद अवस्थेत**

नागरिकांच्या घामाच्या (कररुपातील ) पैशातून लाखो रुपये खर्चुन उभारण्यात आलेली स्वातंत्र्यवीर सावरकर चौकातील स्वयंचलित सिंग्नल यंत्रणा देखील अनेक वर्षापासून बंद अवस्थेतच आहे. ही स्वयंचलित सिंग्नल यंत्रणा सुरु ठेवल्यास मुख्य सावरकर चौक, स्टेशन रस्ता येथील वाहतूकीला बऱ्या शिस्त लागण्यास मदत होईल.

**वारंवार वाहतूक कोंडीची प्रमुख ठिकाणे**

शहरातील प्रमुख अंबाबाई पटांगण, जुनीपेठ,नवीन पेठ, चौफाळा, छत्रपती शिवाजी महाराज चौक, काळामारुती चौक,कालिका देवी चौक, भजनदासचौक, गजानन महाराज मठ परिसर, संपुर्ण प्रदक्षिणा रस्ता, स्टेशन रोड, केबीपी कॉलेज रस्ता, अहिल्यापुल रस्ता, तहसील कचेरी समोरील रस्ता, भक्तीमार्ग, अर्बन बँक मुख्य शाखा रस्ता, भादुले चौक, नगरपालिका समोरील रस्ता, संतपेठ, सांगोला चौक रस्ता, गोपाळपूर रस्ता, विवेक वर्धिनी समोरील रस्ता, अंबाबाई पटांगण या शिवाय शहर परिसरातील इतर काही रस्त्यांवर देखील वाहतूकीची प्रचंड कोंडी होत आहे.

# डाव्या चळवळींची प्रतीके उध्वस्त करण्याचा प्रयत्न होत आहे

## सरफराज अहमद : भाकपच्या वर्धापनदिनानिमित्त व्याख्यान

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि.२८ डिसेंबर-**

कष्टकरी वर्गाच्या संघर्षाच्या इतिहासाची साधने हे अत्यंत प्रेरणादायी आहेत, नेमकी तीच नष्ट करण्याचा प्रयत्न फॅसिस्ट भांडवली व्यवस्था करीत असल्याचे प्रतिपादन लेखक व पत्रकार सरफराज अहमद यांनी केले.




भारतीय कम्युनिस्ट पक्षाच्या १०० व्या वर्धापन दिनानिमित्त आयटक कामगार केंद्र बार्शी येथे व्याख्यान झाले. त्यावेळी ते बोलत होते. यावेळी कॉ. भारत भोसले यांच्या हस्ते ध्वजारोहण झाले. यावेळी भाकप राज्य कार्यकारिणी सदस्य कॉ. तानाजी ठोंबरे, अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे प्राचार्य चंद्रकांत मोरे, प्रा. हेमंत शिंदे, प्रा.डी.डी. मस्के, रमेश गवळी, प्रा.अशोक वाघमारे, शेकापचे कॉ. रविकुमार कानगुडे, सहसचिव कॉ.अजित लंगडे, कॉ. सतीश गायकवाड, कॉ. राजेंद्र करली, कॉ. महादेव पारसे, पै. मतीन शेख, डॉ. दिलीप कदम, कॉ. लक्ष्मण घाडगे, कॉ. बालाजी शितोळे उपस्थित होते. कार्यक्रमाचे अध्यक्षपदी जिल्हा सेक्रेटरी डॉ. प्रवीण मस्तुद होते. यावेळी कॉ. प्रा. ठोंबरे म्हणाले, डाव्या चळवळीवर हल्ला करण्याच्या उद्देशाने तयार झालेला फॅसिस्ट हिटलरी विचाराला कम्युनिस्ट पक्षाने नेस्तनाबूत करुन टाकले आहे. यावेळी अध्यक्ष कॉ. डॉ. मस्तुद म्हणाले, कार्ल मार्क्स यांनी दिलेल्या कम्युनिस्ट जाहीरनाम्यातून प्रेरणा घेत भारतात श्रमिक वर्गाच्या चळवळीला सुरुवात झाली. १९२० साली देशातील पहिली आयटक ही कामगार संघटना सुरु होऊन पुढे १९२५ साली कम्युनिस्ट पक्ष स्थापन झाला. जो पक्ष सातत्याने कामगार, कष्टकरी, शेतकरी, आदिवासी,दलित, महिला, मजूर,अल्पसंख्यांक, युवक, विद्यार्थी यांच्यासाठी काम करत आहे. कॉ. अनिरुद्ध नखाते यांनी सूत्रसंचालन केले. लहू आगलावे, भरत चव्हाण, श्रीकांत सोरेगावकर, आनंद गुरव, प्रमोद मंडलिक, सतीश जामदार, कॉ. शौकत शेख, चंद्रकांत देशमुख, निर्मला सरवदे, प्रमिला शिंदे , सुवर्णा नंदाने, छबुबाई ढोरे, सोनाली कदम, सुनील ढगे, अंजू तेवर आदी उपस्थित होते.



## टेंभुर्णीत खुळे यांच्या संपर्क कार्यालयाचे उद्घाटन

**संभाजी ब्रिगेडची जिल्हा आढावा बैठक संपन्न**

**तभा वृत्तसेवा,**
**टेंभुर्णी, दि.२८ डिसेंबर -**

टेंभुर्णी येथे २७ डिसेंबर रोजी संभाजी ब्रिगेड सोलापूर जिल्हाध्यक्ष सचिन खुळे यांच्या संपर्क कार्यालयाचे उद्घाटन राज्य कार्यकारिणी सदस्य दिनेश जगदाळे व प. महाराष्ट्र अध्यक्ष सचिन जगताप यांच्या हस्ते झाले. यावेळी माढा, माळशिरस व करमाळा तालुक्यातील पदाधिकाऱ्यांची जिल्हा आढावा बैठक घेण्यात आली.

यावेळी जिल्हा सचिव गणेश सव्वाशे, जिल्हा उपाध्यक्ष शंकर पोळ, जिल्हा संघटक सतीश चांदगुडे, माळशिरसचे तालुकाध्यक्ष दिगंबर मिसाळ, उपाध्यक्ष सचिन पराडे, संघटक राजेश पवार, कार्याध्यक्ष शरद लिंगाडे, करमाळा तालुकाध्यक्ष अमित घोगरे, कार्याध्यक्ष राजेश ननवरे, संघटक मयूर सावंत, माढा तालुका कार्याध्यक्ष बाळासाहेब वागज, तालुकाध्यक्ष कामगार आघाडी अजय गायकवाड, तालुकाध्यक्ष विद्यार्थी आघाडी शंकर नागणे, तालुका उपाध्यक्ष विद्यार्थी आघाडी किरण जाधव, माजी तालुकाध्यक्ष मराठा सेवा संघ अतुल वारे पाटील, शहराध्यक्ष टेंभुर्णी योगेश मुळे, संजय देशमुख, विजय काळे, अश्विन पाटील, विशाल पाटील, विकास शेळके व इतर पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते. श्री.जगदाळे यांनी पदाधिकारी व कार्यकर्त्यांना मार्गदर्शन केले. समाजाप्रती असलेले प्रेम, बांधिलकी व सकारात्मक भूमिका जपत राजकारणात नवे अस्तित्व निर्माण करण्याचे आवाहन त्यांनी केले.

यावेळी श्री.जगताप यांनी येणाऱ्या काळात होणाऱ्या राजकीय निवडणुका तसेच सामाजिक कार्यामध्ये संभाजी ब्रिगेड आपली वेगळी व ठळक ओळख निर्माण करेल असे सांगितले. श्री.खुळे यांनी जिल्हाध्यक्ष म्हणून येणाऱ्या काळात संपूर्ण ताकद व जिद्दीने संभाजी ब्रिगेडची पक्षबांधणी केली जाईल. असा विश्वास व्यक्त केला.

# बार्शी तालुक्यात सोपल गटाला मोठा धक्का



**चुंबचे माजी सरपंच किशोर जाधवर यांचा भाजपात प्रवेश**

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि.२८ डिसेंबर -**

तालुक्यातील चुंब व परिसरातील सोपल गटाचे समर्थक, माजी सरपंच किशोर जाधवर यांनी बार्शी तालुक्याचे माजी आमदार राजाभाऊ राऊत यांच्या उपस्थितीत भारतीय जनता पक्षात प्रवेश केला. यावेळी त्यांच्यासह त्यांच्या असंख्य कार्यकर्त्यांनी प्रवेश केला.

मा.आ. राजाभाऊ राऊत यांनी त्यांचे स्वागत करुन भावी वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. बाजार समिती, नगरपालिका निवडणुकीतही सोपल गटाकडून भाजपामध्ये प्रवेश सुरु होते. तसेच आगामी जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर सोपल गटातून प्रवेश होत आहेत.

## सतीश सावंत यांना राज्यस्तरीय उत्कृष्ट पत्रकारिता पुरस्कार

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला, दि.२८ डिसेंबर -**



डिजिटल मीडिया संपादक पत्रकार संघटनेचे प्रदेश उपाध्यक्ष सांगोला येथील सतीश सावंत यांना प्रेस लाईव्ह मीडियाच्या वतीने देण्यात येणारा राज्यस्तरीय उत्कृष्ट पत्रकारिता पुरस्कार जाहीर झाला असून आज सोमवार दि.२९ डिसेंबर रोजी स.११ वा. सांगलीमध्ये विविध मान्यवरांच्या हस्ते प्रदान करण्यात येणार आहे. त्यांनी गेली ३० वर्ष उल्लेखनीय पत्रकारितेचे काम केले आहे.

पत्रकारांच्या अडीअडचणीसाठी पत्रकारांना मार्गदर्शन करून त्यांच्या अडीअडचणी सोडवत आहेत. त्यांच्या या कार्याची दखल घेऊन सदर पुरस्कार जाहीर करण्यात आला. सदर पुरस्कार जाहीर झाल्याबद्दल सतीश सावंत यांचे सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे.

# कर वसुलीसाठी सुट्टीच्या दिवशीही ग्रामपंचायत कार्यालय सुरू

## थकबाकीदारांकडून कर वसुलीस उत्स्फूर्त प्रतिसाद

**तभा वृत्तसेवा,**
**दक्षिण सोलापूर, दि.२८ डिसेंबर-**

मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियानांतर्गत राज्यातील ग्रामपंचायतच्या थकीत कर वसूलीसाठी व थकबाकीदार नागरिकांसाठी विशेष मोहीम सुरू करण्यात आली आहे . या मोहिमेंतर्गत ३१ डिसेंबर पर्यंत कर भरणाऱ्या करदात्यांना थकबाकीच्या रकमेत ५० टक्के सवलत देण्यात येत आहे . त्यामुळे शनिवार २७ डिसेंबर व रविवार २८ डिसेंबर या सुट्टीच्या दिवशीही जिल्ह्यातील अनेक ग्रामपंचायतीत करवसूलीसाठी कामकाज सुरू होता. या दिवशी कर्मचाऱ्यांनी कर वसुलीसाठी विशेष परिश्रम घेतल्याचे दिसून आले. सुट्टी असतानाही थकबाकी कर वसुलीसाठी कर्मचाऱ्यांनी सकाळपासून संध्याकाळपर्यंत कार्यालयात उपस्थित होते . कर्मचारी उपस्थित असल्यामुळे नागरिकांकडूनही थकबाकी भरण्यासाठी उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाल्याचे कर्मचाऱ्यांनी सांगितले.



अनेक ग्रामपंचायतीचे थकित कर एक कोटीपेक्षा अधिक आहे. शासकीय योजनांचा लाभ घेणार्या, नोकरदार व निवडणुक लढविणार्या नागरीकांकडूनच घरपट्टी , पाणीपट्टी व ग्रामपंचायतीची इतर कर भरणा करण्यात येते. उर्वरित नागरीक करभरणा करण्यासाठी ग्रामपंचायतीकडे फिरकतही नाहीत. त्यामुळे थकीत कर रक्कम वसुलीसाठी राज्य सरकारने मुख्यमंत्री समृध्द पंचायत राज अभियानात विशेष मोहीम सुरू केल्याने नागरीकांकडून चांगला प्रतिसाद मिळाला आहे. ग्रामपंचायतीच्या सर्व कर्मचार्यांनी तन , मन व धनाने काम करून व जनजागृती करून अधिकाधिक थकीत रक्कम वसुली केल्याचे सांगण्यात येते. कर्मचार्यांनी परीश्रम घेऊन वसूल केलेली रक्कम गावाच्या विकासासाठी खर्च करण्यात यावे, अशी मागणी होत आहे.

**कर्मचाऱ्यांचे विशेष योगदान**



मुख्यमंत्री समृध्द पंचायत राज अभियानांतर्गत शासनाने ग्रामपंचायतीच्या थकित करवसुलीसाठी विशेष मोहीम राबविले. यासाठी ग्रामपंचायतीच्या सर्व कर्मचार्यांनी प्रामाणिक काम करून व जनजागृती करून अधिकाधिक रक्कम वसूल केली आहे. ३१ डिसेंबरपर्यंत मोहीम सुरू राहणार असून थकीत रक्कम वसूल करण्यात ग्रामपंचायत कर्मचार्यांचे विशेष योगदान आहे.

**- मनोज राऊत, गटविकास अधिकारी, पंचायत समिती, दक्षिण सोलापूर**

**करवसुलीस प्राधान्य**



शनिवार व रविवार सुट्टी असतानाही ग्रामपंचायत थकीत रक्कम वसूल करण्यासाठी सकाळी १० वाजल्यापासून संध्याकाळी ६ वाजेपर्यंत सर्व कर्मचारी कार्यालयात हजर होते. सुट्टी असतानाही नागरीकांनी थकीत रक्कम भरून उत्स्फूर्त प्रतिसाद दिला आहे.

**- शब्बीर लिगेवान, कर्मचारी, ग्रामपंचायत मंद्रूप, दक्षिण सोलापूर.**

CMYK
सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.






# सांगोल्याच्या जनतेने मला कधीच शून्य होऊ दिले नाही

## माजी आमदार शहाजीबापू पाटील यांचे प्रतिपादन

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला, दि.२८ डिसेंबर -**

गेल्या ४० वर्षांपासून एकट्याने लढायची मला सवय होती. सांगोला तालुक्यातील ही माझी पहिली लढाई नाही. मी शून्य होणार नाही. कारण सांगोलच्या जनतेने मला कधीच शून्य होऊ दिले नाही, असे प्रतिपादन माजी आ.शहाजीबापू पाटील यांनी केले.

शिवसेनेच्या वतीने छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे आयोजित सांगोला शहरातील म तदारांचे आभार सभेत ते बोलत होते. व्यासपीठावर माजी नगराध्यक्ष रफिक नदाफ, नूतन लोकनियुक्त नगराध्यक्ष आनंदा माने आणि १५ नगरसेवक यांच्यासह पदाधिकारी उपस्थित होते.

सांगोला तालुक्याची ओळख महाराष्ट्राच्या इतिहासात वेगळी आहे. येथे हुकूमशाही पध्दतीने राजकारण चालू देणार नाही. मी जर ही निवडणूक लावली नसती तर विरोधक घरात बसून मालक होत होती. हे निवडणूक सांगोला तालुक्यातील जनतेच्या स्वाभिमानाची होती, असेही ते म्हणाले.

महायुतीशी मी प्रामाणिक आहे. महायुतीमध्ये सांगोला मतदारसंघ शिवसेनेचा आहे. शिवसेनेचा सन्मान राखण्याचा शब्द द्या, तुमचा कुठलाही शब्द खाली पडू देणार नाही, असे सांगायलाही ते विसरले नाहीत. आनंद घोंगडे यांनी सूत्रसंचालन केले.

### मला एकाकी का पाडले?

सांगोला नगरपालिकेच्या निवडणुकीत मला एकाकी का पाडले; यावर मी बोलत नाही. यंदाच्या नगरपालिका निवडणुकीत निवडून आलेल्या नगराध्यक्ष व १५ नगरसेवक यांचे मी खास अभिनंदन करतो. ज्यांनी ज्यांनी धनुष्यबाणाचे बटन दाबले त्यांना उद्या स्वर्गातच जागा आहे. नरकात तुम्हाला देव घेत नाही, असेही माजी आमदार शहाजीबापू पाटील यांनी यावेळी बोलताना सांगितले.

# ‘दोन महायुध्दानंतरही जगात शांतता नांदली नाही’

## जननी जन्मभूमिश्च स्वर्गादपि गरियसी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२८ डिसेंबर-**

दोन महायुध्दानंतरही जगात शांतता नांदली नाही. रशिया-युक्रेन, हमास-इजराइल यांसारख्या संघर्षांच्या पार्श्वभूमीवर ‘सीमा-विस्तारापेक्षा जननी जन्मभूमिश्च स्वर्गादपि गरियसी’ असा राष्ट्रभक्तीचा व लोककल्याणाचा संदेश देणारे श्रीरामांचे विचार आज अधिकच महत्त्वाचे ठरतात, असे प्रतिपादन प्रा.धन्यकुमार बिराजदार यांनी केले.

अखिल भारतीय हिंदी महासभा व आंतरराष्ट्रीय रामायण व वैदिक शोध संस्थान-अयोध्या यांच्या संयुक्त विद्यमाने ‘भारतीय भाषा तथा साहित्य में श्रीराम’ या विषयावर अयोध्या येथे आयोजित आंतरराष्ट्रीय चर्चासत्रात बीजवक्ता म्हणून ते बोलत होते.

श्रीराम हे आदर्श पुत्र, आदर्श बंधू, आदर्श पती, आदर्श राजा व कुशल प्रशासक होते. न्याय, लोकहित, धर्मपालन व सामाजिक समरसता हे त्यांच्या राज्यकारभाराचे मूलतत्त्व होते. दैहिक, दैविक व भौतिक अशा तिन्ही तापांचे निवारण करणारे रामचरित्र मानवतेला दिशा देणारे आहे. सत्य, शील, करुणा, त्याग व सौंदर्याचे प्रतीक असलेले, स्त्री-अस्मितेचे रक्षक आणि मर्यादा पुरुषोत्तम श्रीराम हे लोककल्याणकारी असून त्यांचे जीवन व विचार आजच्या जागतिक अस्थिरतेच्या काळातही तितकेच प्रासंगिक आहेत, असेही त्यांनी सांगितले. या चर्चासत्रास राष्ट्रीय अध्यक्ष डॉ.अजय शुक्ल, कार्यकारी अध्यक्ष डॉ.राजाराम शेवाळे, राष्ट्रीय संघटन महामंत्री अमित रजक, महंत शैलेश दास, राष्ट्रीय उपाध्यक्ष ॲड.डॉ. सुमेर खजुरिया, नेपाळ हिंदी महासभेचे अध्यक्ष विष्णुलाल कुमाल यांच्यासह विविध राज्यांतील पदाधिकारी, अभ्यासक व प्राध्यापक मोठ्या संख्येने उपस्थित होते.



### विविध भाषेतील रामायण ग्रंथावर प्रकाशझोत

श्रीरामचरितमानस, कवितावली, एकनाथी रामायण, जैन रामायण, तमीळ भाषेतील कंब रामायण, बंगाली भाषेतील कृतिवास रामायण, कन्नड भाषेतील कुमारव्यास रामायण, तेलुगू भाषेतील रंगनाथ रामायण आणि आधुनिक भारतीय रामसाहित्य यांचा सविस्तर आढावा घेत प्रा.धन्यकुमार बिराजदार यांनी विविध भाषांतील रामायण परंपरेतील वैशिष्ट्यपूर्ण प्रसंगांवर प्रकाशझोत टाकला.




# जैन समाजाच्या सक्षमीकरणासाठी संघटित प्रयत्न अत्यावश्यक : गांधी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २८ डिसेंबर-**

जैन समाजाच्या सक्षमीकरणासाठी संघटित प्रयत्न, पंथभेद निर्मूलन, शासन दरबारी मागण्यांचा पाठपुरावा करणे अत्यावश्यक आहे. अल्पसंख्यांकांसाठी असलेल्या शासकीय योजनांचा १०० टक्के लाभ समाजातील गरजू घटकांपर्यंत पोहोचविणे हे आपले प्रथम कर्तव्य असल्याचे महाराष्ट्र शासनाच्या जैन अल्पसंख्यांक आर्थिक विकास महामंडळाचे प्रथम अध्यक्ष व अखिल भारतीय जैन अल्पसंख्यांक महासंघाचे राष्ट्रीय अध्यक्ष ललित गांधी स्पष्ट केले. जैन सीनियर सिटीझन ऑर्गनायझेशन (जैनस्को), सोलापूर या संस्थेचा १७ वा वर्धापन दिन येथील महावीर भवन येथे उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला. यावेळी ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ. सरिता कोठाडिया होत्या.

कार्यक्रमाची सुरुवात णमोकार महामंत्राने झाली. दीपप्रज्वलन, पुष्पार्पण व तुलसी रोपट्यास जलार्पण मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. मेळाव्यास डॉ. राजीव, डॉ. सी. तथागत, विलासभाई शहा, डॉ. मधुकर लोखंडे, डॉ. अजित माणिकशेटे, श्याम पाटील, डॉ. कुमठेकर, संतोषभाभी बंब, सागर शहा आदी मान्यवर उपस्थित होते. यावेळी डॉ. माधवी रायतेंनी आनंददायी जीवनशैलीचे चार आधार आहार, विहार, आचार आणि विचार या विषयावर अतिशय सुबोध भाषेत ज्येष्ठ नागरिकांना मार्गदर्शन केले. डॉ. सतोष कोटी यांनी ‘‘देखणे ज्येष्ठत्व’’ या विषयावर हसत-खेळत मार्गदर्शन करताना, ‘‘इतरांना आपल्यासोबत राहावेसे वाटले पाहिजे; तेव्हाच ज्येष्ठ व्यक्तिमत्व खऱ्या अर्थाने देखणे ठरते आणि घरात कुटुंबसौख्य वाढते’’ असे प्रतिपादन केले.

याच मेळाव्यात जागतिक दिव्यांग दिनानिमित्त जैनस्कोतर्फे दिव्यांग क्रिकेटपटू गंगा कदम यांची निवड झाल्याबद्दल सत्कार करण्यात आला. तसेच ज्ञानसेवा पुरस्कारासाठी निवड झाल्याबद्दल केतन शहा यांचा श्री. गांधी यांच्या हस्ते गौरव करण्यात आला. सूत्रसंचालन संगीता एखंडे यांनी केले. अरुण धुमाळ यांनी आभार मानले. जैनस्कोच्या विशेषांकाचे प्रकाशनही मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.

# महापालिका निवडणूक उमेदवारी अर्ज भरण्यासाठी उरले दोन दिवस बाकी



## आज, उद्या अनेकजण भरणार उमेदवारी अर्ज

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२८ डिसेंबर-**

सोलापूर महापालिका सार्वत्रिक निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज भरण्यासाठी सोमवार आणि मंगळवार असे दोनच दिवस राहिले आहेत. ३० डिसेंबर पर्यंत उमेदवारी अर्ज दाखल करण्याची मुदत आहे. सोमवारी विविध पक्षांकडून उमेदवारी अर्ज दाखल होतील. यामुळे या निवडणुकीत रंग भरला जाणार आहे

सोलापूर महापालिका निवडणुकीसाठी दिनांक २३ ते ३० डिसेंबर दरम्यान नामनिर्देशन पत्र देणे आणि स्वीकृती प्रक्रिया आहे. यामुळे सोमवारी व मंगळवारी विविध पक्षांकडून आपापल्या उमेदवारांची घोषणा केली जाईल. यामुळे कोणत्या पक्षाकडून कोण उभे राहणार याचे चित्र स्पष्ट होणार आहे.

महायुतीतील घटक पक्ष असलेल्या राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गट आणि शिवसेना शिंदे गटाची युती झाली आहे. दोघांमध्ये ५० - ५० टक्के जागा वाटपाचा निर्णय जाहीर केला आहे. यामुळे भाजपा आता स्वतंत्रपणे निवडणूक लढविणार असल्याचे चित्र समोर आले आहे.

महाविकास आघाडीत जागावाटप निश्चित झाले आहे. काँग्रेसला ४५, शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाला ३०, राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाला २० आणि माकपाला ७ असे जागावाटप झाले आहे. शेवटच्या टप्प्यापर्यंत विविध पक्षात प्रवेशाचे राजकीय नाट्य सुरुच असल्याचे दिसून येते.

### आजपर्यंत ३५ नामनिर्देशन अर्ज दाखल

सोलापूर महापालिका निवडणुकीसाठी आतापर्यंत एकूण ३५ नामनिर्देशन अर्ज दाखल झाले आहेत. एकूण ४ दिवसात ३ हजार ३८५ नामनिर्देशन अर्जांची विक्री झाली आहे. सोलापूर महापालिकेतील विविध ना हरकत प्रमाणपत्रासाठी सुरू केलेल्या एक खिडकी योजना कक्षामध्ये दि.२१ ते २८ डिसेंबर २०२५ पर्यंत प्रत्यक्ष १ हजार ६२३ अर्ज दाखल झाले. ऑनलाईन पद्धतीने ६८५ अर्ज प्राप्त झाले आहेत, अशी माहिती महापालिका प्रशासनाकडून देण्यात आली.

### असा आहे निवडणुकीचा कार्यक्रम

अर्ज देणे व स्वीकारण्याची प्रक्रिया ३० डिसेंबर २०२५ पर्यंत राहणार आहे. अर्ज छाननी दि. ३१ डिसेंबर २०२५ रोजी होणार असून त्याच दिवशी वैध उमेदवारांची यादी प्रसिद्ध करण्यात येईल. दि.२ जानेवारी २०२६ पर्यंत उमेदवारी अर्ज मागे घेता येणार आहे. दि.३ जानेवारी रोजी चिन्ह वाटप व अंतिम उमेदवारांची यादी प्रसिध्द. दि.१५ जानेवारी रोजी मतदान तर दि.१६ जानेवारी रोजी मतमोजणी होणार आहे. दि. १९ जानेवारी २०२६ पर्यंत निकाल शासन राजपत्रात प्रसिध्द करण्यात येणार आहे.

# मरिआई मंदिरातील मूर्ती नेली चोरुन

**तभा वृतसेवा**
**मंगळवेढा दि.२८ डिसेंबर**

महमदाबाद हुन्नूर येथील मरिआई मंदिरामधील ७३ हजार ५०० रुपये किंमतीच्या चांदीच्या मुर्त्या चोरुन नेल्याचा प्रकार घडला असून या प्रकरणी अज्ञात चोरट्याविरुध्द गुन्हा दाखल झाला आहे. यातील फिर्यादी सुभाष जाधव हे दि.१८ डिसेंबर रोजी मरिआई मंदिरामध्ये पुजा करण्यासाठी गेले असता मंदिरामध्ये ७३ हजार ५०० रुपये किंमतीच्या चांदीच्या छोट्या छोट्या मुर्त्या दिसून आल्या नाहीत. सदरचा प्रकार त्यांनी गावातील विठ्ठल जाधव,दिगंबर जाधव,अशोक जाधव, तानाजी जाधव यांना सांगीतल्यानंतर या सर्वांनी मंदिरात जावून प्रत्यक्ष पाहणी केल्यावर मंदिरात देवीच्या मुर्ती दिसून आल्या नाहीत. परंतू मंदिरात कोणी तरी पुजा केल्याचे तेथे सांडलेल्या हळदी कुंकूवावरुन स्पष्ट झाले. त्यामुळे कोणीतरी देवीच्या मुर्तीची पुजा करुन मुर्त्या नेल्या असतील त्याच बरोबर मरिआई देवी प्रकोप पावते व शाप देते म्हणून मुर्ती नेणारी व्यक्ती मुर्ती परत मंदिरात आणून ठेवले असे त्यांना वाटल्याने त्यांनी तक्रार देण्यास वेळ झाल्याचे नमूद केले आहे. दरम्यान या चोरी मध्ये २५० ग्रॅम वजनाची चांदीची देवीची मुर्ती, २०० ग्रॅम वजनाचा चांदीचा गाडा,२२५ ग्रॅम वजनाची म्हसोबाची पंचधातूची मुर्ती,१०० ग्रॅम वजनाच्या देवीच्या चपट्या २० मुर्त्या, २५ ग्रॅम वजनाच्या त्यावर सोन्याचा मुलामा दिलेल्या ५ चपट्या मुर्त्या असा एकूण ७३ हजार ५०० रुपये किंमतीचा मुद्देमाल चोरट्याने चोरुन नेला असल्याचे तक्रारीत नमूद करण्यात आले आहे. या चोरीचा अधिक तपास पोलीस करीत आहेत.




# महिला प्रवाशाचे सोन्याचे दागिने पळविले

## सततच्या वाढत्या चोऱ्यामुळे प्रवाशांचा जीव लागला टांगणीला

**तभा वृतसेवा**
**मंगळवेढा दि. २८ डिसेंबर**

मंगळवेढा बसस्थानकावर हुन्नूर बसमध्ये चढत असताना एका प्रवाशी महिलेच्या गळ्यातील ६० हजार रुपये किंमतीची सोन्याची बोरमाळ चोरण्याचा प्रकार घडला असून या प्रकरणी अज्ञात चोरट्याविरुध्द गुन्हा दाखल झाला आहे. दरम्यान मागील महिन्यात एका महिलेचे येथूनचे दहा लाखाचे सोने चोरीला जावूनही अद्याप चोरटा मोकाटच असल्याने चोरीच्या घटनेमध्ये दिवसेंदिवस भर पडत असल्याचे वास्तव आहे. यातील फिर्यादी जनाबाई जगदाळे (वय ७०,रा. तावशी ता.पंढरपूर) दि.२७ डिसेंबर रोजी सकाळी १०.३० वाजता फिर्यादी व त्यांची सुन वैशाली अशा दोघी सासूसुना तावशी येथून मंगळवेढा बसस्थानकावर आल्या. त्या दोघी सासू सुना वैशालीचे माहेर पाठखळ असल्याने तेथे जाण्यासाठी हुन्नूर या बसमध्ये दुपारी १.१५ वाजता सुन बसमध्ये चढून तिने जागा पकडली. फिर्यादी ही बसमध्ये पाठीमागून चढत असताना गर्दी खूप होती त्यावेळी फिर्यादीच्या गळ्यातील तीस मण्याची बोरमाळ अज्ञात चोरट्याने काढून घेतली. या दरम्यान फिर्यादीच्या लक्षात आले की,आपल्या गळ्यात बोरमाळ नाही, त्यानंतर सवत्र शोध घेतला मात्र कोठेही बोरमाळ मिळून आली नाही. फिर्यादी व सुन पाठखळ येथे गेल्यानंतर सदरची घटना बहिणीने भाऊ युवराज सावत याला घडला प्रकार सांगीतल्यानंतर पोलीस ठाण्यात तक्रार देण्यात आले असल्याचे दिलेल्या फिर्यादीत म्हटले आहे. दरम्यान मागील महिन्यात सोलापूरहून आलेल्या एका महिलेचे दहा लाखाचे सोने बसमध्ये चढताना गायब झाले होते. याच्या शोधासाठी सोलापूरचे स्थानिक पोलीसही बसस्थानकावर आले होते मात्र त्यांना चोर पकडण्यात अपयश आल्याने पुन्हा चोरीचा प्रकार घडला आहे. बसस्थानकावर दिवसभर पोलीस नसतात त्यामुळे चोरी सातत्याने घडत आहे. प्रवाशांचा जीव वाढत्याच चोऱ्यामुळे टांगणीला लागला असून बसने प्रवासा करावा की नाही असा प्रश्न त्यांच्या मनाला सतावत असल्याच्या भावना व्यक्त होत आहेत.




# सिध्देश्वर कृषी व औद्योगिक प्रदर्शन; कॅट शोमध्ये ७० मांजरांनी नोंदविला सहभाग

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २८ डिसेंबर-**

येथील श्री सिध्देश्वर कृषी व औद्योगिक प्रदर्शनात झालेल्या कॅट शोमध्ये मांजर प्रेमींच्या उत्साहाचे दर्शन घडले. ग्रामदैवत शिवयोगी सिध्दरामेश्वर यात्रेनिमित्त श्री सिध्देश्वर देवस्थानच्यावतीने होम मैदान येथे सुरु असलेल्या श्री सिध्देश्वर कृषीव औद्योगिक प्रदर्शनात रविवारी आयोजित कॅट शोने सर्वांची मने जिंकली. कॅट शोमध्ये सुमारे ७० मांजरांनी सहभाग नोंदविला. यावेळी फॅन्सी-फॅशन कॅट शो या स्पर्धाही घेण्यात आल्या. या फॅशन शोमध्ये कॅटच्या मालकांच्या कल्पकतेची अनोखी झलक पाहण्यास मिळाली.




कॅट शोमधील विजेत्यांना कृषी प्रदर्शन समितीचे अध्यक्ष गुरूराज माळगे, विश्वस्त पशुपतीनाथ मशाळ यांच्या हस्ते पुरस्कार देऊन गौरविण्यात आले.

कॅट शो शोमध्ये सहभागी या सर्व मांजरांची शरीराची ठेवण, डोळे, दात, उंची, केस, रंग, शेपटी, पायांची ठेवण, स्वच्छता आणि केंसांची निगा या सर्व बाबींची परीक्षकांकडून तपासणी करण्यात आली.

या स्पर्धेसाठी पेट्स वर्ल्ड अँड पेट गॅलरी सोलापूरचे आर्यन दळवी,आणि महेश दळवी यांच्यासह संगमेश्वर महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांचे सहकार्य लाभले.

या स्पर्धेचे परीक्षक म्हणून स्वप्ना दळवी, शलवारी श्राफ, सोहेल शेख आणि शादाब कांबळे यांनी काम पाहिले.

### हे ठरले विजेते

अजिज कांबळे यांच्या बंगाल टायगर कॅटने या स्पर्धेतील विजेतेपद पटकावले. सोहेल शेख यांच्या एक्सट्रीम पंच पर्सियन प्रजातीच्या कॅटने दुसरे तर अरबाज शेख यांच्या पर्सियन प्रजातीच्या कॅटने तिसरे क्रमांक पटकाविले. या सोबतच सादीया शेख आणि जुनैद यांच्या मांजरांनीही अनुक्रमे चौथा आणि पाचवा क्रमांक पटकाविला. यावेळी फॅशन शोमध्ये सहभागी झालेल्या मांजरांनाही विविध पुरस्कारांनी गौरविण्यात आले.

# हॉटेल लोटसवर अजितदादा गट व शिंदेसेनेची युती

## समसमान जागा वाटप फॉर्मुल्यावर निवडणूक लढणार

## महापौर आमचाच असणार

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. २८ डिसेंबर -**

शिवसेना शिंदेगट व अजितदादा गटाच्या वतीने रविवारी दुपारी होडगी रोड येथील लोटस हॉटेल येथे बैठक घेण्यात आली. बैठकी अंति दोन्ही पक्षांनी युती केल्याचे स्पष्ट करत समसमान जागांवर आम्ही निवडणूक लढणार आहोत, सोलापूर महापालिकेत महापौर हा आमच्याच युतीतील बसणार असल्याचा दावा माजी मंत्री सिद्धाराम म्हेत्रे यांनी पत्रकार परिषदेत केला.गेल्या आठ दिवसांपासून भारतीय जनता पार्टी बरोबर महायुती बाबत बोलणी सुरू होती. परंतु जागा वाटपांवर निश्चिती होत नसल्याने आम्ही हा निर्णय घेतला. शिवसेना शिंदे गटाच्या वतीने ३६ जागा आम्ही मागितल्या होत्या. भाजपकडून सन्मान जनक प्रस्ताव आला नाही, आम्हाला कमी लेखले गेले. कोणत्या जागेवरती कोणता पक्ष लढणार हे लवकरच सांगू. येणाऱ्या काळात एकनाथ शिंदे व अजित पवारांच्या माध्यमातून मोठा निधी आणून सोलापूरचा विकास करण्याबाबत आमचा प्रयत्न असेल अशी माहिती संतोष पवार यांनी बोलताना दिली.

यावेळी राष्ट्रवादीचे निवडणूक प्रमुख सुधीर खरटमल, चंद्रकांत दायमा, महेश साठे, यू. एन. बेरिया, जुबेर बागवान, आनंद चंदनशिवे, अमोल शिंदे, अमर पाटील, सचिन चव्हाण, मनीष काळजे, मनोज शेजवाल, अर्जुन सलगर, प्रमोद भोसले, आनंद मुस्तारे, आप्पासा म्हेत्रे, वसीम बुरान आदी पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



महाराष्ट्राचे संवेदनशील नेतृत्व एकनाथ शिंदे व अजितदादा हे धाडसी नेतृत्व या दोन्ही पक्षांची जर सत्ता महापालिकेत लोकांनी आणून दिली, निधी कमी पडणार नाही. विकासकामे, रखडलेली कामे मार्गी लावण्यात यशस्वी होऊ. आम्ही दोघे मिळून प्रचंड ताकतीने लोकांसमोर जाऊ.

**-अमोल शिंदे, जिल्हाप्रमुख**

**हे पत्र मुद्रक व प्रकाशक** दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी **सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय** १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून तरुण भारत कार्यालय, श्री. मसलेकर निवास, जिल्हा न्यायालय पाठीमागे, समर्थ नगर, धाराशिव (उस्मानाबाद) ४१३५०१, कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. दूरध्वनी : ९७६७०९९७११ / ८८८८८४७२३९ ● मुख्य समुह संपादक : **दिलीप यशवंत पेठे.** ● मुख्य संपादक : **प्रशांत वसंतराव माने** (पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर आहे) दैनिक सोलापूर तरुण भारत. RNI No. MAHMAR/2023/86468. **E-mail starunbharatgmail.com.** ● **Websate:http://dainiktarunbharat/** या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही.

**Owned by, SOLAPUR TARUN BHARAT MEDIA LTD. Printed by, Published by** DILIP SHIVMURTI DULANGE **Printed at** SOLAPUR TARUN BHARAT MEDIA LT. 19,20 INDUSTRIAL ESTATE, HOTGI ROAD, SOLAPUR, Dist. SOLAPUR, 413003.**Publised at** TARUN BHARAT OFFICE Mr. Maslekar Residence, Behind District Court, Samarth Nagar, Dharashiv. PIN - 413501 |**RNI No. MAHMAR/2023/86468**
● **CHIEF GROUP EDITOR :** DILIP YASHWANT PETHE ● **CHIEF EDITOR :** PRASHANT VASANTRAO MANE

# धाराशिव दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.




## समुद्राळ येथे घरफोडी; सोन्याचे दागिने व रोख रक्कम लंपास

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२८ डिसेंबर -**

लोहारा पोलीस ठाणे हद्दीतील समुद्राळ (ता. उमरगा) येथे अज्ञात व्यक्तीने घरफोडी करून सोन्याचे दागिने व रोख रक्कम असा एकूण ७४ हजार रुपयांचा माल चोरी करून नेल्याची घटना घडली आहे.

याबाबत फिर्यादी गोविंद बळीराम मुळे (वय ७५, रा. समुद्राळ, ता. उमरगा, जि. धाराशिव) यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार, दि. २६ डिसेंबर २०२५ रोजी रात्री १० ते दि. २७ डिसेंबर २०२५ रोजी पहाटे ४.३० वाजण्याच्या सुमारास अज्ञात व्यक्तीने त्यांच्या राहत्या घराचे कुलूप तोडून घरात प्रवेश केला. यावेळी घरातील १६ ग्रॅम वजनाचे सोन्याचे दागिने व १० हजार रुपये रोख रक्कम असा एकूण ७४ हजार रुपयांचा माल चोरून नेण्यात आला.

या प्रकरणी फिर्यादी यांनी दि. २७ डिसेंबर २०२५ रोजी दिलेल्या प्रथम खबर अहवालावरून लोहारा पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहिता कलम ३३१(४), ३०५(अ) अन्वये अज्ञात व्यक्तीविरुद्ध गुन्हा नोंदविण्यात आला असून पुढील तपास पोलीस करीत आहेत.

## ▶▶ संक्षिप्त वृत्त...




### तेरणा औद्योगिक प्रशिक्षण संस्थेत वीर बालदिन साजरा

**धाराशिव, दि.२८ डिसेंबर -**

तेरणा पब्लिक चॅरिटेबल ट्रस्ट संचलित तेरणा औद्योगिक प्रशिक्षण संस्थेत दि.२६ डिसेंबर हा दिवस वीर बालदिन म्हणून साजरा करण्यात आला. कार्यक्रमाची सुरुवात राष्ट्रगीताने झाली त्यानंतर संस्थेचे प्राचार्य पी.बी. वाघ यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले. यावेळी उपस्थित बालवीर तेरणा आयटीआय मधील इलेक्ट्रॉनिक्स या ट्रेडचा विद्यार्थी समर्थ गरड हा उत्कृष्ट तबला व पखवाज वादक असल्यामुळे त्याला पुष्पगुच्छ देऊन गौरविण्यात आले. त्यानंतर तेरणा हायस्कूल धाराशिव येथील आतिश सोमनाथ चव्हाण याने क्रीडा स्पर्धेत विशेष प्राविण्य मिळवल्याबद्दल त्यास पुष्पगुच्छ देऊन गौरविण्यात आले. ग्रीनलँड हायस्कूल धाराशिव येथील प्रतीक शिरोळे यांनी राष्ट्रीय स्तरावर इनलाईन हॉकी स्पर्धेत ब्रॉन्झ पदक, म्युझिकल चेअरमध्ये गोल्ड पदक, स्पीड स्केटिंग ब्रॉन्झ पदक व रोलर हॉकीमध्ये ब्रॉन्झ पदक मिळवल्याबद्दल पुष्पगुच्छ देऊन त्याचा गुण गौरव करण्यात आला. यावेळी संस्थेचे प्राचार्य पी.बी. वाघ, ए.एन. जाधव, थोडसरे आर.डी., भोसले डी.बी., इंगळे वाय.आर., नाईकवाडी बि.आर., थोडसरे जी.एन., शेंडगे एम.व्ही., मस्के आर.आर., उमाकांत कुदळे, आकाश थोडसरे व विद्यार्थी उपस्थित होते.



### जी चॅम्प अबॅकस स्पर्धेत मंगरूळ येथील विद्यार्थ्यांचे यश

**मंगरूळ, दि.२८ डिसेंबर -**

तुळजापूर तालुक्यातील मौजे मंगरूळ येथील विद्यार्थ्यांनी शनिवार, दि. २७ डिसेंबर रोजी सोलापूर येथे पार पडलेल्या राज्यस्तरीय जी चॅम्प अबॅकस स्पर्धेत घवघवीत यश संपादन करून गावाचे व तालुक्याचे नाव उज्ज्वल केले आहे. सोलापूर येथे आयोजित या राज्यस्तरीय स्पर्धेत हिना बागवान संचलित जी चॅम्प अबॅकस सेंटरच्या विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय कामगिरी केली. या स्पर्धेत प्राची पाटील व तमन्ना बागवान यांनी 'जी चॅम्प सुपरस्टार' हा मानाचा किताब पटकावला. स्पर्धेत प्रथम क्रमांक राहात शेख, द्वितीय क्रमांक आरती मिसाळ व अभिलाषा हाटकर, तर तृतीय क्रमांक अल्फाज बागवान, जैनबी शेख व श्रुती शित्रे यांनी पटकावला. तसेच चतुर्थ क्रमांक समर्थ माने, मल्हार माळी, सोहम माने, शुभम शिंदे, प्रतीक्षा पाटील, संस्कार मिसाळ व आलिया शेख यांनी मिळवला.



### राजेश भोसले यांना पी.एच.डी. पदवी

**उमरगा, दि.२८ डिसेंबर -**

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड यांच्या वतीने दि.१२ डिसेंबर रोजी ग्रंथालय व माहितीशास्त्र या विद्या शाखेत राजेश भोसले यांना पी.एच.डी. पदवी प्रदान करण्यात आली. बाबळसूर येथील मूळ रहिवासी असलेले भोसले सध्या टाटा मोटर्स लिमिटेड, पुणे येथील रिसर्च लायब्ररीमध्ये कार्यरत आहेत. डॉ. नामदेव राठोड यांच्या मार्गदर्शनाखाली त्यांनी Library १.० ते Librar ४.० : माहिती तंत्रज्ञान व ग्रंथालयीन सेवांचा तुलनात्मक अभ्यास या विषयावर संशोधन केले. या संशोधनात भारतातील ग्रंथालयांच्या तंत्रज्ञानाधारित विकासाचा सविस्तर आढावा घेण्यात आला आहे. त्यांच्या या यशाबद्दल सर्व स्तरांतून अभिनंदन होत आहे.

### सय्यदनूर महेबूब सय्यद यांचे निधन

**तुळजापूर, दि.२८ डिसेंबर -**



भूम तालुक्यातील बेलगाव पिंपळगावचे ग्राम पंचायत सदस्य तथा सरपंच परिषदेचे राज्य संघटक कोहिनूर सय्यद यांचे वडील सय्यदनूर महेबूब सय्यद (वय ९०) यांचे निधन झाले आहे. त्यांच्या पार्थिवावर पिंपळगाव, तालुका भूम येथे अंत्यविधी करण्यात आला. बेलगाव पिंपळगावच्या विद्यमान सरपंच, सरपंच परिषदेच्या महिला प्रदेशाध्यक्षा तथा शिवसेना (उबाठा) पक्षाच्या जिल्हाप्रमुख जिनत सय्यद यांचे ते सासरे होते.

### उमरग्यात काँग्रेसचा वर्धापन दिन साजरा

**उमरगा, दि.२८ डिसेंबर -**

उमरगा तालुका काँग्रेस कमिटीच्या वतीने उमरगा येथील काँग्रेस कार्यालयात भारतीय राष्ट्रीय काँग्रेस पक्षाचा १४० वा वर्धापन दिन उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी तालुका काँग्रेस अध्यक्ष अर्जुन बिराजदार यांच्या हस्ते पक्षध्वजारोहन करण्यात आले. कार्यक्रमास विजय वाघमारे, नाना भोसले, ॲड. दिलीप सगर, मधुकर यादव, शहराध्यक्ष विजय दळगडे आदी उपस्थित होते.

# घटस्थापनेने शाकंभरी नवरात्र महोत्सवास प्रारंभ उत्साहात







**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.२८ डिसेंबर -**

श्री तुळजाभवानी देवींच्या शाकंभरी नवरात्र महोत्सवास आज घटस्थापनेने भक्तिमय वातावरणात प्रारंभ झाला. दु.१२ वा. मुख्य यजमान उल्हास अनंतराव कागदे यांच्या हस्ते मंदिरातील गणेश विहारात सपत्नीक विधीवत घटस्थापना करण्यात आली आणि सात दिवस चालणाऱ्या या शाकंभरी नवरात्र महोत्सवास सुरुवात झाली.

याप्रसंगी तहसीलदार तथा व्यवस्थापक (प्रशासन) माया माने, महंत तुकोजी बुवा, महंत चिलोजी बुवा, महंत वाकोजी बुवा, उपाध्ये सुनीत पाठक, पुजारी मंडळाचे अध्यक्ष विपिन शिंदे, अमरराजे कदम, अनंत कोंडो, लेखाधिकारी संतोष भेंकी, सहायक धार्मिक व्यवस्थापक अनुप ढमाले, रामेश्वर वाले यांच्यासह मंदिर संस्थानचे अधिकारी, कर्मचारी, पुजारी बांधव व भाविक उपस्थित होते. मंत्रोच्चार, विधी आणि भक्तीभावाने संपूर्ण परिसर मंगलमय झाला होता.



श्री तुळजाभवानी देवींचे दरवर्षी दोन प्रमुख उत्सव साजरे केले जातात.

त्यामध्ये अश्विन महिन्यातील शारदीय नवरात्र उत्सव व पौष महिन्यातील शाकंभरी नवरात्र उत्सवाचा समावेश आहे. शाकंभरी नवरात्र उत्सवाला तुळजापुरात 'धाकटा दसरा' असेही म्हटले जाते.

तत्पूर्वी गेल्या आठ दिवसांपासून सुरू असलेली श्री तुळजाभवानी देवींची मंचकी निद्रा संपवून आज पहाटे पौष शुक्ल अष्टमीच्या शुभमुहूर्तावर देवींची सिंहासनावर विधीवत प्रतिष्ठापना करण्यात आली. सात दिवस चालणाऱ्या या शाकंभरी नवरात्र महोत्सवाची सांगता ३ जानेवारी रोजी शाकंभरी पौर्णिमेला दुपारी १२ वाजता पूर्णाहुती व त्यानंतर घटोत्थापनाने होणार आहे.

तसेच शाकंभरी नवरात्र काळात दररोज रात्री श्री तुळजाभवानी देवींचा छबीना (मिरवणूक) निघणार आहे.

संपूर्ण तुळजापूर नगरी भक्तीमय वातावरणाने भारावून गेली आहे.

### या नवरात्र काळात श्री तुळजाभवानी देवींची...

२९ डिसेंबर रोजी रथ अलंकार महापूजा, ३० डिसेंबर रोजी मुरली अलंकार महापूजा, ३१ डिसेंबर रोजी शेषशाही अलंकार महापूजा तसेच, सकाळी ७ वाजता जलयात्रा, १ जानेवारी रोजी भवानी तलवार अलंकार महापूजा, २ जानेवारी रोजी महिषासुरमर्दिनी अलंकार महापूजा संपन्न होणार आहे.

## शिवकरवाडी पाटी ते शिवकरवाडी रस्त्याची चाळणी

**तभा वृत्तसेवा**
**लोहारा, दि.२८ डिसेंबर -**

लोहारा तालुक्यातील शिवकरवाडी पाटी ते शिवकरवाडी गावाकडे जाणारा डांबरीकरण रस्ता अत्यंत खराब झाल्याने सदर रस्त्याचे नव्याने डांबरीकरण करण्यात यावे, अशी मागणी शिवकरवाडी ग्रामस्थांनी तहसीलदार यांच्याकडे निवेदनाद्वारे दि.२६ डिसेंबर २०२५ रोजी केली आहे.

**डांबरीकरण करण्याची मागणी**

या निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, शिवकरवाडी गावाला जोडणारा हा डांबरीकरण रस्ता सध्या पूर्णतः खराब झाला असून ठिकठिकाणी मोठमोठे खड्डे पडले आहेत. त्यामुळे गावातील नागरिकांना ये-जा करताना तसेच दैनंदिन दळणवळणासाठी मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागत आहे. विशेषतः गावातील अनेक विद्यार्थी लोहारा शहरातील शाळांमध्ये शिक्षणासाठी जात असून लोहारा हे ग्रामस्थांसाठी महत्त्वाचे दळणवळण केंद्र आहे. रस्त्याच्या दुरवस्थेमुळे प्रवास त्रासदायक ठरत आहे. याशिवाय आजारी रुग्णांना उपचारासाठी दवाखान्यात नेणे कठीण झाले असून रस्ता खराब असल्यामुळे अनेकदा वाहनेही गावात येण्यास टाळाटाळ करत आहेत. त्यामुळे ग्रामस्थांच्या दैनंदिन जीवनावर याचा गंभीर परिणाम होत आहे.

या पार्श्वभूमीवर शिवकरवाडी पाटी ते शिवकरवाडी गाव हा रस्ता तात्काळ मंजूर करून नव्याने डांबरीकरण करण्यात यावे, तसेच ग्रामस्थांच्या अडचणी दूर कराव्यात, अशी ठाम मागणी शिवकरवाडी ग्रामस्थांनी तहसीलदार यांच्याकडे केली आहे.

या निवेदनावर वैभव लांडगे, उद्धव पुरी, पांडुरंग शिवकर, तुकाराम जाधव, अक्षय जाधव, अजित भोसले, सुदर्शन डावकारे, सागर जाधव आदींच्या सह्या आहेत.

## सर्व घटकांना सोबत घेऊन तुळजापूरच्या सर्वांगीण विकासासाठी कटिबद्ध : नगराध्यक्ष विनोद गंगणे

**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.२८ डिसेंबर -**



शहराच्या सर्वांगीण विकासासाठी शहरातील सर्व घटकांच्या सूचनांचा आदर करून मी आणि सर्व नगरसेवक एकत्रितपणे काम करणार असल्याचे प्रतिपादन नूतन नगराध्यक्ष विनोद गंगणे यांनी केले. आनंद कंदले मित्र मंडळाच्या वतीने आयोजित नूतन नगराध्यक्ष व नगरसेवकांच्या सत्कार समारंभानिमित्त घेण्यात आलेल्या पत्रकार परिषदेत ते बोलत होते.

गंगणे म्हणाले की, नुकत्याच झालेल्या नगरपरिषदेच्या निवडणुकीत तुळजापूर शहरातील मतदारांनी तिसऱ्यांदा मला नगराध्यक्ष म्हणून काम करण्याची संधी दिली आहे. या संधीचे मी निश्चितच सोने करणार आहे. तुळजापूर हे राज्यातील अत्यंत महत्त्वाचे धार्मिक तीर्थक्षेत्र असून या तीर्थक्षेत्राच्या सर्वांगीण विकासासाठी आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी शहर व मंदिर विकासाचा सर्वसमावेशक आराखडा मंजूर करून घेतला आहे.

या विकास आराखड्यामुळे तुळजापूर शहराचा कायापालट होणार असून यासाठी आमदार पाटील यांनी मोठ्या प्रमाणात निधीही मंजूर करून घेतला आहे. येणाऱ्या काळात शहराच्या विकासाला गती मिळणार असून यात्रेकरूंची संख्या वाढेल. त्यामुळे स्थानिक उद्योगधंदे, व्यापार तसेच रोजगाराच्या संधींमध्ये लक्षणीय वाढ होईल, असा विश्वास नगराध्यक्ष गंगणे यांनी व्यक्त केला.

मतदारांनी टाकलेला विश्वास निश्चितच सार्थ ठरविणार असून शहरातील विविध घटक व नागरिकांचा आदर राखून सर्वांना सोबत घेऊन काम करण्याचा प्रामाणिक प्रयत्न राहील.

आमदार राणाजगजितसिंह पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली तुळजापूर या तीर्थक्षेत्राला राज्यात अव्वल क्रमांकावर नेण्याचा माझा निर्धार असल्याचेही त्यांनी सांगितले.

यावेळी माजी नगराध्यक्ष सचिन रोचकरी, सज्जनराव साळुंके, विशाल रोचकरी, आनंद कंदले, नरेश अमृतराव, अमर हंगरगेकर, शांताराम पेंदे, माऊली भोसले, लखन पेंदे, मनोज गवळी, पंडितराव जगदाळे, विजय कंदले, औदुंबर कदम यांच्यासह सर्व नगरसेवक-नगरसेविका तसेच भाजपचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## श्रीक्षेत्र मैलारपुर येथे मधुकरराव चव्हाण यांच्या वतीने खंडोबा भक्तांना अन्नदान

**तभा वृत्तसेवा**
**नळदुर्ग, दि.२८ डिसेंबर -**

नळदुर्ग येथील श्रीक्षेत्र मैलारपुर येथील श्री खंडोबा मंदिरात रविवार, दि.२८ डिसेंबर रोजी राज्याचे माजी मंत्री मधुकरराव चव्हाण यांच्या वतीने खंडोबा भक्तांसाठी अन्नदानाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. यावेळी स्वतः मधुकरराव चव्हाण यांनी उपस्थित राहून भाविकांना महाप्रसादाचे वाटप केले.



दि.२८ डिसेंबर रोजी श्रीक्षेत्र मैलारपुर येथे श्री खंडोबा देवाचे दर्शन घेण्यासाठी भाविकांची मोठी गर्दी उसळली होती. दर रविवारी श्री खंडोबा मंदिर देवस्थान ट्रस्टच्या वतीने भाविकांसाठी मोफत अन्नदान केले जाते. त्याच उपक्रमाअंतर्गत या रविवारी माजी मंत्री मधुकरराव चव्हाण यांच्या वतीने भाविकांना अन्नदान करण्यात आले.

मधुकरराव चव्हाण हे ज्येष्ठ नेते असून सध्या त्यांचे वय ९४ वर्षे आहे.

या वयातही ते सामाजिक व धार्मिक उपक्रमांत सक्रिय सहभाग घेत असून तरुणांनाही लाजवेल असा उत्साह त्यांनी दाखविला. यावेळी त्यांनी स्वतः भाविकांना महाप्रसादाचे वाटप करून सेवा कार्याचा आदर्श घालून दिला.

या अन्नदान कार्यक्रमावेळी शरणप्पा कबाडे हेही त्यांच्या समवेत उपस्थित होते.

## येरमाळा येथे कंटेनरमधील एमआरएफ कंपनीचे ६६ टायर चोरीस

**येरमाळा, दि.२८ डिसेंबर -**

येरमाळा पोलीस ठाणे हद्दीत कंटेनरमधून एमआरएफ कंपनीचे थ्री व्हिलर वाहनाचे टायर चोरीस गेल्याची घटना घडली आहे. याप्रकरणी येरमाळा पोलीस ठाण्यात अज्ञात व्यक्तीविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत फिर्यादी रामजीत शोभनाथ यादव (वय ४९, रा. लक्ष्मीनगर चाळ, नालासोपारा ईस्ट, ठाणे) यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार, दि.२४ डिसेंबर रोजी रात्री सुमारे ११ वाजण्याच्या सुमारास ते कंटेनर क्रमांक एनएल-०५-जी-२३९२ घेऊन एनएच ५२ मार्गावरून जात असताना लक्ष्मी पारधी पिडी, तेरखेडा येथे कंटेनर उभा केला होता. यावेळी अज्ञात व्यक्तीने कंटेनरचे लॉक तोडून आतून एमआरएफ कंपनीचे थ्री व्हिलर वाहनाचे एकूण २२३५ टायरपैकी ६६ टायर चोरी करून नेले. चोरीस गेलेल्या टायरची किंमत सुमारे १ लाख ३० हजार ८६ रुपये इतकी आहे.



### आर्य चाणक्य माध्यमिक विद्यालयात वीर बाल दिन साजरा

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२८ डिसेंबर -**

धाराशिव शहरातील आर्य चाणक्य माध्यमिक विद्यालयात वीर बाल दिन उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी शीख धर्माचे दहावे गुरु गोविंद सिंग तसेच त्यांचे शहीद पुत्र साहेबजादा जोरावर सिंग आणि साहेबजादा फतेहसिंग यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले.

विद्यार्थ्यांपुढे शौर्याचा इतिहास मांडून त्यांच्यामध्ये देशभक्तीची भावना निर्माण करणे तसेच वीर वृत्ती जागृत करण्याच्या उद्देशाने वीर बाल दिन साजरा करण्यात येतो, अशी माहिती उपस्थित विद्यार्थ्यांना देण्यात आली.

या कार्यक्रमाला आर्य चाणक्य माध्यमिक विद्यालयाचे सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी तसेच विद्यार्थी-विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## सहाव्या खेट्याला श्रीक्षेत्र मैलारपुरात भाविकांची प्रचंड गर्दी

**खंडोबा यात्रेच्या तयारीला वेग...**

**तभा वृत्तसेवा**
**नळदुर्ग, दि.२८ डिसेंबर -**



येळकोट येळकोट जय मल्हारच्या गजरात नळदुर्ग (मैलारपुर) येथील श्रीक्षेत्र मैलारपुर येथे रविवार, दि.२८ डिसेंबर रोजी सहाव्या खेट्याला श्री खंडोबा देवाचे दर्शन घेण्यासाठी भाविकांनी मोठी गर्दी केली होती. यात्रेपूर्वीचा हा शेवटचा खेटा असल्याने नळदुर्ग शहरासह परिसरातील भाविकांनी मोठ्या संख्येने हजेरी लावली होती.

पावणेदोन महिन्यांच्या वास्तव्यासाठी श्री खंडोबा देव श्रीक्षेत्र मैलारपुर येथील मंदिरात आल्यानंतर दर रविवारी भाविक मोठ्या संख्येने दर्शनासाठी येतात. सहाव्या खेट्याच्या दिवशी भल्या पहाटेपासूनच भाविकांनी मंदिर परिसरात गर्दी केली होती. यावेळी भाविकांनी देवाला दंडवत घालणे, बाशिंग चढविणे, नैवेद्य अर्पण करणे तसेच विविध नवस फेडताना दिसून येत होते. मोठ्या प्रमाणावर खोबरे फोडणे व भंडाऱ्याची उधळण करण्यात आली.

यावर्षी श्रीक्षेत्र मैलारपुर येथे दि.२ ते ४ जानेवारी २०२६ दरम्यान श्री खंडोबा देवाची वार्षिक यात्रा भरणार असून यात्रेला अवघे सहा दिवस शिल्लक आहेत. येत्या शुक्रवारी यात्रेला प्रारंभ होणार असून यात्रेचा मुख्य दिवस शनिवार, दि.३ जानेवारी २०२६ आहे.

श्रीक्षेत्र मैलारपुर येथे दर रविवारी तसेच दररोजही भाविकांची मोठी गर्दी होत आहे. यात्रा कालावधीत महाराष्ट्रासह आंध्र प्रदेश, कर्नाटक व तेलंगणा येथून सुमारे पाच ते सहा लाख भाविक उपस्थित राहतात. यात्रेपूर्वी दर रविवारी येथे जणू मिनी यात्रेचे स्वरूप दिसून येत आहे.

भाविकांच्या सोयीसाठी श्री खंडोबा देवस्थान ट्रस्टच्या वतीने दर रविवारी अन्नदान सुरू असून सध्या वाढती गर्दी लक्षात घेऊन दर्शनासाठी सुसूत्र रांग व्यवस्था करण्यात आली आहे. त्यामुळे मोठी गर्दी असूनही भाविकांना शिस्तबद्ध दर्शन होत आहे. भाविकांच्या सुरक्षिततेसाठी नळदुर्ग पोलिस ठाण्याचे पोलिस निरीक्षक सचिन यादव यांच्या मार्गदर्शनाखाली चोख पोलिस बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे.

यात्रेला सहा दिवस शिल्लक असल्याने श्रीक्षेत्र मैलारपुर व मंदिर परिसरात हॉटेल, प्रसाद दुकाने, खेळणी, लहान मुलांसाठी करमणुकीची साधने तसेच विविध व्यावसायिकांची दुकाने मोठ्या प्रमाणात थाटण्यात आली असून परिसर सध्या गजबजलेला दिसून येत आहे.

सालाबादप्रमाणे याहीवर्षी नळदुर्ग येथील श्री तीर्थक्षेत्र खंडोबा यात्रा कुस्ती आखाडा समिती व नळदुर्ग नगरपालिका यांच्या संयुक्त विद्यमाने श्रीक्षेत्र मैलारपुर येथे श्री खंडोबा यात्रेनिमित्त रविवार, दि.४ जानेवारी २०२६ रोजी लाखो रुपये बक्षीसांच्या भव्य कुस्ती स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे.

सध्या श्रीक्षेत्र मैलारपुर येथे यात्रा व कुस्ती स्पर्धेच्या तयारीला जोरात वेग आला आहे.

# उदगीरचे विद्यार्थी देशपातळीवर घडवण्यासाठी क्रीडा संस्कृतीला बळ देणार : आ. संजय बनसोडे

**त.भा. वृत्तसेवा,**
**उदगीर, २८ डिसेंबर :** आपल्या ग्रामीण भागातील खेळाडू देशपातळीवर आपले प्रतिनिधित्व करून स्वतःचे व आपल्या भागाचे नाव करावे यासाठी उदगीर मतदारसंघातील खेळाडूंना बळ देण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करणार असल्याचे मत माजी क्रीडामंत्री तथा उदगीर - जळकोट विधानसभा मतदारसंघाचे आमदार संजय बनसोडे यांनी व्यक्त केले. ते उदगीर शहरातील टाइम्स पब्लिक स्कूलच्या वार्षिक स्नेहसंमेलना प्रसंगी बोलत होते.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रदीप पेन्सलवार हे होते तर प्रमुख पाहुणे म्हणून उदगीरच्या नूतन नगराध्यक्षा सौ



स्वाती हुडे, उद्योजक सतीश बेद्रे, संस्थेचे सचिव विजयकुमार कप्पिकेरे, कोषाध्यक्ष सौ. मंगल कप्पिकेरे, मलकापूरचे सरपंच गुरुनाथ बिरादार, प्राचार्य अभिजीत नळगिरकर, राष्ट्रवादीचे तालुकाध्यक्ष बालाजी भोसले, शहराध्यक्ष सय्यद जानीमियाँ, कार्याध्यक्ष शशिकांत बनसोडे, माजी उपसभापती बाळासाहेब मरलापल्ले, नगरसेवक बाळासाहेब पाटोदे, नगरसेवक राजकुमार हुडगे, निकिता अंबरखाने, अबरार पठाण, सुनिल केंद्रे, मुकेश भालेराव, पालक प्रतिनिधी कुणाल बागबंदे, संग्राम भिंगोले, जयश्री कवठाळे, डॉ. ज्ञानोबा मुंडे, संदीप हुडे, जगदीश बाहेती, रोहित कप्पीकेरे, गौरी जगताप, आदी उपस्थित होते.

पुढे बोलताना आमदार संजय बनसोडे यांनी, १९९६ पासुन संस्थेची स्थापणा होवून आजपर्यंतच्या वाटचीलीचा आढावा सांगितला. या संस्थेचे विद्यार्थी देशभरात विविध पदावर कार्यरत असुन देशसेवेसाठी योगदान देत आहेत तर अनेक विद्यार्थी हे विविध क्रीडा प्रकारात राज्यपातळीवर आपला नावलौकिक वाढवला आहे. इतरही विद्यार्थी विविध क्रीडा प्रकारात उत्तम खेळाडु घडावेत म्हणून उदगीर शहरात जिल्हा परिषदेच्या मैदानावर १५ कोटीचे क्रीडा संकुल उभारत आहे त्याचबरोबर सिंगापूरच्या धर्तीवर उदगीर शहरामध्ये ६ कोटीचे उद्यान विकसित करत आहे. याचाही फायदा या भागातील नागरीकांना होणार असल्याचे आ.संजय बनसोडे यांनी सांगितले.

या कार्यक्रमाचे सुत्रसंचलन बबिता मसगल्ले व श्रेया हुडगे यांनी केले. यावेळी विद्यार्थी, पालक व शिक्षक उपस्थित होते.

# दारूच्या नशेत बार चालकाचा खून

## सोळा तासात पोलिसांनी आरोपींच्या मुसक्या आवळल्या



**त.भा. वृत्तसेवा,**
**चाकूर, २८ डिसेंबर :** चाकूर तालुक्यातील नायगाव शिवारात एका बार चालकाला दारू व सिगरेट दे म्हणून संगनमत करून तिन व्यक्तिंनी दारूच्या नशेत काठीने डोक्यात मारहाण करून खून केल्याची धक्कादायक घटना शुक्रवारी मध्यरात्री घडली होती. आरोपींनी खुन करून बारमधील गल्यातील १० ते १५ हजार रुपये व दारूच्या बाटल्या घेऊन फरार झाले होते.हि घटना दि.२६ डिसेंबर रोजी मध्यरात्रीच्या साडेअकरा ते बारा वाजण्याच्या सुमारास घडली होती. त्यानंतर पोलिसांनी एलसिबिचे दोन आणि चाकूर पोलिस स्टेशनचे तीन असे पाच पथके तैनात करून आरोपीचा शोध घेण्यासाठी रवाना झाले.

अज्ञात तिघे जण मध्यरात्री बारमध्ये मोटारसायकलवर येऊन बार चालक गजानन कासले यांच्याकडे दारू व सिगारेट मागीतले बारचालकाने सिगारेट नसल्याचे सांगितले त्यानंतर आरोपिंनी शिवीगाळ करून जिवे मारण्याची धमकी देत डोक्यात काठीने सपासप फटके मारल्याने बारचालक गजानन कासले यांचा या हाणामारीत जागीच मृत्यू झाला.

तिन्हीही आरोपी रेणापूर तालुक्यातील धवेली येथील असून आरोपीने खून करून तेथील अजय मोरे याच्या डोक्यात, शिरीरावर काठीने मारहाण करून गंभीर जखमी केले व बार मधील टि.व्हीचे नुकसान करून बारचे कॅश काऊंटर मधील अंदाजे १५ हजार रुपये व विदेशी दारूच्या बाटल्यांची चोरी करून आरोपी पळून गेले होते. त्यानंतर पोलिसांनी चक्र फिरवून आरोपींना परभणी जिल्ह्यातील पालम तालुक्यात रिसनगाव शिवारातील जंगलात आरोपींना एलसीबी पथक व चाकूर पोलिसांच्या संयुक्त पथकांनी पकडले. हे आरोपी रेणापूर तालुक्यातील धवेली येथील आहेत. घटनेची फिर्याद मयताचा भाऊ बालाजी कासले यांनी दिली.

या घटनेची माहिती मिळताच उपविभागीय पोलिस अधिकारी रवींद्र चौधर यांच्या मार्गदर्शनाखाली बालाजी भंडे, सदानंद भुजबळ, राजेश घाडगे, संजय कांबळे, विनोद चलवाड, सूर्यकांत कलमे, प्रशांत स्वामी, पाराजी पुट्टेवाड, तुळशीराम बरूरे, प्रदीप चोपणे, श्रीनिवास जांभळे,चाकूर पोलिस स्टेशनचे पिएसआय पंकज निळकंठे, रमेश चव्हाण, दामोदर सिरसाठ,शौकत बेग, चंद्रकांत राचमाळे, राजकुमार वाघमारे, विष्णू गुंडरे, सुनिल घोडके, मनोहर कातवटे, हाणमंत मस्के, श्रीमंत आरदवाड, नितीन मामडगे,बस्वलिंग चिद्रे, श्रीकृष्ण धडे यांनी सिसिटीव्ही फुटेच अधारे पोलिसांनी अवघ्या सोळा तासातच आरोपी मारोती उर्फ बबलू हरीबा बोयणे, सागर हानमंत बोयणे व संतोष राम तेलंगे या तीन आरोपींना चाकूर पोलिसांनी सोहळा तासात पालम तालुक्यातील रेसनगाव शिवरातून आरोपिच्या मुसक्या आवळल्या.

# सार्व. बांधकाम विभागाकडून शेतजमिनीवर अतिक्रमण

**त.भा. वृत्तसेवा,**
**वलांडी, २८ डिसेंबर :** निलंगा देवणी तालुक्याला जोडणारा गिरकचाळ (ता. निलंगा) येथील मांजरा नदीवरील पुलाचे काम अतिक्रमण करुन प्रशासन करीत असल्याचा आरोप एका शेतकऱ्यानी सार्वजनिक बांधकाम विभागांकडे दिलेल्या निवेदनात केला आहे. यासंदर्भात संबंधित शेतकऱ्याने कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभागाना लेखी निवेदन देत तीव्र आंदोलनाचा इशारा दिला आहे.

मौजे गिरकचाळ येथील नदीवर मोठ्या पुलाचे बांधकाम मागील चार वर्षांपासून

### १५ दिवसांत बांधकाम न हटवल्यास आत्मदहनाचा इशारा

सुरू आहे. या पुलाच्या बांधकामादरम्यान सर्वे नं. १२ मधील ०.५४ आर क्षेत्र असलेली जमीन बालाजी धनेगावे या संबंधित शेतकऱ्याच्या नावावर असूनही, सार्वजनिक बांधकाम विभागाने कोणतीही परवानगी न घेता सदर जमिनीवर अतिक्रमण करून बांधकाम केले आहे. सदर अतिक्रमित बांधकाम तात्काळ हटविण्याबाबत वेळोवेळी लेखी तक्रारी व पत्रव्यवहार करूनही आजतागायत कोणतीही कार्यवाही करण्यात आलेली नाही, असा आरोप शेतकऱ्याने केला आहे. त्यामुळे संबंधित शेतकऱ्याचे मोठे आर्थिक व मानसिक नुकसान झाले असून प्रशासनाच्या उदासीन भूमिकेबद्दल तीव्र नाराजी व्यक्त करण्यात येत आहे.

निवेदनात स्पष्टपणे नमूद करण्यात आले आहे की, जर अतिक्रमित बांधकाम १५ दिवसांच्या आत हटविण्यात आले नाही, तर संबंधित शेतकरी आपल्या कुटुंबीयांसह सार्वजनिक बांधकाम विभागाच्या कार्यालयासमोर आत्मदहन करण्यास भाग पडेल. या गंभीर घटनेची नोंद घ्यावी, अशी विनंतीही त्यांनी प्रशासनाला केली आहे.

या प्रकरणामुळे निलंगा व देवणी तालुक्यात एकच खळबळ उडाली असून, प्रशासन या विषयावर काय भूमिका घेते याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# दैठणा येथे ज्ञानेश्वरी पारायण पूर्वतयारीस प्रारंभ

**त.भा. वृत्तसेवा,**
**शिरूर अनंतपाळ, २८ डिसेंबर :** मौजे दैठणा, ता. शिरूर अनंतपाळ, येथे येत्या ४ मार्च



२०२६ रोजी भव्य अखंड हरिनाम बीज उत्सव व ज्ञानेश्र्वरी पारायण सोहळ्यास प्रारंभ होणार असून १७ मार्च २०२६ रोजी काल्याच्या कीर्तनाने या सप्ताहाची सांगता होणार आहे. या पार्श्वभूमीवर उत्सवाच्या पूर्वतयारीचा भाग म्हणून निधी संकलन मोहिमेची आजपासून विधिवत सुरुवात करण्यात आली.

या निधी संकलन कार्याची पहिली पावती हनुमान मंदिर, दैठणा येथे हनुमंताच्या चरणी अर्पण करून विधीवत पूजा करण्यात आली. त्यानंतर गावकऱ्यांच्या सहकार्याने निधी संकलनास प्रारंभ झाला.

या कार्यक्रमाच्या प्रारंभी दैठणा गावातील ज्येष्ठ नागरिक, तरुण वर्ग व मान्यवरांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

यामध्ये जिल्हा मध्यवर्ती बँकेचे संचालक व्यंकटराव बिरादार, अध्यात्मिक भक्त शिवाजीराव बिरादार, बालाजी तोटे, दैठणा गावचे माजी सरपंच सदविवेक तात्या मिरकले, गुणवंत पाटील, पांडुरंग महाराज, नामदेव दंडीमे महाराज, सतीश बिरादार, माणिक सांगवे, प्रशांत पाटील, सुशेन पाटील, चंद्रकांत सांगवे, बळीराम पाटील, गोविंद कुडके, बापूसाहेब पाटील, अण्णाराव पाटील, डॉक्टर स्वामी, गंगाधर आबा, धोंडीराम भंडारे, बाळू टी पाटील, रमेश पाटील, विजय चिटुपे, अनिल पेंटमशेटे आदी मान्यवरांचा समावेश होता.

# काँग्रेसच्या वतीने तहसीलदारांना विविध मागण्यांचे निवेदन

**त.भा. वृत्तसेवा,**
**रेणापूर, २८ डिसेंबर :** रेणापुर तालुका व शहर काँग्रेसच्या वतीने विविध मागण्यांचे निवेदन देण्यात आले. आमच्या मागण्याची गांभीर्याने विचार करून नोंद नाही घेतल्यास आठ दिवसाच्या आत तीव्र आंदोलन छेडण्यात येईल असा इशारा रेणापूर तालुका व शहर काँग्रेसच्या वतीने तहसीलदार यांना देण्यात आलेल्या निवेदनाद्वारे करण्यात आला आहे.

मागण्यांमध्ये नवीन शिधापत्रिकासाठी आलेले सर्व तात्काळ ऑनलाईन करून त्यांना धान्य वितरीत करण्यांत यावे.संजय गांधी निराधार योजनेच्या लाभार्थ्यांची केवायसी होण्याच्या अगोदर दोन ते तीन महिन्याची पेमेंट खात्यामध्ये जमा झालेले नाही ते ऑफलाईन पद्धतीने त्यांच्या खात्यात पैसे जमा करण्यात यावे. संजय गांधी निराधार योजना, श्रवणबाळ योजनेचे प्रलबित अर्ज तात्काळ मंजूर करून लाभार्थ्यांना अनुदान वाटप करण्यात यावे. ज्या गावांमध्ये स्मशानभूमीची व्यवस्था नाही किंवा स्मशानभुमीसाठी जागा नाही त्या ठिकाणी स्मशानभूमीचे प्रश्न तात्काळ मार्गी लावण्यात यावे. कृषी विभागामार्फत प्रत्येक गावामध्ये शेतकऱ्याला मार्गदर्शन करण्यासाठी कृषी सप्ताह राबविण्यात यावा. तहसील कार्यालयातील विविध विभागात सामान्य नागरिकाची होणारी आर्थिक पिवळणुक थांबविण्यात यावी. नरेगाची कामे तात्काळ चालू करावीत. तहसील कार्यालयाच्या आवारात नागरिकांसाठी सार्वजनिक स्वच्छतागृह बांधण्यात यावे. रेणापूर दुय्यम निबंधक कार्यालयाला कायमस्वरूपी दुय्यम निबंधक पदाची नेमणूक करण्यात यावी. घरगुती गॅसला सरसकट सबसिडी देण्यात यावी. रेणापुर तालुक्यातील शेती नसलेली लोकांचे रेशनच्या यादीत समाविष्ट केलेले आहेत ते नावे कमी करावे असे निवेदनात मागण्या केल्या असुन यांचा गांभीर्याने नोंद नाही घेतल्यास ८ दिवसात तीव्र आंदोलन



छेडण्यात येईल असा इशारा दिला आहे.

यावेळी रेणापुर काँग्रेस तालुकाध्यक्ष प्रमोद कापसे, शहरध्यक्ष पद्मसिंह पाटील, रेणापुर कृउबाचे सभापती उमाकांत खलंग्रे, शहर उपाध्यक्ष केदार हालकुडे, सुधाकर चव्हाण, शाम सुर्यवंशी, गणेश सौदागर, भूषण पनुरे, संतोष शिंदे, सचिन इगे, केशव माने, हंसराज देशमुख, गोविंद पवार, हंसराज चव्हाण, शिंदे उमेश, बाळासाहेब करमुडे, राजकुमार मस्के, उध्दव सुर्यवंशी, रोहित गिरी, राऊत सतिश, दत्ता जोगदंड प्रशांत पाटिल, चंद्रकांत कातळे, अजय चक्रे, वसंतराव चव्हाण, सोनवने माधव, सुधाकर चव्हाण, गणेश सौदागर, प्रदीप चव्हाण, प्रशांत घोडके, मुरलीधर पडोळे, तानाजी मस्के, चंद्रकांत शास्त्री, भुतके राजेंद्र, कल्याण शाहीर यांच्यासह काँग्रेस पक्षाचे कार्यकर्ते पदाधिकारी उपस्थित होते.

# औसा शिक्षक पतसंस्था दिनदर्शिकेचे आ. पवारांच्या हस्ते प्रकाशन

**त.भा. वृत्तसेवा,**
**औसा, २८ डिसेंबर :** ज्ञानदान करणाऱ्या शिक्षकांसाठी दररोज परिपाठात उपयुक ठरणाऱ्या शैक्षणिक दिनदर्शिकाचे गेल्या १५ वर्षापासून संस्थेवर आर्थिक बोजा न टाकता सर्व शिक्षकांना, सर्व शाळांना मोफत दिनदर्शिका वाटप करण्याचा नाविन्यपूर्ण उपक्रम पतसंस्थेच्या वतीने सुरु आहे. या उपक्रमाअंतर्गत औसा शिक्षक पतसंस्थेच्या शैक्षणिक दिनदर्शिका २०२६ चे विमोचन, प्रकाशन औश्याचे आमदार अभिमन्यू पवार व ह.भ.प. दत्तात्रय पवार गुरुजी यांच्या हस्ते रविवार दि. २८ डिसेंबर रोजी करण्यात आले.

आमदार अभिमन्यू पवार म्हणाले, सामाजिक व राष्ट्रीय कार्याचे उपक्रम राबवून विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गुणवत्तेबरोबर



व्यवस्थापन करण्यामध्ये जिल्हा परिषद शिक्षक अग्रेसर आहे. याच प्रमाणे पतसंस्थेचा पारदर्शक कारभार, रेकॉर्डचे व्यवस्थापन आणि शिक्षकांप्रती सेवावृत्ती यावरून औसा शिक्षक पतसंस्था ही जिल्ह्यातील इतर पतसंस्थांना आदर्श निर्माण करून देत असल्याचे गौरवोद्गार दिनदर्शिका विमोचन प्रसंगी काढले. तालुक्यातील शिक्षकांच्या ज्या काही अडी-अडचणी असतील तर त्या सोडविण्याचे आश्र्वासन ही यावेळी आमदार अभिमन्यू पवार यांनी दिले. पतसंस्थेच्या शैक्षणिक दिनदर्शिकेत शिक्षकांना उपयुक्त दर महिन्याचे दिनविशेष, माहे जानेवारी मध्ये शालेय व्यवस्थापन समिती रचना आहे. भाषा अध्ययन स्तर व गणित अध्ययन स्तर आणि शालेय विद्यार्थ्यासाठी उपयुक्त मोबाईल अँप्स माहिती इत्यादी संपूर्ण माहिती दिनदर्शिकेत समाविष्ट असल्याने वर्ष संपल्यानंतर दिनदर्शिका टाकून न देता चिरकाळ जतन करून ठेवणारी दिनदर्शिका असल्याचे पतसंस्थेचे चेअरमन महादेव खिचडे यांनी आपल्या प्रास्ताविकात सांगितले.

यावेळी संस्थेचे व्हा. चेअरमन हरीश आयतनबोने, सचिव संजय जगताप, संचालक दिपक डोंगरे, संजय रोडगे, महेश कांबळे यांच्यासह शिक्षक राजू जाधव, अमोल निकाळजे, सतीश बेडगे, मारुती सूर्यवंशी आदी उपस्थित होते.

# दिव्यांग विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप

**त.भा. वृत्तसेवा,**
**औसा, २८ डिसेंबर :** तालुक्यातील किल्लारी येथील व्यापारी गणेश बाबासाहेब पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त व्हाट्सअप गुड मॉर्निंग ग्रुपच्या वतीने सामाजिक उपक्रमाच्या माध्यमातून नदी हत्तरगा येथील जनकल्याण दिव्यांग पुनर्वसन केंद्रातील विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप करून वाढदिवस साजरा करण्यात आला. किल्लारी जनता सहकारी पतसंस्थेचे व्यवस्थापक बालाजी बिराजदार, बुलढाणा अर्बन बँकेचे व्यवस्थापक संदीप वाडकर, राजकुमार बिराजदार, कुवरसिंग राजपूत, भरत सगर, मुकुंद पोतदार, मंडळ अधिकारी सुरज स्वामी, दत्ता कलशेट्टी, दिगंबर चेळकर, बाळू लिंबाळे, सुनील परसाळगे, पत्रकार विश्वनाथ गुंजोटे वैजिनाथ कांबळे, शिवशंकर बिराजदार, दिव्यांग पुनर्वसन



केंद्राचे व्यवस्थापक श्रीराम शिंदे, ज्ञानेश्र्वर खोबरे तसेच विद्यार्थी, केंद्रातील कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## लिंबाबाई घोणसे यांचं निधन



**वलांडी :** देवणी तालुक्यातील तळेगाव भो. येथील रहिवासी लिंबाबाई रामराव घोणसे वय ८७ यांचे अल्प आजाराने शुक्रवारी निधन झाले.त्यांच्या पार्थिवावर तळेगाव येथील सार्वजनिक स्मशान भुमीत अंत्यसंस्कार करण्यात आले.त्यांच्या पश्चात दोन मुले, सुना, नातवंडे, पतवंडे असा परिवार आहे.कॉंग्रेसचे जिल्हा उपाध्यक्ष मालबा घोणसे यांच्या त्या मातोश्री होते.

## काशीनाथ जाधव महाराज यांचे निधन



**वलांडी :** अनंतवाडी (ता. देवणी) येथील ह.भ.प. काशीनाथ गोपीनाथ जाधव महाराज (वय ९०) यांचे रविवारी(ता. २८) दुपारी अल्पशा आजाराने निधन झाले. पंचक्रोशीतील ते निरपेक्ष वृत्तीचे कीर्तनकार, प्रवचनकार म्हणून परिचीत होते. त्यांनी ४० वर्ष वारकरी संप्रदायात निशुल्क कार्य केले.

त्यांच्या पचात पत्नी, तीन मुले, सुना नातवंडे असा परिवार असुन असून ह.भ.प. ओमनाथ महाराज यांचे ते वडील होते त्यांचा अंत्यविधी सोमवारी (ता. २९) दुपारी १० वाजता अनंतवाडी येथे होणार आहे.



## स्वामी क्लिनिक-फिजिओथेरपी सेंटरचा शुभारंभ

**त.भा. वृत्तसेवा,**
**रेणापूर, २८ डिसेंबर :** रेणापूर शहरात स्वामी क्लिनिक-फिजीओथेरपी सेंटरचा शुभारंभ दि १८ डिसेंबर रोजी संपन्न झाला. याप्रसंगीकिल्लारीचे तहसिलदार रामेश्वर स्वामी, ग्रामीण रुग्णालय रेणापूरच्या अधिक्षक डॉ. अनिता अलगुले. तालूका वैद्यकीय अधिकारी डॉ श्रीधर रेड्डी. मंगेश सुवर्णकार, महादेव बन, पाटिल उपस्थित होते.

याप्रसंगी जनरल फिजीशिएन डॉ. ओंकार स्वामी, फिजिओथेरपिस्ट डॉ. वैष्णवी स्वामी यांनी उपस्थितांचा सत्कार केला. सर्व आजारावर उपचार व फिजीओथेरपीची सुविधा रेणापूर शहरात उपलब्ध झाल्या बद्दल उपस्थितांनी शुभेच्छा दिल्या. अमृतेश्वर स्वामी यांनी उपस्थितांचे आभार मानले.

# मास्टर दीनानाथ मंगेशकर महाविद्यालयात माजी विद्यार्थी मेळावा

**त.भा. वृत्तसेवा,**
**निलंगा, २८ डिसेंबर :** महाविद्यालयाच्या शैक्षणिक वाटचालीत विद्यार्थ्यांचे योगदान मोलाचे असून विद्यार्थ्यांनी आपले अध्ययन व करिअर यासोबतच सामाजिक ऋणानुबंध जोपासणे आवश्यक असल्याचे प्रतिपादन माजी प्राचार्य तथा शारदोपासक शिक्षण संस्थेचे संचालक शिवाजीराव जाधव यांनी केले.

निलंगा तालुक्यातील औराद शहाजनी येथील मास्टर दीनानाथ मंगेशकर महाविद्यालयात माजी विद्यार्थी संघाच्या वतीने दि.२७ डिसेंबर रोजी आयोजित करण्यात आलेल्या माजी विद्यार्थी मेळाव्याचे प्रमुख अतिथी म्हणून ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्र.प्राचार्य डॉ. शंकर कल्याणे होते. व्यासपीठावर माजी विद्यार्थी संघाचे अध्यक्ष अनुराग लड्डा (सनदी लेखापाल), उपाध्यक्ष लक्ष्मीकांत माळवदकर, कोषाध्यक्ष प्रा.सुनील पाटील, संचालक श्रीराम बियाणी, प्रताप मुळे, अस्लम नाईकवाडे तसेच शारदोपासक शिक्षण संस्थेचे अध्यक्ष बस्वराज वलांडे, सचिव रमेश बगदुरे, संचालक दगडू




गिरबने, मडोळय्या मठपती उपस्थित होते.

अध्यक्षीय समारोप प्र.प्राचार्य डॉ.शंकर कल्याणे यांनी केला. अनुराग लड्डा यांनी आपल्या प्रास्ताविकातून माजी विद्यार्थी संघाची स्थापना, कार्यपद्धती, राबविण्यात येणाऱ्या शैक्षणिक व सामाजिक उपक्रमांची माहिती दिली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ.विनोद चिंते यांनी केले व उपस्थितांचे आभार प्रा.श्रीकृष्णा पांचाळ यांनी मानले. याप्रसंगी डॉ.गोपाळ सोमाणी, दयानंद जाधव, संगमनाथ उडबळे, बालाजी कुंभार, प्रकाश स्वामी, दत्ता बोंडगे, शरद सगरे, गजानन पाटील, विशाल सांडवे, मियाँसाब सय्यद, पांडुरंग कांबळे, वैशाली बिरादार, रचना सोनी, राजश्री छत्रे, सागरबाई बडगे, अश्विनी देवरकोंडा यांच्यासह प्राध्यापक, कर्मचारी विद्यार्थी उपस्थित होते.

# सकल जैन समाजाच्या सदैव पाठीशी राहील-बाळराजे पवार

**तभा वृत्तसेवा**
**गेवराई दि.२८ डिसेंबर**

व्यावसायिके तच्या माध्यमातून जीवनाला आकार देणाऱ्या, गेवराई येथील सकल जैन समाजाच्या पाठीशी सदैव तत्पर राहून काम करीत राहू, असे प्रतिपादन भारतीय जनता पक्षाचे युवा नेते बाळराजे पवार यांनी येथे बोलताना केले. गेवराई शहरातील जैन बांधवांनी नेहमीच विकासाला साथ दिली आहे. सुज्ञ मतदारांचा कौल विकासाच्या बाजूनेच असतो. अशी भूमिका माजी मंत्री बदामराव पंडित यांनी येथे बोलताना मांडली आहे.

रविवार ता. २८ रोजी सकाळी अकरा वाजता गेवराई शहरातील सकल जैन समाजाच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या नवनिर्वाचित नगराध्यक्षांसह सर्व प्रभागातील नगरसेवकांचा सत्कार समारंभात ते बोलत होते. व्यासपीठावर सौ. गिरीकाभाभी पंडित, माजी नगराध्यक्ष सुशील जवंजाळ, माजी सभापती युद्धाजीत पंडित, माजी उपनगराध्यक्ष राजेंद्र राक्षसभुवनकर, ज्येष्ठ नेते एम.एस. इंदाणी, राहुल जिजा खंडागळे, बाबा पिसाळ यांची उपस्थिती होती.

गेवराई येथील भारतीय जनता पक्षाच्या नवनिर्वाचित नगराध्यक्षा सौ. गिताभाभी पवार यांच्यासह सर्व प्रभागातील नगरसेवकांचा, जैन समाजाच्या वतीने सत्कार समारंभ आयोजित करण्यात आला होता. यावेळी बोलताना बाळराजे पवार यांनी सांगितले की आम्ही सेवक आहोत. काम करायच्या आधीच कौतुक होऊ



लागले आहे. परंतू ,सत्कार म्हणजे ओझे वाटते. ही मोठी जबाबदारी आहे. गेवराई ची बाजारपेठ चालवायची आहे. सर्व सामान्य माणूस मोठा झाला पाहिजे. व्यावसायिकता वाढली पाहिजे. यासाठी, आम्ही सगळे मिळून प्रयत्न करूत. आबा आहेत. युद्धाजीत दादा आणि आम्ही आहोत. राजकारण आणि धर्म, त्यामध्ये सत्ता आहे. सत्ता आणि पैसा हिंसक असते. अहिंसक राजकारणी जनतेचे दुष्मन असतात. म्हणून, चांगली माणसे निवडून आली पाहिजेत. असे ही पवार यांनी सांगितले. जैन बांधव नेहमीच पाठींबा देत आलेत. त्यांचे ऋणानुबंध निर्माण झाले आहेत. यापुढे, गेवराई नगर परिषदेच्या माध्यमातून

### जैन समाजाचा नेहमीच विकासाच्या बाजुने कौल - माजी मंत्री बदामराव पंडित

बारामतीच्या विकासाशी स्पर्धा करायची आहे. का करायची नाही. असा प्रश्न उपस्थित करून, पवार म्हणाले की, विकास हीच आमची जात, त्यासाठी गेवराईचा पाटील म्हणून तुमच्या मदतीसाठी सदैव पाठीशी राहील, असे वचन ही शेवटी बाळराजे पवार यांनी दिले.माजी मंत्री बदामराव पंडित यांनी सांगितले की, गेवराई च्या जनतेन आम्हाला मोलाची मदत आणि पाठिंबा दिला आहे. भारतीय जनता पक्षाच्या माध्यमातून मी आणि बाळराजे पवार एकत्र येऊन काम करत आहोत. आमच्या दोघांवर जो विश्वास दाखवला. त्या बद्दल गेवराईकरांना धन्यवाद देऊन, शहराच्या आणि ग्रामीण भागातील गोरगरीबांच्या हितासाठीच आम्ही या पुढे ही काम करत राहू, अशी भावना ही , शेवटी माजी मंत्री बदामराव पंडित यांनी व्यक्त केली. माजी उप नगराध्यक्ष राजेंद्र राक्षसभूवनकर, माजी सभापती युद्धाजित पंडित यांची ही यावेळी भाषणे झाली. सूत्रसंचालन नितीन घोडके तर प्रास्ताविक अभिजीत काला यांनी केले.कार्यक्रमास सकल जैन समाज बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# गेवराई नगरपालिकेच्या नवनिर्वाचित नगराध्यक्ष व नगरसेवक यांचा भव्य नागरी सत्कार सोहळा संपन्न

**तभा वृत्तसेवा**
**गेवराई दि.२८ डिसेंबर**

गेवराई नगरपालिकेचे नवनिर्वाचित नगराध्यक्ष सौ.गीताभाभी बाळराजे दादा पवार व भाजपाचे सर्व नगरसेवक यांचा नागरी सत्कार सोहळा भाजपा लोकनेते आदरणीय बाळराजे दादा पवार व महाराष्ट्र राज्याचे मा.राज्यमंत्री बदामराव (आबा) पंडित यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये महात्मा ज्योतिबा फुले भाजी मंडई मार्केट बाजार स्थळ येथे संपन्न झाला.




गेवराई नगर परिषद निवडणुकीमध्ये भाजपला मोठे यश आले असून नगराध्यक्ष पदाच्या उमेदवारासह १६ नगरसेवक त्यांचे बहुमताने निवडून आले असल्याने गेवराई शहरातील महात्मा ज्योतिबा फुले भाजी मंडी मार्केट बाजार स्थळ गेवराई येथे संदीप काळे मित्र मंडळाच्या वतीने भव्य नागरिक सत्काराचे आयोजन दि. २७ डिसेंबर रोजी करण्यात आले होते. यावेळी बाळराजे दादा पवार व माजी राज्यमंत्री बदामराव आबा पंडित यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी नवनिर्वाचित नगराध्यक्ष सौ. गीताभाभी बाळराजे पवार व सर्व निवडून आलेले १६ नगरसेवकांचा भव्य नागरिक सत्कार संपन्न मोठ्या थाटामाटा संपन्न झाला. या सत्कार कार्यक्रमाला भारतीय जनता पार्टीचे सर्व पदाधिकारी व संदीप भैय्या काळे मित्र मंडळाचे कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते यावेळी नगराध्यक्ष व नगरसेवक यांनी गेवराई तालुका शहरातील तमाम मतदारांचे व संदीप भैया काळे मित्र मंडळाचे आभार मानले.

## बीड नगरपालिकेत भारतीय जनता पार्टी सत्तेत बसत असेल तर

# उपनगराध्यक्ष पदासाठी जगदीश गुरखूदे हे प्रबळ दावेदार





**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.२८ डिसेंबर**

भारतीय जनता पार्टीच्या बीड शहरातील राजकारणात एक सुसंस्कृत विनम्र आणि जनसेवेचा वसा हाती घेतलेलं नेतृत्व तत्त्वाशी एकनिष्ठ पार्टिशी एकनिष्ठ समाजाप्रती चांगलं काम करण्याची इच्छाशक्ती २४ तास लोकांसाठी उपलब्ध असणारा एक नगरसेवक म्हणून आज ज्यांची ओळख आहे समोरचा माणूस आपल्या वार्डातला आहे की शहरातला याचा विचार न करता समोरच्या मदतीला धावून जाणारे जगदीश भैया हे उपनगराध्यक्ष व्हावे ही जनतेमध्ये चर्चा कारण सर्वसामान्यांसाठी दिवस रात्र कधीही हक्काने माणूस गेला तर तो कधीच रिकाम्या हाताने जगदीश भैय्या कडून परत जात नाही सर्वसामान्य कुटुंबात जन्मलेल्या जगदीश भैय्यांनी जेव्हापासून भारतीय जनता पार्टीचे काम करत आहेत तेव्हापासून आजपर्यंत एकनिष्ठता प्रामाणिकपणा या गोष्टीला फार महत्त्व दिलेला आहे भैय्यांसारखा स्वभाव आणि माणुसकी जपणारा माणूस हा फार कमी राजकारणी लोकांमध्ये पाहायला मिळतो आजच्या परिस्थितीत इतक्या स्वच्छ प्रतिमेचा आणि मोकळ्या मानाचा माणूस म्हणून जर पाहिलं तर जगदीश भैय्यांशिवाय दूरदृष्टीचा आणि विकासात्मक काम करणारा एक सच्चा निस्वार्थ जनसेवक दुसरा नाही

# आदर्श पत्रकार संघ म्हणून फेब्रुवारी २०२६ रोजी कर्जत येथे होणार पुरस्कार वितरण

**तभा वृत्तसेवा**
**अंबाजोगाई दि.२८ डिसेंबर**

अखिल भारतीय मराठी पत्रकार परिषद पत्रमहर्षी रंगाअण्णा वैद्य आदर्श जिल्हा पत्रकार संघ आणि वसंतराव काणे आदर्श तालुका पत्रकार संघ च्या वतीने आदर्श पत्रकार संघ म्हणून अंबाजोगाई शाखेने मागील ५ वर्षात केलेल्या कार्याची परिषदेने दखल घेऊन अंबाजोगाई संघाची निवड केली असून फेब्रुवारी २०२६ रोजी कर्जत येथे पुरस्कार देऊन पुरस्कार प्राप्त जिल्हा व तालुका संघास सन्मानित करण्यात येणार असल्याची माहिती अखिल भारतीय मराठी पत्रकार परिषदेच्या वतीने जाहीर करण्यात आली आहे.

यां विषयी सविस्तर माहिती अशी की,अखिल भारतीय मराठी पत्रकार परिषदेच्यावतीने दरवर्षी देण्यात येणारया *पत्रमहर्षी रंगाअण्णा वैद्य आदर्श जिल्हा पत्रकार संघ* आणि *वसंतराव काणे आदर्श तालुका पत्रकार संघ* राज्यस्तरीय पुरस्कारांची घोषणा करण्यात आली आहे.. परभणी जिल्हा मराठी पत्रकार संघाला २०२५ चा आदर्श जिल्हा पत्रकार संघ पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे.

# बीड जिल्ह्यातील ‘हक्काचा जनकल्याण महामार्ग ’’हिरावून घेऊ नका-अनिल बोर्डे

**तभा वृत्तसेवा**
**गेवराई दि.२८ डिसेंबर**

राज्यातील महत्वकांक्षी लातूर-कल्याण द्रुत गती महामार्ग हा बीड जिल्ह्याचा विकासाचा कणा आहे त्यामध्ये बदल करण्यात येऊ नये अशी मागणी बीड जिल्हा ग्राहक पंचायत उपाध्यक्ष अनिल बोर्डे यांनी मा. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व जिल्हाधिकारी बीड यांच्याकडे निवेदनाद्वारे मागणी केले ली आहे.

राज्यातील महत्त्वकांक्षी लातूर-कल्याण द्रुतगती महामार्ग हा जिल्ह्याच्या विकासाचा वरदान ठरणारा असून राजकीय दबावा पोटी या मार्गाची दिशा बदलण्याचा प्रयत्न झाल्यास बीड जिल्ह्याच्या विकासासाठी दुर्दैवी ठरेल. तरी मूळ प्रस्तावाप्रमाणे हा मार्ग लातूर -आंबेजोगाई -केज-अहिल्यानगर मार्गे कल्याण असाच राबविण्यात यावा अशी मागणी बीड जिल्हा ग्राहक पंचायत महाराष्ट्र यांच्या वतीने करण्यात येत आहे.



बीड जिल्हा आधीच दुष्काळ बेरोजगार स्थलांतराचे गंभीर प्रश्न स्वरूपाचा सामना करीत आहे .अशा परिस्थितीत हा मार्ग जिल्ह्यासाठी संजीवनी ठरणार आहे . या मार्गामुळे शेतकऱ्याचा मुंबई, पुणे सारख्या बाजारपेठेत लवकर शेतकरी ग्राहकाचा माल पाठवणे शक्य होणार असून औद्योगिक गुंतवणूक व रोजगार निर्मितीला मोठी चालना मिळणार आहे .परंतु गेल्या काही दिवसापासून हा मार्ग धाराशिव जिल्ह्याकडे वळविण्यासाठी लोकप्रतिनिधीकडून राजकीय दबाब टाकला जात आहे. असे समजते ही बाब दुर्दैवी आहे आणि बीड जिल्ह्यावर अन्याय करणारी आहे.

बीड जिल्ह्याला जाणून बुजून विकासापासून वंचित ठेवण्यात ठेवण्याची भावना ग्राहकांमध्ये निर्माण होत आहे यातून मोठा असंतोष पसरत आहे.

नियोजित मार्गात बदल करणे जिल्ह्याच्या भविष्याशी खेळण्यासारखे आहे अशी भावना बीड जिल्ह्यातील ग्राहकाची झाली आहे .तरी महाराष्ट्र संतुलित विकासात कोणत्याही जिल्ह्यावर अन्याय होणार नाही अशी भावना निर्माण होऊ नये अशी मागणी बीड जिल्हा ग्राहक पंचायत बीड जिल्हा उपाध्यक्ष अनिल बोर्डे यांनी मा.मुख्यमंत्री यांच्याकडे केलेली आहे.

# इरा स्कूलच्या मैदानावर रंगला क्रीडा महोत्सव



**तभा वृत्तसेवा**
**गेवराई दि.२८ डिसेंबर**

गेवराई शहरातील इरा स्कूलच्या मैदानावर कबड्डी, खो-खो, धावणे अशा मैदानी खेळा बरोबर इतर खेळांचा क्रीडा महोत्सव साजरा करण्यात येत आहे. विद्यार्थ्यांचा यामध्ये उत्स्फूर्त सहभाग मिळत आहे.

गेवराई शहरातील इरा पब्लिक स्कूल व इरा इंटरनॅशनल स्कूल मध्ये क्रीडा महोत्सवाच्या आयोजन करण्यात आले आहे. या निमित्त आयोजित करण्यात आलेल्या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी रोटरी क्लबचे अध्यक्ष तथा क्रीडा शिक्षक प्रा. राजेंद्र बरकसे हे होते, तर व्यासपीठावर पत्रकार संघाचे अध्यक्ष मधुकर तौर, नवनिर्माचित नगरसेवक तथा पत्रकार सुभाष सुतार, संस्थेचे अध्यक्ष गणेश क्षीरसागर, प्राचार्या वर्षा क्षीरसागर, अश्विनी कुलकर्णी, श्रीनिवास क्षीरसागर, क्रीडा शिक्षक अरविंद पवार यांची उपस्थिती होती. या दिवशीच्या क्रीडा महोत्सवाचे उद्घाटन प्रमुख पाहुणे मधुकर तौर, सुभाष सुतार, प्रा. राजेंद्र बरकसे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी प्रस्ताविकात बोलताना प्राचार्य वर्षा क्षीरसागर म्हणाल्या की, इरा स्कूलच्या विद्यार्थ्यांमध्ये ज्ञानाबरोबर त्यांचा सर्वांगीण विकास व्हावा यासाठी दरवर्षी क्रीडा महोत्सवाच्या आयोजन करण्यात येते. सप्ताह भर चालणाऱ्या या महोत्सवात प्रत्येक विद्यार्थ्यांनी सहभाग घेऊन मैदानी खेळाचा आनंद घ्यावा हा या मागचा उद्देश असतो अशा प्राचार्या वर्षा क्षीरसागर म्हणाल्या.

क्रीडा स्पर्धेतून विद्यार्थ्यांचे आरोग्य तंदुरुस्त राहण्यास मदत होते त्यामूळे शाळांनी क्रीडा स्पर्धा घ्याव्यात यातून विद्यार्थी तंदुरुस्त होतील असे मधुकर तौर म्हणाले, विद्यार्थ्यांनी खेळ खेळले पाहिजेत, व्यायाम केला , योगा केला, तर त्यांचे शरीर व मन अधिक तलक होईल, शरीर तंदुरुस्त राहील असे प्राध्यापक राजेंद्र बरकसे म्हणाले. यावेळी बोलताना ज्येष्ठ पत्रकार सुभाष सुतार यांनी सांगितले की, दरवर्षी शालेय स्तरावर क्रिडा स्पर्धा घेतल्या जातात. स्पर्धा आवश्यक असून, खेळाने आरोग्यावर सकारात्मक परिणाम होतो. त्यामुळे, शाळेत होणाऱ्या क्रिडा विद्यार्थ्यांच्या सर्वागीण विकासात भर घालतात. इरा पब्लिक स्कूल च्या माध्यमातून खेळाचे महत्त्व अधोरेखित झाले आहे असे ते म्हणाले कार्यक्रमाचे सूत्रसंचालन नानासाहेब कडू यांनी केले तर आभार दिपाली जोशी यांनी मानले

# करचुंडी-बागुलदरावस्ती रस्ता व पुलाचे काम लवकरच सुरू होणार - राजेंद्र मस्के

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.२८ डिसेंबर**

लिंबागणेश जिल्हा परिषद गटातील करचुंडी-बागुलदरावस्ती येथील डांबरी रस्ता व पुलाचे काम लवकरच सुरू होणार असून ग्रामस्थांची दीर्घकाळची गैरसोय दूर होईल, असा विश्वास राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के यांनी व्यक्त केला आहे.



आज सकाळी जिल्हाध्यक्ष मस्के यांनी मौजे करचुंडी येथे भेट देऊन बागुलदरा वस्ती, शाळा इमारत व इतर प्रलंबित विकासकामांची पाहणी केली. यावेळी त्यांनी ग्रामस्थांशी सविस्तर चर्चा करून त्यांच्या समस्या जाणून घेतल्या.

ग्रामस्थांनी रस्ता व पुला अभावी निर्माण होणाऱ्या अडचणी, विद्यार्थ्यांना होणारी गैरसोय आणि आपत्कालीन परिस्थितीत होणारी संकटे मांडली. या समस्येचे गांभीर्य ओळखून मस्के यांनी नदीवरील पूल आणि डांबरी रस्त्याचे काम तातडीने सुरू करण्याची आवश्यकता असल्याचे स्पष्ट केले.

रस्ता व पुलासाठी मंजुरी प्राप्त झाली असून प्रशासकीय प्रक्रिया पूर्ण होताच कामाला सुरुवात होईल, अशी माहितीही त्यांनी दिली.

करचुंडी-बागुलदरावस्तीचा रस्ता आणि पूल हे फक्त विकासाचे प्रतीक नसून ग्रामस्थांच्या सुरक्षिततेशी निगडित काम आहे. हे काम लवकरच पूर्णत्वास नेऊ.

असा विश्वास राजेंद्र मस्के यांनी दिला आहे.

या पाहणीदरम्यान शेख जमील भाई, हिरामण शिंदे, माजी सरपंच भालचंद्र भंडाणे, अमोल शिंदे, शेख एजाज भाई, समीर पठाण, धसे, कट्टू भाई, शेख पप्पू, शेख असलम, कैलास शिंदे यांच्यासह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# चांगल्या लोकांच्या संगतीत राहून स्वतःला घडवावे आणि समाजासाठी चांगले कार्य करावे

### साध्वी प्रतिभा कवरजी म.सा. यांचे प्रतिपादन

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.२८ डिसेंबर**

विज्ञान सांगते की जन्माची शक्यता खूप कमी असते, त्यामुळे मानवी अस्तित्व ही एक मौल्यवान देणगी आहे. आपण ज्या वातावरणात राहतो आणि ज्या लोकांशी संपर्क येतो, त्यातून आपली जडणघडण होते. चांगल्या संगतीने कल्याण होते, तर वाईट संगतीमुळे नुकसान होऊ शकते. त्यामुळे अहंकारातच माणूस गुरफटून घेवून इतरांना कार्यापासून परावृत्त करत आहे. चांगल्या लोकांच्या संगतीत राहून स्वतःला घडवावे आणि समाजासाठी चांगले कार्य करावे. असे प्रतिपादन साध्वी प्रतिभा कवरजी म.सा. यांनी केले. त्या बीड येथील तेरापंथ स्वाध्याय भवन गुजराती कॉलनी येथे श्रावकांना उपदेश करतांना बोलत होत्या.

जैन धर्म आराधना प्रवचन मालेच्या दुसर्या सत्रात. प्रवचन देताना सर्वप्रथम परमपूज्य समिती महाराजांनी आपले विचार मांडले. परिस्थितीला समजून घ्यावे. आहे त्या परिस्थितीमध्ये समरस राहावे आणि त्याच परिस्थितीत सक्रिय असावे या विषयावर मंथन करतांना कार्य करत असता व्यवहारात शुद्ध व निर्मळ मनाने व्यवहार करावा. हे सांगताना त्यांनी अकबर बिरबलाचे दरबारात घडलेल्या उदाहरणासह प्रत्येकाला त्रास सहन करावा लागतच असतो यावर त्यांनी भाष्य करत श्रावकांना समजावून सांगितले. तर मुख्य प्रवचन देताना कोठा सांप्रदाय प्रमुख पु.श्री.प्रतीभाकवरजी म.सा. यांनी जीवनात घडणार्या सुख-दुःखाचे विश्लेषण केले. सुखदुःखाने भरलेली ही तुमची देह काया आहे; मात्र या कायेला सुखाचीच आशा जास्त आहे. आणि या आशेतून दुःखाला तोंड देणे माणसाला अवघड जात आहे. परंतु दुःख हे दुःख राहत नाही तर त्या दुःखातही माणसाने सुखाला शोधावे लागते. यासाठी प्रत्येक गोष्टीत सकारार्थी विचार करणे हे मानवाच्या हिताचे आहे.

# बीडचा खेळाडू राष्ट्रीय पातळीवर; तुकाराम करांडे यांची सिनियर खो-खो स्पर्धेसाठी निवड

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.२८ डिसेंबर**

जिल्ह्यातील अष्टपैलू खो-खो खेळाडू तुकाराम करांडे यांची तेलंगणा येथे होणाऱ्या सिनियर राष्ट्रीय अजिंक्यपद खो-खो स्पर्धेसाठी निवड झाली आहे. ही प्रतिष्ठेची स्पर्धा जानेवारी २०२६ मध्ये तेलंगणा राज्यात पार पडणार आहे.

तुकाराम करांडे यांनी सलग पाच वर्षे बाबासाहेब आंबेडकर विद्यापीठाच्या संघातून खेळताना सातत्यपूर्ण व उत्कृष्ट कामगिरी करून आपली गुणवत्ता सिद्ध केली आहे. त्यांच्या या उल्लेखनीय यशामुळे बीड जिल्ह्याच्या क्रीडा क्षेत्रात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.

या निवडीबद्दल बीड जिल्हा एमॅच्युअर खो-खो असोसिएशनचे मार्गदर्शक जे. पी. शेळके सर, एमॅच्युअर खो-खो संघटनेचे अध्यक्ष ऋषिकेश शेळके, उपाध्यक्ष रमेश भाऊ शिंदे, सचिव विजय जाहेर, कोषाध्यक्ष योगेश सोळसे तसेच मनोज जोगदंड यांनी तुकाराम करांडे यांचे मनःपर्वक अभिनंदन केले.

लातूर दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## केशवराज विद्यालयात परिवहन समितीची बैठक

**त.भा. वृत्तसेवा,**
**लातूर, २८ डिसेंबर :** येथील श्री केशवराज माध्यमिक विद्यालयात दि. २७ डिसेंबर २०२५ शनिवार रोजी शालेय परिवहन समितीची बैठक संपन्न झाली. या बैठकीसाठी अध्यक्ष म्हणून विद्यालयाचे मुख्याध्यापक बालासाहेब केंद्रे तर प्रमुख अतिथी श्रीकृष्ण जयराम पाडे यांची उपस्थिती होती.

याप्रसंगी प्रमुख अतिथी श्रीकृष्ण जयराम पाडे यांनी विद्यार्थी, पालक व शाळा या तिघांचा समन्वय वाहन चालकांनी ठेवावा, वाहनामध्ये सीसीटीव्ही कॅमेरे बसून घ्यावेत, त्याचबरोबर विद्यार्थी वाहतूक सेवेतील चालकांसाठी शासनाने नवीन योजना राबवावी असे मत व्यक्त केले. यानंतर अध्यक्षीय समारोपात विद्यालयाचे मुख्याध्यापक बालासाहेब केंद्रे यांनी शासकीय नियमाची पूर्तता करून वेळोवेळी होणारे बदल चालकांनी लक्षात घ्यावेत, विद्यार्थ्यांच्या अडचणी लक्षात घेऊन प्रवास करावा, असे मत व्यक्त केले.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक परिचय कृष्णा जोशी यांनी केले तर आभार बालासाहेब करपुडे यांनी मानले. या बैठकीस परिवहन समितीचे सर्व सदस्य व वाहन चालक यांची उपस्थिती होती.



# शेवटच्या दिवशीच मिळणार उमेदवारांना 'एबी' फॉर्म ?

**त.भा. वृत्तसेवा,**
**लातूर, २८ डिसेंबर :** महानगरपालिकेच्या निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज दाखल करण्याचा शेवटचा दिवस मंगळवार दि. ३० डिसेंबर हा आहे. संभाव्य बंडखोरीची शक्यता लक्षात घेता प्रमुख राजकीय पक्षांनी आतापर्यंत एकाही उमेदवाराला अधिकृत 'एबी' फॉर्म देण्याची हिंमत दाखवलेली नाही. त्यामुळे पक्षाच्या अधिकृत उमेदवारांना आता शेवटच्या दिवशीच एबी फॉर्म दिले जातील, अशी शक्यता राजकीय वर्तुळात वर्तवली जात आहे.

लातूर शहर महानगरपालिकेची ही तिसरी सार्वत्रिक निवडणूक आहे. ही निवडणूक अतिशय चुरशीची अन् अटीतटीची होण्याची शक्यता सुरुवातीपासूनच व्यक्त केली जात होती. प्रत्यक्ष निवडणूक कार्यक्रम घोषित झाल्यानंतर ती शक्यता वास्तवात उतरल्याचे पाहावयास मिळत आहे. या ठिकाणी भारतीय जनता पार्टी विरुद्ध भारतीय राष्ट्रीय काँग्रेस अशी लढत होणार आहे. त्यातच आता माजी महापौर विक्रांत गोजमगुंडे आणि माजी उपमहापौर चंद्रकांत बिराजदार यांनी अजित पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये प्रवेश केल्याने प्रारंभी दुरंगी वाटणारी ही निवडणूक आता काही प्रभागात तिरंगी होण्याची शक्यता बळावली आहे. त्यातच भाजप आणि राष्ट्रवादीमध्ये युती झाल्याने राष्ट्रवादीमध्ये नाही, पण काही प्रमाणात भाजपमध्ये बंडखोरी होण्याची चिन्हे दिसत आहेत.

भाजपमधील ही संभाव्य बंडखोरी टाळण्याच्या उद्देशानेच अद्याप पर्यंत भाजपने आपल्या कोणत्याही उमेदवारीची घोषणा केलेली नाही. हाच प्रयोग भारतीय राष्ट्रीय काँग्रेसनेही राबवला आहे. भाजप कोणत्या प्रभागात कोणता उमेदवार देणार यावरून तोडीस तोड लढत देणारा उमेदवार देण्याची रणनीती काँग्रेसच्या नेत्यांनी आखली आहे.

मावळत्या लातूर पालिकेत पाच वर्षांपैकी पहिली अडीच वर्षे पालिका भाजपच्या ताब्यात होती. पुढच्या अडीच वर्षात नाट्यमय घडामोडी घडून काँग्रेसचे विक्रांत गोजमगुंडे आणि तत्कालीन भाजप नगरसेवक चंद्रकांत बिराजदार हे दोघे अनुक्रमे महापौर-उपमहापौर झाले होते. या दोघांनीही आता आपल्या जुन्या पक्षाचा त्याग करून राष्ट्रवादीमध्ये प्रवेश केला आहे. निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर पक्षांतर हा विषय काही आता राजकीय पक्ष आणि नेत्यांना फारसा नवीन राहिलेला नाही. या पक्षातून त्या पक्षात, त्या पक्षातून या पक्षात अशा कोलांटउड्या पूर्वीपासूनच चालत आलेल्या आहेत. कोलांटउड्यांचा हा प्रकार जनसेवेपेक्षा स्वार्थाला प्राधान्य देणारा आहे, याची जाण आता सामान्य मतदारांनाही झाली आहे. लातुरात तर महापालिकेच्या निवडणुकीच्या तोंडावर अशा अनेक घटना घडल्या आहेत. प्रत्येकाला आपल्या स्वतःच्या स्वार्थाचे पडलेले दिसते. यामध्ये सामान्य नागरिकांना वर्षानुवर्षे भेडसावणाऱ्या समस्यांच्या सोडवणुकीचे कोणालाही काहीही पडलेले दिसत नाही. म्हणूनच मतदार आता आपल्या प्रभागांच्या समस्यांची प्राधान्याने सोडवणूक करू शकेल अशा उमेदवारांच्या पाठीशी राहण्याचा निर्धार केल्याचे दृष्टीपथास येत आहे.

उमेदवारी मागणाऱ्या संभाव्य इच्छुक उमेदवारांची संख्या यावेळी जवळपास सगळ्याच प्रमुख पक्षांकडे अधिक आहे. सर्वाधिक आकडा हा भाजपकडून उमेदवारी मागणाऱ्यांचा आहे. त्यामुळे अन्य पक्षांच्या तुलनेत बंडखोरीचा फटका भाजपलाच अधिक बसण्याची शक्यता आहे. त्या कारणावरूनच उमेदवारांना एबी फॉर्म उमेदवारी अर्ज दाखल करण्याच्या शेवटच्या दिवशी, म्हणजेच मंगळवारी दिले जाण्याची शक्यता वर्तवली जात आहे. या निवडणुकीत भाजपाकडे कार्यकर्त्यांसोबत नेत्यांचीही मोठी फौज राहणार आहे. याउलट प्रतिस्पर्धी काँग्रेसकडे अमित देशमुखांचे एकट्याचे नेतृत्व असणार आहे.

भाजपकडून संभाजी पाटील निलंगेकर आणि काँग्रेसकडून अमित देशमुख या दोघांची नेतृत्व क्षमता या निवडणुकीत पणाला लागणार आहे, हे वेगळ्या शब्दात सांगण्याची आवश्यकता नाही. काँग्रेसमधून अनेकांनी भाजपमध्ये प्रवेश केला आहे. त्याबद्दल अमित देशमुख यांनी किमान या क्षणापर्यंत एक 'ब्र' शब्दही काढलेला नाही. त्यामुळेही सामान्य मतदारांत आश्चर्य सखेद आश्चर्य व्यक्त केले जात आहे. एकंदर ही निवडणूक चुरशीची होणार आहे, यात तीळमात्र शंका नाही.



## लोकाधिकारप्रमुख व्यंकटराव पनाळे यांचा शिवसेनेत प्रवेश

**मुंबई :** २८ डिसेंबर २०२५ रोजी मुंबई येथे शिवसेना सचिव मा. संजय मोरे साहेब यांच्या हस्ते लोकाधिकारप्रमुख व्यंकटराव पनाळे यांचा शिवसेना प्रवेश झाला. शिवसेनेच्या धनुष्यबाणाचा भगवा संजय मोरे यांनी व्यंकटराव पनाळे यांच्या गळ्यात घालून शिवसेनेतील प्रवेशाचे स्वागत केले. तसेच लातूर जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष पंडितराव धुमाळ यांचाही आज शिवसेना सचिव संजय मोरे यांच्या हस्ते शिवसेनेचा भगवा घालून शिवसेनेत प्रवेश संपन्न झाला.

यावेळी शिवसेना सहसंपर्कप्रमुख रवींद्र गुरमे, शिवसेनेचे जिल्हाप्रमुख शिवाजीराव माने, उदगीर चे माजी आमदार सुधाकरराव भालेराव, संतोष पनाळे, महेश चव्हाण, उल्हास सूर्यवंशी, शिवचरण पाटील, बाबुराव आंबेगावे, संजय बिराजदार, गहिनीनाथ राजे त्याचबरोबर अनेक मान्यवर व विविध पक्षातील कार्यकर्त्यांनी शिवसेनेत प्रवेश केला. या सर्वांचेच शिवसेना सचिव संजय मोरे यांनी स्वागत केले.

## लातूर-नांदेड महामार्गावर ट्रकच्या धडकेने वृद्धाचा मृत्यू

**त.भा. वृत्तसेवा,**
**लातूर, २८ डिसेंबर :** शनिवारी सायंकाळच्या सुमारास लातूर - नांदेड महामार्गावरील गरुड चौक परिसरात भरधाव वेगाने जाणाऱ्या ट्रकच्या धडकेने एका ७५ वर्षीय वृद्धाचा जागीच मृत्यू झाल्याची घटना घडली. सादर घटना घडताच परिसरातील संतप्त नागरिकांनी रास्ता रोको आंदोलन करून काहीकाळ महामार्ग बंद केला.

भारत गॅसच्या सिलेंडरची वाहतूक करणाऱ्या ट्रकखाली चिरडून शामराव गायकवाड नामक ७५ वर्षीय वृद्ध व्यक्तीचा शनिवारी सायंकाळच्या सुमारास मृत्यू झाला. शामराव गायकवाड आपल्या घराकडे परतत असताना सदर ट्रकने त्यांना भरधाव वेगात पाठीमागून जोराची धडक दिली. त्यामध्ये त्यांचा जागीच मृत्यू झाला. लातूर शहरातील गरुड चौक परिसरात नेहमीच छोटे मोठे अपघात होत असतात. या ठिकाणी गतिरोधकांसह वाहतूक पोलीस कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्यात यावी, अशी मागणी मागच्या अनेक दिवसांपासून केली जात आहे. तरीही प्रशासन नागरीकातून होणाऱ्या या मागणीकडे फारसे गांभीर्याने पाहताना दिसत नाही. शनिवारची घटना घडताच संतापलेल्या नागरिकांनी काही वेळ सदर मार्ग बंद ठेवल्याने वाहतूक विस्कळीत झाली होती.

या चौकात सिग्नल चालू करण्यात आले आहेत. मात्र ते सिग्नल व्यवस्थित चालतात की नाही हे पाहण्यासाठी त्याचप्रमाणे वाहनधारकांना सिग्नलची सवय आणि आवश्यकता पटवून देण्यासाठी वाहतूक शाखेच्या कर्मचाऱ्यांची नियुक्तीही होणे आवश्यक आहे. बऱ्याचदा सिग्नलकडे लक्ष न देताही वाहनधारक बिनधास्तपणे आपले वाहन पुढे रेटताना दिसतात. त्यातूनच प्रसंगी अशा प्रकारचे अपघात होऊन निष्पाप व्यक्तींना आपले प्राण गमवावे लागते. या मार्गावर सुरक्षिततेची पुरेशी उपाय योजना करण्याची मागणी पुन्हा एकदा वाढीस लागली आहे.

## विकासाच्या मुद्यावर महापालिकेत बहुमत मिळेल : कव्हेकर

**त.भा. वृत्तसेवा,**
**लातूर, २८ डिसेंबर :** देशात मोदीजींच्या नेतृत्वाखाली व राज्यामध्ये देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली चौफेर विकास साधण्याचे काम केले जात आहे. ऐंशी कोटी लोकांना मोफत धान्य, शेतकर्यांना विविध योनजेच्या माध्यमातून अनुदान, मुलींना उच्च शिक्षण मोफत व लाडक्या बहिणीच्या खात्यावर प्रत्येक पंधराशे रूपयाची मदत केली जात असून वर्षाला २६ हजार कोटी रूपये महिलांना लाडकी बहिण योजनेतून देण्याचे काम शासनाने केलेले आहे. त्याच धर्तीवर लातूर महानगरपालिकेच्या माध्यमातून अजित यांनी प्रभाग १८ चा चौफेर विकास करून या भागाचा चेहरा मोहरा बदलण्याचे काम केलेले आहे. रस्ते, पाणी व नाल्याची सुविधा देऊन या प्रभागाचे मॉडेल प्रभाग म्हणून नावलौकिक मिळविण्याचे काम केलेले आहे. त्यामुळे देश व जागतिक विकासाच्या मुद्यावर महापालिका निवडणुकीत भाजपाला लातूरची जनता दोन-तृतीयांश बहुमत देण्याचे ऐतिहासिक कार्य लातूरची जनता करेल,



असे प्रतिपादन भाजपा नेते तथा किसान मोर्चा गुजरात व गोवा राज्याचे प्रभारी माजी आ.शिवाजीराव पाटील कव्हेकर यांनी केले.

यावेळी ते शंकरपुरमनगर कातपूर रोड या भागातील अमर जाधव यांच्या भाऊ निवासस्थानी आयोजित संवाद बैठकीत ते बोलत होते. यावेळी या कार्यक्रमाला माजी नगरसेवक सुभाषअप्पा सुलगुडले, बालाजी शेळके, चंद्रकांत साळुंके, अशोक पवार, रोहिदास साळुंके, बालाजी पाखाडे, अमर जाधव, विलास साळुंके, शिवाजी बोयणे आदी मान्यवर उपस्थित होते.

यावेळी पुढे बोलताना माजी शिवाजीराव पाटील कव्हेकर म्हणाले की, येत्या १५ जानेवारीला महानगरपालिकेसाठी मतदान होणार आहे व १६ तारखेला निकाल आहे.निवडणुका झालेल्या नगरपंचायत व नगरपालिकेच्या माध्यमातून महायुतीला एकहाती सत्ता देण्याचे काम आपण केलेले आहे. लातूर शहराचे नाव लातूर पॅटर्नमुळे देशामध्ये उज्ज्वल झाले असताना लातूरच्या पाणी प्रश्नामुळे लातूरची बदनामी काही प्रमाणात झाली. साडेआठ वर्षे मुख्यमंत्री व २२ वर्षे मंत्री पदावर राहूनही लातूरचा पाणी प्रश्न मार्गी लावण्यामध्ये त्यांना यश मिळालेले नाही. त्यामुळे विकासाच्या प्रवाहात राहून लातूरला चंदीगढ बनविण्यासाठी भाजपा व मित्रपक्षाच्या पाठीशी सक्षमपणे उभे रहा असे आवाहनही कव्हेकर यांनी यावेळी बोलताना केले. प्रारंभी शंकरपुरम भागातील एमएनएस बँकेचे कार्यकारी संचालक अमर जाधव यांनी माजी आ.शिवाजीराव पाटील कव्हेकर यांचा सत्कार केला. तसेच संयोजन समितीच्या वतीने इतर मान्यवरांचा ही सत्कार करण्यात आला.

## लिंगायत शरण फाउंडेशनच्या वतीने सामूहिक श्रद्धांजली

**त.भा. वृत्तसेवा,**
**लातूर, २८ डिसेंबर :** देशाचे माजी गृहमंत्री, लातूरचे सुपुत्र आणि लिंगायत समाजाचे भूषण श्रद्धेय शिवराजजी पाटील चाकूरकर साहेब यांच्या निधनाने समाजाचा आधारवड कोसळला असून ही हानी कधीही भरून न निघणारी आहे. समाजासाठी, देशासाठी आणि माणुसकीसाठी जे-जे करता येईल ते-ते करण्याचा प्रयत्न त्यांनी आयुष्यभर केला. मात्र त्यांच्या विचारांची उंची आणि कार्याचा आवाका कुणालाही पूर्णपणे घेता आला नाही. त्यामुळे श्रद्धेय शिवराजजी पाटील चाकूरकर साहेब यांनी घालून दिलेल्या आदर्शाचे आपण सर्वांनी अनुकरण करणे हीच त्यांना खरी श्रद्धांजली ठरेल असे भावनिक उद्गार माजी उपमहापौर चंद्रकांत बिरादार यांनी काढले.

लिंगायत शरण फाउंडेशन, लातूरच्यावतीने औसा रोड येथील रितुल



स्टुडिओ परिसरात आयोजित करण्यात आलेल्या सामूहिक श्रद्धांजली सभेत ते बोलत होते.

यावेळी महेश पाटील, गुरु बिरादार, राजकुमार कत्ते, अमोल कत्ते, अॅड. शेखर हाविले, डॉ. संजय गवई, प्रा. राजेश विभुते, विजयकुमार गुत्ते आदि श्रद्धांजलीपर विचार व्यक्त करताना महाणे की, देशाचे माजी गृहमंत्री श्रद्धेय शिवराजजी पाटील चाकूरकर साहेब यांचे दि. १२ डिसेंबर २०२५ रोजी दुःखद निधन झाले. त्यांच्या जाण्याने केवळ लिंगायत समाजच नव्हे तर संपूर्ण देशाने एक दूरदृष्टी असलेले नेतृत्व गमावले आहे. सामाजिक सलोखा, राष्ट्रीय एकात्मता, धर्मनिरपेक्षता आणि लोकशाही मूल्ये यासाठी त्यांनी आयुष्यभर कार्य केले. त्यांचे विचार, कार्य आणि माणुसकी हीच पुढील पिढीसाठी प्रेरणास्थान राहील.

यावेळी उपस्थित सर्वांनी दोन मिनिट स्तब्ध उभे राहून श्रद्धेय शिवराजजी पाटील चाकूरकर साहेबांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण केली. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. रत्नाकर बेडगे यांनी केले.

यावेळी डॉ. सिद्राम डोंगरगे, राहुल पत्रिके, प्रदीप हलकंचे, बसवेश्वर हेंगणे, गुरुनाथ उचेकर, नागेश पटणे, आर. सी. पाटील, प्रा. नागेश सुगरे, रामचंद्र बिराजदार, महेश आंबुलगे, रितेश पाटील, इराण्णा पावले आदि सह लिंगायत शरण फाऊंडेशनचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## पंडितराव धुमाळ यांचा शिवसेनेत प्रवेश

**त.भा. वृत्तसेवा,**
**लातूर, २८ डिसेंबर :** राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे नेते पंडितराव धुमाळ यांनी राष्ट्रवादी काँग्रेस व ना अजित पवार गटाला सोडचिठ्ठी देत मुंबई येथे शिवसेना प्रदेश कार्यालयात अनेक कार्यकर्त्यांसह शिवसेनेचे प्रवेश केला, यावेळी शिवसेना सचिव मा संजय मोरे साहेब यांच्या हस्ते शिवसेनेचा धनुष्यबाण असणारा भगवा गमजा घालून शिवसेनेत प्रवेश देण्यात आला. यावेळी शिवसेना जिल्हाप्रमुख शिवाजीराव माने, उदगीरचे माजी आमदार सुधाकर भालेराव, शिवसेनेचे सह संपर्कप्रमुख रवी गुरमे, उपस्थित होते.

पंडितराव धुमाळ सोबत, निलंगा तालुक्यातील उल्हास सूर्यवंशी, महेश चव्हाण, गहिनीनाथ राजे, बाबुराव आंबेगावे, व्यंकट पन्हाळे, संतोष पन्हाळे, संजय बिरादार, गजेंद्र पिंपळे यांच्यासह अनेक पक्षातील पदाधिकाऱ्यांनी शिवसेनेत प्रवेश



केला. यावेळी शिवसेना सचिव संजय मोरे यांनी प्रवेश केलेल्या सर्व पदाधिकाऱ्यांचे अभिनंदन करून शिवसेना मजबूत करावे असे आवहान यावेळी केले.

# श्रीकिशन सोमाणी विद्यालयाचे वार्षिक स्नेहसंमेलन उत्साहात साजरे

**त.भा. वृत्तसेवा,**
**लातूर, २८ डिसेंबर :** येथील श्रीकिशन सोमाणी विद्यालयाचे वार्षिक स्नेहसंमेलन एकूण तीन सत्रांमध्ये उत्साहपूर्ण वातावरणात साजरे करण्यात आले. विद्यार्थ्यांनी आपल्या उत्कृष्ट कलागुणांचे प्रदर्शन करून पालकांसह उपस्थित सर्वांची मने जिंकली.

इयत्ता तिसरी ते सहावीच्या विद्यार्थ्यांच्या स्नेहसंमेलनाचे उदघाटन ज्येष्ठ पत्रकार अरुण समुद्रे यांच्या हस्ते करण्यात आले. याप्रसंगी संस्थेचे अध्यक्ष डॉ. चेतन सारडा, सचिव कमलकिशोर अग्रवाल, उपाध्यक्ष प्रकाश कासट , विवेक रेड्डी,शालेय समितीचे अध्यक्ष अतुल देऊळगावकर, कोषाध्यक्ष जयेश बजाज, सहसचिव सूर्यप्रकाश धूत, सुभाष कासले, हुकूमचंद कलंत्री, शांतीलाल कुचेरिया यांचीही प्रमुख उपस्थिती होती. यावेळी आपले मनोगत व्यक्त करताना अरुण समुद्रे यांनी पालकांनी आपल्या पाल्याच्या विविध





गुणांना, शाळेच्या विविध उपक्रमांना प्रोत्साहन द्यावे असे आवाहन केले. शालेय जीवनात विद्यार्थ्याने संपादित केलेले गुण फार काळ टिकत नसतात. पण मुलांमधील कलागुण आयुष्यभर टिकणारे असतात याकडे पालकांनी लक्ष देणे अत्यावश्यक आहे. पालकांसाठी ग्रंथालय सुविधा देणारी ही पहिलीच शाळा आहे. नवोदय प्रवेश परीक्षा उत्तीर्ण होण्याचे श्रेय पालक शाळेला देतात. हा मुख्यमंत्री आदर्श शाळेच्या पुरस्कारापेक्षा मोठा पुरस्कार असल्याचेही अरुण समुद्रे यांनी सांगितले. यावेळी अभिनव गुणवंत शिक्षक पुरस्काराच्या मानकरी ठरलेल्या श्रीमती सुचिता कदिरे यांचा सन्मानही समुद्रे यांच्या हस्ते करण्यात आला.

बालवाडी ते दुसरीपर्यंतच्या विद्यार्थ्यांसाठीच्या दुसऱ्या सत्राच्या स्नेहसंमेलनाचे उदघाटन डॉ. मुग्धा पोतदार यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी बोलताना त्यांनी मुले ही अनुकरणप्रिय असतात. पालक आपल्या कुटुंबियांशी, नातलगांशी कसे वागतात त्याचे अनुकरण करत असतात असे सांगितले. त्याकरिता पालकांच्या वागण्या-बोलण्यात संयम हवा. मुलाला सुरक्षित वाटेल असे वातावरण, विश्र्वास पालकांनी द्यायला हवा असेही त्या म्हणाल्या. त्याचप्रमाणे त्यांनी पालकांसाठी मोबाईलचा वापर कमी करा, दहा वेळा मुलांचे कौतूक करून एक वेळ रागवण्याचा अधिकार असू द्या, मुलाचे ऐकायचा प्रयत्न करा. शाळेतून आल्यावर सूचना देण्याऐवजी त्याचे १०-१५ मिनिटे म्हणणे ऐका, मुलांना चर्चेची सवय लावा, वर्तन सुधारण्यासाठी त्याला मदत करा, सर्वात महत्त्वाचे अट्टाहासाचा 'च' काढून टाका अशी पंचसूत्री सांगितली.

विद्यालयाच्या शालेय समितीचे अध्यक्ष अतुल देऊळगावकर यांनी आपल्या मनोगतात मुलांना पंचेंद्रियाचा वापर करायला लावणारे उपक्रम विद्यालयात घेतले जातात, असे सांगितले. विद्यार्थी नैसर्गिक रंग तयार करतात, चित्रे काढतात, पाने ओळखतात, संगीत, क्रीडांमध्ये पुढे येत आहेत, ही बाब भूषणावह असल्याचे त्यांनी सांगितले.

पालकांनी त्यांच्यासाठी सुरु केलेल्या ग्रंथालयाचा उपयोग करून घ्यावा. मुलांची कल्पकता विकसित करण्याचा पालकांनीही प्रयत्न करावा, असे आवाहनही त्यांनी केले.

या वार्षिक स्नेहसंमेलनाचे प्रास्ताविक मुख्याध्यापक रमाकांत स्वामी यांनी केले. यावर्षी स्नेहसंमलेनात एकूण १ हजार ३७२ विद्यार्थी सहभागी होणार असल्याचे लक्षात घेऊन तीन सत्रामध्ये स्नेहसंमेलन घेण्याचे नियोजन करण्यात आल्याचे सांगितले. आपल्या विद्यालयातील मुले अभ्यासाबरोबरच क्रीडा, संगीत, चित्रकला क्षेत्रातही अग्रेसर असल्याचा आपल्याला सार्थ अभिमान असल्याचे नमूद करून स्वामी यांनी विद्यालयाचा दहावी परीक्षेचा निकाल कायम शंभर टक्के राहत आला आहे. स्नेहसंमेलनात ९० टक्के गीते संगीत विभागाच्या गीतमंचद्वारे सादर होत असल्याचे सांगितले.

संमेलनात विद्यार्थ्यांनी समूह नृत्याबरोबर वैयक्तिक सादरीकरण गायन, नृत्य, वक्तृत्व, वादविवाद, कथा-कथन, काव्यवाचन, अभिवाचन, एकपात्री अभिनय, जादूचे प्रयोग सादर केले. तसेच ऱ्हिदमिक जिमनॅस्टिक, आर्टिस्टिक योगाचे सादरीकरण, पर्यावरणविषयाशी संबंधित कार्यक्रम, सवाल-जबाब सादर केले.

निसर्ग वारसा तयार केलेल्या थिमक्का, चिंपांझीवर संशोधन करणाऱ्या जेन गुडॉल, पर्यावरणवादी डेव्हिड टनब्रो यांच्यावरील माहितीपट, माहिती सादर केली. या तीन्ही सत्रांचे सूत्रसंचालन तनुजा देशपांडे, सुप्रिया सोनटक्के, चक्षुपाल कांबळे यांनी केले. स्नेहसंमेलनास उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.